


दैनिक
# महाभूमि
निर्मळ, निकोप, नि:पक्ष




https://dainikmahabhoomi.com https://epaper.dainikmahabhoomi.com

राज्यसभेची ऑफर नाकारली : राज्याच्या राजकारणातच सक्रीय राहणार

# सिद्धरामय्यांचा कर्नाटक मुख्यमंत्री पदाचा राजीनामा

**बंगळूरु , वृत्तसंस्था**



कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी गुरुवारी आपल्या पदाचा राजीनामा दिला. बंगळुरू येथे आयोजित पत्रकार परिषदेला संबोधित करताना त्यांनी सांगितले, 'जेव्हा हाय कमांड मला सांगतील, तेव्हा मी राजीनामा देईन, असे मी यापूर्वीच स्पष्ट केले होते. काल हाय कमांडने तसा निर्देश दिला आणि आज मी माझा राजीनामा सादर केला आहे.'

आपले राजीनामा पत्र त्यांनी राज्यपाल थावरचंद गेहलोत यांच्या सचिवांकडे सुपूर्द केल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. राज्यपाल गेहलोत हे सध्या कौटुंबिक कारणांमुळे बंगळुरूबाहेर आहेत. या पत्रकार परिषदेला उपमुख्यमंत्री डी. के.शिवकुमार हे देखील उपस्थित होते. राज्याचे पुढील मुख्यमंत्री कोण असतील, याविषयीची कोणतीही माहिती या पत्रकार परिषदेदरम्यान उघड करण्यात आली नाही.

यावेळी सिद्धरामय्या यांनी हे स्पष्ट केले की, त्यांचा राजकीय प्रवास अजून संपलेला नाही. आपण राज्याच्या राजकारणातच सक्रिय राहणार असून, राष्ट्रीय राजकारणात जाण्यात आपल्याला कोणताही रस नसल्याचे त्यांनी जाहीर केले. ते म्हणाले, ''मी सक्रिय राजकारणातच कार्यरत राहीन. मला राष्ट्रीय राजकारणात कोणताही रस नाही. मला राज्यसभेबद्दलही विचारणा करण्यात आली होती. पण मी ती नाकारली. मला कर्नाटकच्या राजकारणातच राहायचे आहे,'' असे ते म्हणाले.

तत्पूर्वी, सिद्धरामय्या यांनी आपल्या निवासस्थानी मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांची बैठक घेतली आणि त्यांना या निर्णयाबाबत अवगत केले. या बैठकीदरम्यान, डी.के. शिवकुमार यांनी सिद्धरामय्या यांच्या पायांना स्पर्श करून वंदन केले. त्यानंतर या दोन्ही नेत्यांनी एकमेकांना आलिंगन दिले. दरम्यान, राज्याचे मंत्री एच.के. पाटील यांनी दुजोरा दिला की, डी.के. शिवकुमार यांच्या नावावर एकमत झाले असून, तेच आता कर्नाटकचे पुढील मुख्यमंत्री म्हणून सूत्रे हाती घेतील.



### मुख्यमंत्री पदासाठी डी.के. शिवकुमार यांच्या नावावर एकमत

- डीके शिवकुमार यांची शुक्रवारी काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी निवड केली जाईल. काँग्रेस डीके यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापनेचा दावा करेल.
- बिहारमध्ये एनडीएने ज्याप्रकारे माजी मुख्यमंत्री नितीश यांच्या मुलाला नवीन सरकारमध्ये मंत्री बनवले, त्याचप्रकारे सिद्धरामय्या यांच्या मुलाला मंत्री बनवले जाऊ शकते.
- यासोबतच सरकारच्या मंत्रिमंडळातही फेरबदल होईल. मंत्रिमंडळात सुमारे १५ ते २० नवीन मंत्र्यांचा समावेश केला जाऊ शकतो.

# दिल्ली दौऱ्यात फडणवीसांनी घेतली मोदी यांची भेट

## महाराष्ट्रातील विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा..

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेत महाराष्ट्रातील विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. महाराष्ट्राच्या विकासाशी संबंधित अनेक प्रकल्प, विविध अभियाने आणि राज्यासमोरील महत्त्वाच्या मुद्द्यांवर या बैठकीत चर्चा झाल्याची माहिती स्वतः फडणवीस यांनी सोशल मीडियावरून दिली.

गेल्या दोन दिवसांपासून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह महायुतीतील अनेक मंत्री दिल्लीत तळ ठोकून आहेत. त्यामुळे या बैठकींना विशेष राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भेटीनंतर एक्सवर पोस्ट करत या भेटीबाबत माहिती दिली. आमचे नेते आणि देशाचे लाडके पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आज नवी दिल्ली येथे भेट घेतली. महाराष्ट्राच्या विकासासाठी विविध विषयांवर त्यांचे मार्गदर्शन मिळाले. राज्यातील विविध प्रकल्प आणि अभियानांची माहितीही त्यांना दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं मार्गदर्शन नेहमीच सकारात्मक ऊर्जा देणारं असते, असे त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. या भेटीत केंद्र सरकारकडून महाराष्ट्रासाठी मोठ्या निर्णयांबाबत सकारात्मक संकेत मिळाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

राज्यात सध्या राजकीय वातावरणही चांगलंच तापलेले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महायुतीमधील जागावाटपावरून रस्सीखेच सुरू आहे. दुसरीकडे मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा आंदोलनाची घोषणा केली आहे. त्यामुळे राज्यातील सामाजिक आणि राजकीय परिस्थिती संवेदनशील बनली आहे. अशा वेळी राज्यातील तीनही प्रमुख नेत्यांचा दिल्ली दौरा आणि केंद्रातील वरिष्ठ नेत्यांसोबतच्या बैठका अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जात आहेत.

### काही दिवसांत मोठ्या घोषणांची शक्यता

- पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीनंतर आता शेतकरी आणि राज्यातील जनतेच्या अपेक्षा वाढल्या आहेत. कांदा आणि ऊस उत्पादकांना दिलासा मिळणार का ? केंद्र सरकार महाराष्ट्रासाठी कोणते मोठे निर्णय घेणार, याकडे संपूर्ण राज्याचं लक्ष लागले आहे. महायुती सरकारकडून आगामी काही दिवसांत मोठ्या घोषणांची शक्यता वर्तवली जात असल्याने दिल्लीतील या बैठका महाराष्ट्राच्या राजकारणात आणि प्रशासनात महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे बोलले जात आहे.

## न्यूज ब्रीफ

### मुस्लिम बांधवांकडून शांतता, समृद्धीसाठी प्रार्थना

**मुंबई :** राज्यभरात बकरी ईद अर्थात ईद-उल-अधा मोठ्या उत्साहात आणि धार्मिक वातावरणात साजरी करण्यात आली. मुंबई, सोलापूर, नाशिक, भुसावळसह अनेक शहरांमध्ये मुस्लिम बांधवांनी सकाळी सामूहिक नमाज पठण करत शांतता, बंधुभाव आणि देशाच्या प्रगतीसाठी प्रार्थना केली.
यंदा विशेष म्हणजे बकरी ईद आणि एकादशी एकाच दिवशी आल्यामुळे अनेक ठिकाणी सामाजिक सलोखा आणि परस्पर आदराचे चित्र पाहायला मिळाले. हिंदू आणि मुस्लिम समाजाने एकमेकांना सणाच्या शुभेच्छा देत ऐक्याचा संदेश दिला. मुंबईतील विविध मशिदी आणि ईदगाह मैदानांमध्ये सकाळपासूनच मोठी गर्दी पाहायला मिळाली. नाशिकमध्येही ईदगाह मैदानावर मोठ्या प्रमाणात मुस्लिम बांधव एकत्र आले होते. सुरक्षेच्या कारणास्तव प्रवेशद्वारांवर तपासणी करण्यात आली.

# कॉलेजियमने केंद्राला पाच नावे पाठवली

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था**

सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमने सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश नियुक्त करण्यासाठी पाच नावांची शिफारस केंद्र सरकारकडे पाठवली आहे. यामध्ये चार उच्च न्यायालयांचे मुख्य न्यायाधीश आणि एक वरिष्ठ महिला वकील यांचा समावेश आहे.

कॉलेजियमने पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश शील नागू, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश श्री चंद्रशेखर, मध्य प्रदेश उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश संजीव सचदेवा, जम्मू-काश्मीर आणि लडाख उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश अरुण पल्ली आणि वरिष्ठ वकील व्ही मोहना यांची नावे पाठवली आहेत. ही शिफारस २२ आणि २७ मे रोजी झालेल्या कॉलेजियमच्या बैठकांमध्ये करण्यात आली आहे.

ज्येष्ठ वकील व्ही. मोहना यांच्या नियुक्तीमुळे सर्वोच्च न्यायालयात महिलांचा सहभाग मजबूत होण्याची अपेक्षा आहे. सध्या सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्ना या एकमेव महिला न्यायाधीश आहेत. ऑगस्ट २०२१



नंतर कोणत्याही महिलेची सर्वोच्च न्यायालयात नियुक्ती झालेली नाही. सध्या सर्वोच्च न्यायालयात ३२ न्यायाधीश आहेत. जूनमध्ये न्यायमूर्ती जे.के. माहेश्वरी आणि न्यायमूर्ती पंकज मित्तल यांच्या निवृत्तीनंतर आणखी दोन पदे रिक्त होतील.

# शायर बशीर बद्र यांचे निधन; उर्दू साहित्यातील आवाज हरपला

**भोपाळ, वृत्तसंस्था**

प्रख्यात शायर डॉ. बशीर बद्र यांचे गुरुवारी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास भोपाळ येथे निधन झाले. वयाच्या ९१ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांनी उर्दू शायरीला पुस्तकी गांभीर्य आणि जड शब्दांच्या चौकटीतून बाहेर काढून सर्वसामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनवले. साहित्यातील त्यांच्या याच ऐतिहासिक आणि अतुलनीय योगदानासाठी भारत सरकारने त्यांना पद्मश्री या प्रतिष्ठित नागरी



सन्मानाने सन्मानित केले होते. त्यांच्या जाण्याने जगभरातील करोडो उर्दू प्रेमी आणि त्यांच्या चाहत्यांमध्ये मोठी शोककळा पसरली आहे.

बद्र हे गेल्या बऱ्याच काळापासून डिमेंशिया (स्मृतिभ्रंश) या आजाराने ग्रस्त होते. त्यांची स्मरणशक्ती पूर्णपणे लयाला गेली होती आणि त्यांना लोकांना ओळखणेही अशक्य झाले होते. गेल्या काही महिन्यांपासून त्यांची प्रकृती सातत्याने खालावत होती. जेव्हा कधी त्यांना एखाद्या मुशायऱ्याची आठवण करून दिली जाई, तेव्हा ते ''इर्शाद! इर्शाद!'' असे म्हणायचे. बद्र यांनी उर्दू गझलला एक नवा सूर दिला. क्लिष्ट शब्दरचनेऐवजी साध्या आणि सोप्या शब्दांचा वापर करून त्यांनी आपली शायरी केली.

### उजाले अपनी यादों के हमारे साथ रहने दो

- उर्दू अदब विश्वात त्यांचे उजाले अपनी यादों के हमारे साथ रहने दो, कोई हाथ भी न मिलाएगा जो गले मिलोगे तपाक से यांसारखे शेकडो शेर आजही लोकांच्या ओठांवर आहेत. बशीर बद्र साहेब आज आपल्यात नसले, तरी त्यांनी मराठी, हिंदी आणि उर्दू भाषिक जगताला दिलेला हा साहित्याचा वारसा, त्यांच्या गझला आणि अद्वितीय शेर नेहमीच जिवंत राहतील आणि येणाऱ्या अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहतील.

# १ जून ते ३१ जुलै दरम्यान यंत्रचलित मासेमारी नौकांना बंदी

**मुंबई :** मासळीच्या साठ्याचे जतन तसेच मच्छीमारांच्या जीवित व वित्त रक्षणाच्या उद्देशाने राज्य शासनाने महाराष्ट्राच्या सागरी जलक्षेत्रात पावसाळी मासेमारी बंदी लागू केली आहे. मत्स्यव्यवसाय विभागाच्या आदेशानुसार १ जून २०२६ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत महाराष्ट्राच्या सागरी किनाऱ्यापासून १२ सागरी मैलांपर्यंत यांत्रिक व यंत्रचलित मासेमारी नौकांना मासेमारी करण्यास बंदी घालण्यात आली आहे.या कालावधीत समुद्रात मासेमारीसाठी जाणाऱ्या नौकांवर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम (सुधारणा) २०२१ अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

## नसरापूर अत्याचार प्रकरण

# आरोपी मानसिकदृष्ट्या सक्षम, इन-कॅमेरा सुनावणीचे आदेश

**पुणे, वृत्तसंस्था**

नसरापूर येथील तीन वर्षीय चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करुन तिचा खून केल्याप्रकरणातील आरोपी भीमराव कांबळे हा मानसिकदृष्ट्या सक्षम असल्याचे स्पष्ट झाले असून, त्याबाबतचा वैद्यकीय अहवाल गुरूवारी विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांच्या न्यायालयात सादर करण्यात आला. आरोपीविरोधात लावण्यात आलेल्या कलमांनुसार गुन्हा सिध्द करण्यासाठी तोंडी व कागदोपत्री पुरावा सरकारी पक्षाकडे आहे. तपासात सर्व परिस्थितीजन्य पुराव्यांची भक्कम कडी जोडण्यात आली आहे. त्यामुळे, आरोपीविरुध्द दोषारोप निश्चित करण्याची मागणी विशेष सरकारी वकील अजय मिसर यांनी केली. न्यायालयाने दोषारोप निश्चित करत नियमित सुनावणी इन-कॅमेरा घेण्याचे आदेश दिले.

- दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आरोपीविरुद्ध दोषारोप निश्चित करण्याइतका प्रथमदर्शनी पुरावा असल्याचे नमूद केले. आरोपीला दोषारोप वाचून दाखवण्यात आले असता त्याने सर्व आरोप नाकारले. प्रकरणाचे गांभीर्य आणि संवेदनशीलता लक्षात घेऊन सुनावणी 'इन-कॅमेरा' पद्धतीने घेण्याचे आदेश न्यायालयाने दिले.

याप्रकरणातील आरोपी भीमराव कांबळे याला गुरूवारी कडेकोट पोलीस बंदोबस्तात सकाळी अकराच्या सुमारास विशेष न्यायालयात हजर करण्यात आले. सरकार पक्षातर्फे युक्तिवाद करताना विशेष सरकारी वकील अजय मिसर म्हणाले की, खटल्यात जप्त करण्यात आलेल्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये आरोपी चिमुकलीला घेऊन जात असल्याचे स्पष्ट दिसत आहे. त्या दोघांना चिमुकलीच्या मृत्यूपूर्वी एकत्र बघण्यात आले आहे. आरोपी आणि बालिकेला शेवटचे एकत्र पाहिलेल्या साक्षीदारांचे जबाब, ओळख परेड, आरोपी लैंगिक तसेच मानसिकदृष्ट्या सक्षम असल्याचा वैद्यकीय अहवाल, डीएनए आणि एफएसएल अहवाल, शवविच्छेदन अहवाल, लेखाजोखा न्यायाधीशांसमोर मांडण्यात आला.

## राज्यातील ३६ हजार सेतू संचालकांना मनस्ताप

# नवीन प्रणालीमुळे आपले सरकार केंद्रांचे कामकाज विस्कळीत

**अनुप गवळी**

**खामगाव :** राज्यातील आपले सरकार सेवा केंद्र अंतर्गत नुकतीच लागू करण्यात आलेली नवीन प्रणाली सध्या राज्यभरातील छत्तीस हजार सेतू व आपले सरकार सेवा केंद्र चालकांसाठी मोठी डोकेदुखी ठरत आहे. प्रणाली अत्यंत किचकट व क्लिष्ट असल्याने अर्ज प्रक्रियेस पूर्वीपेक्षा अधिक वेळ लागत असून महा आयटीकडून निश्चित करण्यात आलेल्या सेशन मर्यादेमुळे अनेक अर्ज अपूर्ण राहत आहेत. परिणामी नागरिकांची कामे रखडत असून त्याचा थेट फटका सेतू सेवा केंद्र संचालकांना बसत आहे.

सध्या राज्यभर शाळा व महाविद्यालयांच्या प्रवेश प्रक्रिया सुरू आहेत. या प्रवेश प्रक्रियेसाठी उत्पन्न प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, रहिवासी दाखले, नॉन-क्रीमी लेयर व इतर शैक्षणिक कागदपत्रांसाठी विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे.

मात्र नवीन प्रणालीमुळे अर्ज प्रक्रिया मंदावली असून अनेक विद्यार्थ्यांचे अर्ज वेळेत पूर्ण होत नाहीत. त्यामुळे विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेपासून वंचित राहण्याची भीती व्यक्त केली जात आहे. राज्यातील अनेक सेतू सेवा केंद्रांमध्ये पोर्टल स्लो चालणे, सर्व्हर डाऊन होणे, लॉगिन समस्या, अर्ज सबमिट न होणे, पेमेंट अडकणे तसेच सेशन संपल्याने पुन्हा प्रक्रिया करावी लागणे अशा तांत्रिक अडचणी सातत्याने निर्माण होत आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण असून या सर्व रोषाला स्थानिक सेतू व सेवा केंद्र संचालकांना सामोरे जावे लागत आहे.

### उद्देश चांगला पण प्रणाली अत्यंत किचकट

- यासंदर्भात संघर्ष आपले सरकार सेवा केंद्र संचालक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सुरज बेलोकार यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. नवीन प्रणाली लागू करण्यामागील उद्देश चांगला असला तरी सद्यस्थितीत ही प्रणाली अत्यंत किचकट, वेळखाऊ आणि त्रासदायक ठरत आहे. महाआयटीने प्रत्यक्ष कामकाजातील अडचणी लक्षात न घेता ही प्रणाली लागू केली आहे. सेशन मर्यादेमुळे अनेक अर्ज अपूर्ण राहत आहेत आणि त्याचा थेट फटका विद्यार्थी, पालक व सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. नागरिकांच्या संतापाला मात्र बिचाऱ्या सेतू व सेवा केंद्र संचालकांना सामोरे जावे लागत आहे, अशी प्रतिक्रिया संघर्ष आपले सरकार सेवा केंद्र संचालक संघटनेचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष सुरज बेलोकार यांनी दिली.

> नुकतेच दहावी बारावीचे निकाल लागलेले असल्यामुळे पुढील प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना विविध दाखल्याची गरज आहे. परंतु पोर्टल स्लो चालत असल्याने आम्हाला विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे.
>
> – **परमानंद राजपूत**
> सेतु संचालक जळगाव जामोद

# ओबीसी आरक्षणाला धक्का लावल्यास गाठ आमच्याशी

## लक्ष्मण हाके यांचा जरांगेवर हल्लाबोल

**पुणे:** ओबीसी आरक्षणाला धक्का लावल्यास गाठ आमच्याशी असेल, असा इशारा ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी दिला आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनावर टीका करताना हाके यांनी हे आंदोलन म्हणजे लोकशाही आणि आरक्षणाचे अज्ञान असल्याचे म्हटले. पुण्यात पत्रकारांशी बोलताना त्यांनी जरांगे पाटील यांच्या मागण्या कायद्याच्या कसोटीवर टिकणार नाहीत, असे स्पष्ट केले.



हाके म्हणाले की, मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन म्हणजे लोकशाही आणि आरक्षणाचे कवडीचेही ज्ञान नसलेल्या माणसाच्या हातात गेलेला पोरखेळ आहे. सरकारने त्यांच्यासाठी नेहमीच रेड कार्पेट घातले असून, त्यांच्या दबावाखाली येऊन काढलेले सरकारी नोटिफिकेशन पूर्णपणे बेकायदेशीर आहे.


हाके यांनी त्यांना उपरोधिक सदिच्छा दिल्या. ते म्हणाले, ''याआधी ८ वेळा उपोषण झाले आहे, आता हे नववे उपोषण सुरू आहे. पाच पिढ्यांचे नुकसान झाल्याचा दावा जरांगे करत आहेत, पण मग यामुळे फायदा नेमका कुणाचा झाला? असेही ते म्हणाले.

# माझा बळी गेला तर फडणवीस जबाबदार

## ३० मे पासून उपोषण करणार: मनोज जरांगे

**जालना :** आंतरवालीमध्ये ३० मे रोजी रखरखत्या उन्हात बाजेवर बसत आमरण उपोषण करणार आहे. ना पाणी घेणार ना काही जे होईल ते होईल. आता उष्माघाताने माझा बळी गेला तर तो मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळेच गेला, असे मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

आता उपोषण खूप कडक होणार आहे. वेदनांचा काहीही विचार मी करणार नाही. एकतर सरकारचा तुकडा पडेल नाही तर माझ्या जीवाचा तुकडा पडेल या भूमिकेवर मी आलो आहे. मनोज जरांगे पाटील म्हणाले की, आपण सरकारला पाहिजे त्यापेक्षा जास्त वेळ दिला आहे. २९ मे रोजी १० महिने पूर्ण होत आहेत. यापेक्षा किती जास्त वेळ सरकारला द्यायचा, गोरगरीब मराठ्यांच्याच लेकरांवर का अन्याय केला जातो? असा सवाल मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. आपल्या समाजाला काही मिळत नसेल तर कठोर पाऊल उचलावे लागतील. जरांगे पाटील म्हणाले की, मला काही प्रसाद लाड यांना दोष द्यायचा नाही. त्यांनी सांगितले की मी मराठा आहे. पण आता त्यांचे डोळे उघडले असतील.



**मुख्यमंत्री फडणवीस यांची ग्वाही : केंद्रीय जलशक्ती मंत्र्यांसोबत राज्याची सकारात्मक चर्चा**

# 'सिंचन योजनांना प्राधान्य देऊन महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्यासाठी प्रयत्न'

**नवी दिल्ली / वृत्तसंस्था**

केंद्र सरकारचे जलजीवन मिशन, प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना, जलसंचय जनभागीदारी; तसेच राज्यातील विविध जलसंधारण आणि सिंचन योजनांच्या कामांना सर्वोच्च प्राधान्य देऊन महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. केंद्रीय जलसिंचन मंत्री सी. आर. पाटील यांच्या अध्यक्षतेत याबाबत झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत महाराष्ट्राकडून व्यक्त केलेल्या अपेक्षांना केंद्र सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद देण्यात आला.



राज्यातील ७५ टक्के पेक्षा जास्त पूर्ण झालेल्या योजना, तसेच ५० ते ७५ टक्के दरम्यान पूर्ण झालेल्या योजनांना प्राधान्याने निधी दिला जाणार आहे. या पाईपलाईन आणि पाणी पायाभूत सुविधांच्या योजनांना गती देऊन त्या पूर्ण करण्यासाठी केंद्र सरकारकडून अंदाजे ६,८०० कोटी रुपये मिळण्याची अपेक्षा आहे. पूर्ण झालेल्या पाणीपुरवठा योजनांचे स्थानिक गावे, ग्रामपंचायती, तालुके आणि जिल्हा पातळीवर अचूक प्रमाणीकरण करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी बैठकीत सांगितले. राज्य आणि केंद्र अधिकाऱ्यांनी ९० टक्के योजनांचा सविस्तर आढावा घेतला आहे. सद्यस्थितीत आढळून आलेल्या त्रुटी दूर केल्या जात आहेत, जलस्त्रोतांचे बळकटीकरण केले जात आहे आणि पुढील कामे दर्जेदार होतील, याची कडक खबरदारी घेतली जात असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केले.

### भूजल पातळी खालवलेल्या क्षेत्रांना ६५ टक्के निधी

जी रामजी योजनेत जलसंधारणाच्या कामांना अधिक महत्त्व देण्याचा आग्रह राज्याकडून धरण्यात आला असून डार्क झोनमध्ये (भूजल पातळी अत्यंत खालावलेले क्षेत्र) असणाऱ्या गावांना ६५ टक्के एवढा निधी तर सेमी डार्क झोनमधील गावांना ४५ टक्के निधी तर उर्वरित गावांना ३० टक्के निधी मिळणार आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेअंतर्गत राज्याला मिळालेल्या विविध योजनांचा आढावा घेण्यात आला.या योजनांसाठी आवश्यक असलेल्या अधिकच्या निधीची मागणी करण्यात आली असून, त्याबाबत सकारात्मक चर्चा झाली.

## 'पीसीपीएनडीटी कायद्याची कठोर अंमलबजावणी करा'

**मुंबई / वृत्तसंस्था**

बेकायदा गर्भलिंग निदान आणि स्त्री भ्रूणहत्या करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्यासाठी पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होणे अत्यंत आवश्यक असल्याचे स्पष्ट करत सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी जिल्हा आणि महापालिका स्तरावरील समित्या अधिक बळकट करण्याचे निर्देश दिले. चुकीचे काम करणाऱ्यांमध्ये कायद्याचा वचक निर्माण व्हावा, यासाठी व्यापक प्रमाणात कारवाई करावी,असेही त्यांनी सांगितले.

पीसीपीएनडीटी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसंदर्भात राज्य पर्यवेक्षकीय मंडळाची बैठक आरोग्य भवन येथे मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीस आमदार स्नेहा दुबे, प्रधान सचिव निपुण विनायक, अतिरिक्त संचालक डॉ. संदीप सांगळे, उपसंचालक (विलटो) डॉ. दिगंबर कानगुले, सहाय्यक संचालक डॉ.



वैशाली बडधे, विधि सल्लागार ॲड. भाग्यश्री रंगारी यांच्यासह आरोग्य विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते. मंत्री आबिटकर म्हणाले, स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी बेकायदेशीर प्रसवपूर्व गर्भलिंग निदान करणाऱ्यांवर शून्य सहनशीलतेचे धोरण अवलंबण्यात यावे. चुकीचे काम करणाऱ्यांमध्ये भीती निर्माण होणे आवश्यक असून, गर्भलिंग निदान करणाऱ्या हॉस्पिटल्सवरील तपासण्या वाढवून दोषींवर कठोर कारवाई करावी. पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या समित्यांचे कामकाज अधिक प्रभावी होणे आवश्यक असून, समित्यांच्या नियमित बैठका घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

## तरुणाचे सावत्र आईसोबतच प्रेमसंबंध

**बीड** : जिल्ह्यातील केजमध्ये एक धक्कादायक प्रेमप्रकरण समोर आले. दोघांनीही आयुष्य संपवल्यानंतर ही घटना समोर आली आहे. एक २१ वर्षीय तरुण आणि त्याची सावत्र आई यांचे एकमेकांवर प्रेम जडले. त्यानंतर ते घरातून पळून गेले. पण, परत घरी आणल्यानंतर दोघांनी आयुष्याचा शेवट केला. तरुणाने विष प्राशन केले, तर त्याच्या मृत्युचा धक्का बसल्याने सावत्र आईने रुग्णालयाच्या परिसरातच गळफास घेतला. बीड जिल्ह्यातील केज तालुक्यात ही घटना घडली.

तालुक्यातील सोनी जवळा गावातील साहेबराव पवार (वय ४०) यांचा पहिल्या पत्नीसोबत घटस्फोट झाला होता. घटस्फोटानंतर त्यांनी चार वर्षापूर्वी अनिता नावाच्या महिलेसोबत लग्न केले होते. साहेबराव यांनी लग्न केल्यानंतर संसार सुरू होता, पण मुलगा अनिल पवार (वय २१) आणि अनिता यांच्यातच प्रेमसंबंध जुळले. साहेबराव यांनी पोलीस ठाण्यात धाव घेऊन दोघेही बेपत्ता झाल्याची तक्रार दिली.

## संगीत शिक्षणासाठी अत्याधुनिक महाविद्यालय उभारणार : ना. चंद्रकांत पाटील

**मुंबई / वृत्तसंस्था**

राज्यातील संगीत शिक्षणाला आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनातर्फे 'भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालय' उभारण्यात येत आहे. इमारतीच्या सद्यस्थितीचा सविस्तर आढावा उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी घेऊन बांधकामाचा दर्जा उत्तम ठेवून ते निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

मुंबई विद्यापीठाच्या कलिना कॅम्पसमध्ये सुरू असलेल्या या महाविद्यालयाच्या अत्याधुनिक इमारतीच्या बांधकामाची पाहणी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली. या पाहणीवेळी उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी.



वेणुगोपाल रेड्डी, महाराष्ट्र राज्य कला संचालनालयाचे संचालक डॉ. किशोर इंगळे, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाचे संचालक विनोद दांडगे, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, ज्येष्ठ गायिका उषा मंगेशकर आदिनाथ मंगेशकर, बांधकाम विभागाचे अधिकारी तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. देशात आंतरराष्ट्रीय स्तरावरील संगीत शिक्षण संस्था उभी राहावी आणि भारतीय संगीत परंपरेचा गौरव जागतिक स्तरावर पोहोचावा, या उद्देशाने राज्य शासनाकडून या भव्य व अत्याधुनिक इमारतीचे बांधकाम करण्यात येत आहे.

## आयातीच्या फटक्याने सोयाबीन दरवाढ खुंटली!

**नागपूर / वृत्तसंस्था**

उत्पादन कमी असल्याचे कारण पुढे करून केंद्र सरकारच्या परवानगीने १ नोव्हेंबर २०२५ ते ३१ मार्च २०२६ या काळात ३.०९ सोयाबीन आयात करण्यात आली. त्यामुळे दर दबावात आले आणि सरकारने गेल्या हंगामात शेतकऱ्यांना बाजारातील तेजीचा फायदा मिळू दिला नाही. मार्चपासून सोयबीनचे दर चढायला सुरुवात होताच सरकारने पुन्हा आफ्रिकन देशांमधून एक लाख टन सोयाबीन आयातीला परवानगी दिली आहे. ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत किमान दोन लाख टन सोयाबीन आयात केले जाणार असल्याने आगामी हंगामातील सोयाबीन दरवाढीची शक्यता आताच मावळली आहे.

केंद्र सरकारने भारत-अमेरिका व्यापार करारानुसार खाद्यतेल व तेलबियांवरील आयात शुल्क कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. मागील वर्षी सरकारने



आफ्रिकन देशांसोबत पाच लाख टन सोयाबीन आयातीचा करार केला होता. १ नोव्हेंबर २०२५ ते ३१ ऑक्टोबर २०२६ या ऑइल इयरमध्ये किमान सहा लाख टन सोयाबीनची आयात होऊ शकते. या ऑइल इयरच्या पहिल्या पाच महिन्यांत ३.०९ लाख टन सोयाबीन आयात करण्यात आल्याने देशांतर्गत बाजारातील सोयाबीनचे दर एमएसपीच्या खाली राहिले. मार्च २०२६ पासून दरवाढीला सुरुवात होताच पुन्हा एक लाख टन सोयाबीन आयातीला परवानगी दिली. सध्या ८० हजार टन सोयाबीनचे सौदे झाले आहेत. जून ते ऑक्टोबर या काळात किमान दोन लाख टन सोयाबीन आयात केले जाऊ शकते. ऑक्टोबरपासून शेतकऱ्यांचे नवीन सोयाबीन बाजारात येणार असून, आयातीमुळे दर फारसे वधारणार नाहीत, याची व्यवस्था आजच सरकारने केली आहे. ही सोयाबीन जीएम असण्याची शक्यता बळावली आहे.

### दरातील तफावत, मंदावलेली निर्यात

जागतिक बाजारात सध्या सोयाढेपेचे दर प्रतिटन ३७८ डॉलर म्हणजेच ३६,१५९.२५ रुपये असून, भारतीय बाजारात या ढेपेचे दर ४२,५०० ते ४३,५०० रुपये प्रतिटन आहे. भारतीय नॉन जीएम सोयाढेपेचे दर अधिक असल्याने सरकार निर्यातीला सबसिडी देत नसून, जागतिक बाजारात नॉन-जीएम सोयाढेपेला प्रीमिअम दर मिळत नसल्याने निर्यात मंदावली आहे.

## पावसाळी मासेमारी बंदी लागू ; नियमांचे उल्लंघन केल्यास कठोर कारवाई

**मुंबई / वृत्तसंस्था**

मासळीच्या साठ्याचे जतन तसेच मच्छीमारांच्या जीवित व वित्त रक्षणाच्या उद्देशाने राज्य शासनाने महाराष्ट्राच्या सागरी जलक्षेत्रात पावसाळी मासेमारी बंदी लागू केली आहे. मत्स्यव्यवसाय विभागाच्या आदेशानुसार १ जून २०२६ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत (दोन्ही दिवस धरून) महाराष्ट्राच्या सागरी किनाऱ्यापासून १२ सागरी मैलांपर्यंत यांत्रिक व यंत्रचलित मासेमारी नौकांना मासेमारी करण्यास बंदी घालण्यात आली आहे.

मत्स्यव्यवसाय विभागाने जारी केलेल्या सूचनेनुसार, या कालावधीत समुद्रात मासेमारीसाठी जाणाऱ्या नौकांवर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम (सुधारणा) २०२१ अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे सर्व मच्छीमार, नौका मालक, तांडेल आणि खलाशी यांनी



शासनाच्या आदेशांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. पावसाळी हंगामात समुद्र खवळलेला असतो. त्यामुळे मासेमारी करताना अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच या काळात विविध माशांच्या प्रजातींचा प्रजनन कालावधी असल्याने मासेमारी बंदीमुळे मत्स्यसंपत्तीचे संवर्धन होण्यास मदत होते. या निर्णयामुळे भविष्यात मच्छीमारांना अधिक प्रमाणात मासळी उपलब्ध होऊन आर्थिक लाभ होणार असल्याचे मत मत्स्यव्यवसाय विभागाकडून व्यक्त करण्यात आले आहे.




### राशीभविष्य

- **मेष** : आर्थिक उन्नतीचे मार्ग खुले होतील. कलेतून धनार्जन वाढवण आहे. अनुकूलतेचा लाभ उठवावा.
- **वृषभ** : सरकारी कामं मनासारखी होतील. नोकरीत अधिकार वाढतील. नव्या कामांना गती प्राप्त होईल.
- **मिथुन** : योजलेल्या कामांना विलंब होईल. महत्त्वाचे निर्णय पूर्ण विचाराने घ्यावे. संघर्षातून प्रगती होईल.
- **कर्क** : आर्थिक प्रगती होत जाईल. नव्या कामांना गती प्राप्त होईल. महत्त्वाचे निर्णय विचारानं घ्यावेत.
- **सिंह** : परिश्रमाने यश मिळत जाईल. अडचणीतून मार्ग निघणार आहे. घाईने कोणतेही निर्णय घेऊ नका.
- **कन्या** : सुसंधी लाभणार आहेत. कार्यक्षेत्रात लगेच नवीन बदल करू नका. अचानक धनलाभ होईल.
- **तूळ** : योजलेली कामं मनासारखी होतील. घाईने कोणतेही निर्णय घेऊ नका. अपेक्षित घटना घडतील.
- **वृश्चिक** : नव्या संधींचं स्वागत करावं. आत्मविश्वास वाढवणारा कालावधी आहे. अपेक्षित प्रगती होईल.
- **धनु** : अपेक्षित प्रगतीसाठी अधिक प्रयत्न करावे. नव्या कामांना गती प्राप्त होईल. सुसंधींचा लाभ घ्यावा.
- **मकर** : सर्व प्रतिकूलतेवर मात कराल. प्रगतीचा कालावधी आहे. हाती घेतलेली कामं मनाजोगी होतील.
- **कुंभ** : प्रतिकूलता कमी होईल. नव्या कामांना गती प्राप्त होईल. महत्त्वाच्या घटनांनी दिलासा मिळेल.
- **मीन** : नव्या कामांना गती प्राप्त होईल. समाधानी रहावं. सरकारी कामं मनासारखी होणार आहेत.

### २९ मे — दिनविशेष

- **१९९०** : बोरिस येल्त्सिन रशियाच्या अध्यक्षपदी.
- **२०१३** : पारंपरिक सरकारी शिक्षणाला पर्याय ठरणाऱ्या खासगी विद्यापीठांचा मार्ग मोकळा.
- **२०१७** : जम्मू–काश्मीरमधील फुटीरतावाद्यांशी चर्चा करण्यास तयार नसल्याची भूमिका केंद्र सरकारने न्यायालयात स्पष्ट केली.
- **२०१८** : मिझोरामचे राज्यपाल म्हणून केरळचे भाजपचे प्रदेशाध्यक्ष कुम्मानम राजशेखरन यांनी शपथ घेतली.

### आरोग्यमंत्र — आवाजातील बदलांवरुन...

शरीरयंत्रणेतील काही बिघाड अनारोग्याचे निदर्शक असतात. शरीराला एखाद्या व्याधीने ग्रासल्यास लगेचच अथवा काही काळाने शारीरिक लक्षणं दिसू लागतात. मात्र काही लक्षणं दिसत नसली तरी अनेक आजार सुप्तावस्थेतच राहतात हेदेखील आपण समजून घ्यायला हवं. अशाप्रकारे एकीकडे आपण गाफील असतो तर दुसरीकडे शरीर व्याधीग्रस्त होत असतं. ही स्थिती टाळण्यासाठी संशोधक विविध आजारांचं वेळेत निदान करणाऱ्या पद्धती शोधून काढण्यात व्यग्र असलेले पहायला मिळतात. याचाच एक भाग म्हणून अमेरिकेतील संशोधकांच्या एका गटाने आवाजाच्या सहाय्याने मेंदूतील विकारांचं निदान करणारं उपकरण शोधून काढलं आहे. मेंदूतील काही विकार क्रॉनिक अवस्थेत पोहचल्यानंतरच समोर येतात. त्यामुळे रुग्णाला उपचार घेण्याची संधीच मिळत नाही. मात्र या उपकरणाच्या सहाय्याने आजार प्राथमिक अवस्थेतच समजतात आणि उपचारांती रुग्ण बरा होण्याची शक्यता वाढते. सध्या हे उपकरण चाचणी प्रक्रियेतून जात आहे. व्हॉईस ॲनॅलिसीस करणारं हे मशीन तज्ज्ञ आणि रुग्ण यांच्यामधील संवादाचा अभ्यास करतं. त्यासाठी मशीनमध्ये लर्निंग सॉफ्टवेअरचा वापर करण्यात आला आहे. या नव्या संवादाची आधीच्या डेटाबेसशी पडताळणी केली जाते. रुग्णाचा इमोशनल इंटेलिजन्सही लक्षात घेतला जातो. ही माहिती सर्व्हिस प्रोव्हायडरमध्ये संकलित केली जाते आणि त्यावरुन अनुमान काढलं जातं. 'केनरी स्पीच' असं या उपकरणाचं नाव आहे.



### सफर देशांची — आगळा वेगळा पेरु!

पेरु हा दक्षिण अमेरिकेतला तिसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा देश आहे. पेरुमध्ये डोंगर, वाळवंटी प्रदेश, घनदाट जंगलं आणि समुद्रकिनारेही आहेत. 'लिमा' ही पेरुची राजधानी. या देशातले बरेच लोक पॅसिफिक महासागराच्या किनारी रहातात. राजधानी लिमासुद्धा पॅसिफिक महासागराच्या किनारी वसली आहे. इक्वाडोर, चिली, कोलंबिया, ब्राझील आणि बोलिव्हिया हे पाच देश पेरुचे शेजारी आहेत. पेरुच्या पश्चिम किनारपट्टीलगत रुंद असा २५०० किलोमीटर लांब वाळवंटी पट्टा आहे. या प्रदेशाने देशाचा फक्त १० टक्के भूभाग व्यापला असला तरी देशाची अर्धी लोकसंख्या याच भागात रहाते. पेरुचा अर्ध्यापेक्षा अधिक भाग ॲमेझॉनच्या जंगलांनी व्यापला आहे. या ठिकाणी अनेक प्रजातींची झाडं, प्राणी, पक्षी पहायला मिळतात. या प्रदेशांमध्ये बऱ्याच आदिवासी जमातीही रहातात. यातल्या अनेक जमातींचा बाहेरच्या जगाशी संबंधही आलेला नाही. या देशात अँडिज पर्वतरांगा आहेत. या पर्वतांच्या शिखरांवरचा बर्फ पर्यटकांना आकर्षित करतो. ट्रेकिंग आणि हायकिंगचा अनोखा अनुभव इथे घेता येतो. पेरुमधल्या एक किलोमीटरच्या जंगलपट्टयातच ६००० प्रजातींची झाडं पहायला मिळतात.

### स्टाईल स्टेटमेंट — ऑफिस फॅशनचे बदलते ट्रेंड्स

ऑफिसमधल्या पोशाखाचा ठराविक बाज असतो. कॉर्पोरेटमधल्या महिला वेस्टर्न फॉर्मल्सवर भर देतात. कुर्ता लेगिंग, सलवार कमीज असे कपडेही कॅरी केले जातात. ऑफिसमध्ये स्टाईलसोबतच नेटकेपणाही लागतो. भडक रंगाचे, चित्रविचित्र प्रिंट्सचे कपडे घालता येत नाहीत. मात्र आपलं वेगळेपण जपण्यासाठी तुम्ही काही प्रयोग नक्कीच करू शकता. बॉलिवूडमधल्या अभिनेत्रींकडून कार्यालयीन पेहरावासाठी काही टिप्स घेता येतील.

✻ करिना कपूरने मध्यंतरी मिडी ड्रेस घातला होता. खाकी आणि हिरव्या रंगाचा हा ड्रेस साधा असला तरी स्टायलिश दिसत होता. त्यावर तिने साधासा पोनीटेल बांधला होता. कानात हुपला रिंग्ज घातल्या होत्या. न्यूड रंगाच्या हिल्सही कॅरी केल्या होत्या. अशा हिल्सऐवजी तुम्ही स्नीकर्स किंवा न्यूट्रल रंगाची फ्लॅट पादत्राणं घालू शकता.

✻ तुमच्याकडचं डेनिम जॅकेट कधीही वापरता येईल. आलिया भट्टने पांढऱ्या स्लीव्हलेस ड्रेसवर क्रॉप्ड डेनिम जॅकेट घातलं होतं. तुम्हीही स्लीव्हलेस ड्रेस किंवा कुर्त्यावर ते कॅरी करू शकता. **(क्रमश:)**

### पंचांग

**शुक्रवार, २९ मे २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
अधिक ज्येष्ठ शु. १३, चंद्रराशी : तूळ,
नक्षत्र : स्वाती, योग : परिघ,
सूर्योदय ६.०३, सूर्यास्त ७.०९

### फॉरवर्ड्स

**नहीं छोड़ी कमी क़िसी भीं रिश्ते क़ो निभानें में...**

**आने वाले क़ो रास्ता भी दिया**
**औऱ जानें वाले क़ो रब क़ा वास्ता भी दिया...!**

### फॅशन पॅशन


उन्हाळ्यातल्या दुपारी मित्रमंडळींसोबत ब्रंचला जाताना आपला फॅशन सेंस जपायला हवा. तुमच्या ब्रंच सेशनसाठी या फॅशन टिप्स...

✻ कूल लूक मिळवायचा असेल तर ट्रेंडी टी शर्टवर एखादा ब्लेझर घाला. खूप उकडत असेल तर ब्लेझर काढूनही ठेवता येईल. एसीमध्ये ब्लेझर घाला.

✻ या दिवसात शॉर्टसपेक्षा फॅन्सी किंवा आरामदायी दुसरं काहीच नसतं. उन्हाळ्यात गारव्याची अनुभूती घ्यायची असेल तर पेस्टल शेड्सच्या शॉर्टस ट्राय करा. कॅमॉफ्लेज रंगही चालून जातील. **(क्रमश:)**

### करिअरवाटा — क्षेपणास्त्र निर्मितीतील संधी

सध्या लष्कराच्या अत्याधुनिकीकरणावर तसंच शस्त्रसज्जतेवर दिला जात असलेला भर सर्वसामान्यांच्या नजरेतूनही सुटण्यासारखा नाही. भारतीय लष्कराला लागणारी शस्त्रास्त्रं तयार करण्याचं काम संरक्षण संशोधन आणि विकास संघटना (डीआरडीओ) या संस्थेतर्फे केलं जातं. या संघटनेतर्फे अनेक प्रकारची क्षेपणास्त्रंही विकसित केली जातात. शिवाय सध्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून काही प्रगत देशांच्या सहकार्यानं भारतातच विविध अत्याधुनिक क्षेपणास्त्रांच्या निर्मितीवर भर दिला जात आहे. क्षेपणास्त्रांची निर्मिती आणि चाचणी या क्षेत्रात मेकॅनिकल आणि एरॉनॉटिकल इंजिनिअरिंगसारखा अभ्यासक्रम पूर्ण करुन बाहेर पडलेल्या पदवीधरांना उत्तम वेतनाच्या नोकऱ्या प्राप्त होऊ शकतात. या प्रयोगशाळांमध्ये विविध प्रकारच्या चाचण्या घेतल्या जातात. त्यात उत्तीर्ण झाल्याखेरीज क्षेपणास्त्रं लष्करात वापरली जात नाहीत. त्यामुळे क्षेपणास्त्र तयार करण्याची कच्ची सामुग्री मिळवण्यापासून तयार झाल्यानंतरच्या प्रत्येक पायरीवर परीक्षेला उतरलीच पाहिजेत असा कटाक्ष असतो. याकामी अनेक प्रकारचे तज्ज्ञ गुंतलेले असतात. त्यामुळेच इथे मोठ्या संधी तुमची वाट पहात आहेत हे जाणून घ्या.



### खेचाखेची — सोनेखरेदी बंद

आज आत्ता भाजी घ्यायला गेलो होतो. भाजीवाला भाजी अगदी काटेकोर वजन करून देत होता.

मी म्हटलं, काय हो, सोनारासारखं भाजी तोलताय?

.
.
.

भाजीवाला म्हणाला, सोनारच आहे मी!


### वेगळं काही

मध्यंतरी सिंगापूरमध्ये आशिया खंडातली पहिली ग्रीन रुफटॉप असणारी बस सुरू झाली. 'गार्डन ऑन द मूव्ह' या अभियानाअंतर्गत ही बससेवा सुरू करण्यात आली आहे. या बसच्या टपावर दोन ग्रीन पॅनल बसवण्यात आले आहेत. त्यात मातीऐवजी कार्बन फायबरचा वापर करण्यात आला आहे. यामुळे या पॅनलचं वजन फक्त ४० किलो भरतं. या झाडांना जास्त पाणी द्यावं लागत नाही. वर्षातून दोन किंवा तीन वेळा देखरेखीची गरज भासते. ग्रीनरुफ बसेसमध्ये एसी लावावा लागत नाही. यामुळे २० टक्के इंधनाची बचत होते. बसच्या टपावर आणि आत सेन्सर्स बसवण्यात आले आहेत. यामुळे बसच्या आतलं आणि बाहेरचं तापमान मोजता येतं.

### संगोपन — मदत करा, ढवळाढवळ नको

कारकिर्दीची वाट ठरवताना मुलांबरोबर पालकांचाही चांगलाच गोंधळ उडताना दिसतो. या पार्श्वभूमीवर मुलांच्या करीअर निवडीत पालकांची काय भूमिका असावी याविषयी काही मुद्दे लक्षात घ्यायला हवेत.

✻ कारकिर्दीचा कोणता पर्याय निवडावा याबद्दल मुलांच्या मनात संदिग्धता असते. तरुण वय असल्याने व्यावसायिक आव्हानांशी भिडणं त्यांना आकर्षित करू शकतं. पण व्यवसाय आणि नोकरीमधील मूलभूत बदल त्यांना समजावून सांगावा. याशिवाय दोहोंमधील फायदे आणि तोटच्यांची जाणीव करून द्यावी.✻ तरुण वयात मुलांना करीअरचे सगळेच मार्ग योग्य वाटतात. पण खरा कल कुठे आहे हे शोधायला त्यांना मदत करावी. ✻ स्वत:ची अपूर्ण स्वप्नं मुलांकडून पूर्ण करून घेण्याचा हट्ट कधी करू नये. अनेक पालक विशिष्ट पदावर जाण्याची स्वत:ची अपूर्ण इच्छा मुलांकडून पूर्ण होईल अशी अपेक्षा बाळगतात. त्यामुळे त्यांच्यावर भावनिक ताण येतो. अशा वेळी केवळ पालकांना खुश करण्यासाठी मुलं करीअरचा वेगळा मार्ग निवडतात. पण यावेळी अपयशाचा मोठा धोका असतो. ✻ मुलांना जगभरातील करीअरच्या संधींची माहिती द्यावी.



दैनिक
महाभूमि
शुक्रवार । २९ मे २०२६
dainikmahabhoomi@gmail.com

# बुलढाणा भूमि

## मृत घोषित मुलगी झाली पोलीस ठाण्यात हजर!

**बुलढाणा :** जळगाव जामोद पोलिसांनी ज्या विवाहित मुलीची हत्या झाल्याचा दावा केला होता, आणि त्या प्रकरणात तिच्या वडील आणि भावाला अटक करून जेलमध्ये टाकले होते, ती मुलगी प्रत्यक्षात जिवंत निघाली. मृत घोषित केलेली ही मुलगी स्वतः पोलीस ठाण्यात हजर झाल्याने जळगाव जामोद पोलिसांची नाचक्की झाली असून त्यांच्या निष्काळजीपणाचा नमुना चव्हाट्यावर आला आहे. जळगाव जामोद तालुक्यातील राजुरा धरण परिसरात एका अज्ञात महिलेचा अर्धवट जळालेला मृतदेह आढळून आला होता.

### हवामान अंदाज

सूर्योदय : ५.४७ सकाळी
सूर्यास्त : ७.५३ सायं.
तापमान
कमाल : ४१°
किमान : २८°

### सोने-चांदी

| | |
|---|---|
| सोने (२२ कॅरेट प्रति तोळा) | १५०,८०० |
| सोने (२४ कॅरेट प्रति तोळा) | १५६,७०० |
| चांदी (प्रति किलो) | २६४,८२३ |

### न्यूज ब्रीफ

#### आज नीट पेपर फुटीच्या विरोधात धरणे

**चिखली :** वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड.बाळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशानुसार नीट पेपर फूटी विरोधात आणि विद्यार्थ्यांच्या न्याय हक्काच्या विविध मागण्यांकरिता वंचित बहुजन आघाडी प्रणित सम्यक विद्यार्थी आंदोलन बुलढाणा जिल्ह्याच्या वतीने २९ मे रोजी धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनप्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे उत्तर जिल्हाध्यक्ष देवा हिवराळे, दक्षिण जिल्हाध्यक्ष निलेश जाधव यांची उपस्थिती राहणार आहे.

#### स्मृतीप्रित्यर्थ ठाणेदाराने केले अनाथांना अन्नदान

**चिखली :** तालुक्यातील अमडापूर पोलीस स्टेशनला नुकतेच रुजू झालेले व अल्पावधीतच एक वेगळी ओळख निर्माण केलेले ठाणेदार जयसिंग राजपूत यांनी आपल्या मातेच्या स्मृती प्रित्यर्थ सेवा संकल्प प्रतिष्ठान पळसखेड सपकाळ येथे अन्नदान केले. ठाणेदार राजपूत यांच्या मातोश्री कै गंगाबाई पदमसिंग राजपूत यांच्या पाचव्या पुण्यस्मरण निमित्त २६ मे रोजी पळसखेड सपकाळ येथे अन्नदान केले.

## भाजपचा कॉंग्रेसविरोधात संतापाचा उद्रेक

# कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांच्या प्रतिमेला 'जोडे मारो' आंदोलन

**बुलढाणा/प्रतिनिधी**

कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याविरोधात केलेल्या असभ्य वक्तव्याच्या निषेधार्थ गुरूवारी भारतीय जनता पार्टीच्या वतीने जिल्हा कॉंग्रेस कमिटी कार्यालया समोर, जयस्तंभ चौकात भाजपचे जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांच्या हर्षवर्धन सपकाळ यांच्या प्रतिमेला जोडे मारो आंदोलन करण्यात आले.

यावेळी भाजपा कार्यकर्त्यांनी 'हर्षवर्धन सपकाळ मुर्दाबाद' 'कॉंग्रेसच्या विकृत राजकारणाचा निषेध असो', 'मोदीजींचा अपमान सहन केला जाणार नाही' अशा घोषणा देऊन परिसर दणाणून सोडला होता. आंदोलनात भाजपा जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांच्यासह जिल्हा महामंत्री दत्ता पाटील, शहराध्यक्ष मंदार बाहेकर, बुलढाणा ग्रामीण मंडळ अध्यक्ष सतीश भाकरे, जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत बर्दे, जिल्हा उपाध्यक्ष विलास मानवतकर, जिल्हा सचिव मुन्नाजी बेंडवाल, महिला शहराध्यक्ष वर्षा पाथरकर, अजित गुळवे, शोभा ढवळे, शिक्षक आघाडी जिल्हा संयोजक संदीप नरोटे, वैद्यकीय आघाडी जिल्हाध्यक्ष डॉ राजेश्वर उबरहंडे, राजेंद्र खरात, माजी सैनिक सेल जिल्हा संयोजक अभिमन्यू करपे,कामगार प्रदेश सदस्य अण्णासाहेब पवार, सतीश देहाडराय,माजी सैनिक अशोक किलबिले, अरविंद जाधव, प्रा.प्रभाकर वारे, ॲड दशरथसिंग राजपूत, किरण नाईक, किशोर गवळी, करण बेंडवाल, अंबादास घेवंदे, अल्पसंख्याक मोर्चा शहराध्यक्ष अकिल हाजी, राजू खान, भाजयुमो जिल्हा उपाध्यक्ष निलेश मुठ्ठे, मुकुंद देशपांडे, संजय मोटे, मिलिंद कुलकर्णी, मोहन निमरोट, पंकज गायकवाड, प्रदीप सोनटक्के, राजेंद्र पवार, तुकाराम राठोड, सचिन टेंभिकर, सखाराम नरोटे, तुकाराम राठोड, सारंग एकडे, रवी संगेले, नितीन बेंडवाल, गणेश पांडे,संजय चांदा, सुभाष पवार उपस्थित होते.

> *कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याविषयी केलेले वक्तव्य देशाच्या सन्मानाला धक्का देणारे आहे. राजकारणामध्ये वैचारिक मतभेद असू शकतात, मात्र जाणीवपूर्वक अश्लाघ्य, शिवराळ भाषा वापरून प्रसिद्धी मिळविण्याचा हा कॉंग्रेसचा जुना चेहरा पुन्हा एकदा जनतेसमोर आला आहे. सपकाळ यांचे वक्तव्य हे मनोविकृत मानसिकतेचे प्रतीक असून महाराष्ट्रातील जनता अशा प्रवृत्तीला आगामी काळात योग्य उत्तर दिल्याशिवाय राहणार नाही.*
>
> – **विजयराज शिंदे,** *जिल्हाध्यक्ष भारतीय जनता पक्ष, बुलढाणा*

## अपघातात युवकाचा मृत्यू; दोन जखमी

**बुलढाणा :** येथील पत्रकार दिगंबर कंकाळ यांचा मुलगा मंगेश याचा सैलानी रोडने सागवन शिवारात २७ मे च्या रात्री अपघाती मृत्यू झाला. मुलाच्या दुचाकीचे कोणतेच नुकसान झाले नसल्याने हा अपघात नसून घातपात असल्याचा संशय मृतक युवकाच्या वडिलांनी व्यक्त केला आहे. मृतक मंगेश याचे १ मे २०२६ रोजी लग्न झाले होते. सुखी संसाराची स्वप्ने रंगवित असतानाच काळाने त्याला हिरावून नेले. मंगेश कंकाळ हा मित्रांसोबत धाड परिसरात लग्नानिमित्त गेला होता.सैलानी मार्गाने एमएच-२८-बीटी-२०८० क्रमांकाच्या दुचाकीने परत येत होता. मात्र, मध्येच अपघात झाला. यामध्ये मंगेशचा मृत्यू झाला.

# मेरा बुद्रुक शिवारात दोन लाखांचा अवैध लाकूडसाठा पकडला

**अंढेरा/प्रतिनिधी**

मेरा बुद्रुक शिवारात अवैधरित्या साठवून ठेवण्यात आलेल्या निम व इतर अडजात प्रजातीच्या लाकडावर वन विभागाने धडक कारवाई करत तब्बल दोन लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे अवैध वृक्षतोड व लाकूड साठवणूक करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून बुलढाणा जिल्ह्यातील ही मोठी कारवाई मानली जात आहे.

मेरा बुद्रुक येथील गट क्रमांक ५१७ मधील पडीत शेतजमिनीवर विनापरवाना मोठ्या प्रमाणात निंब व इतर प्रजातीचे लाकूड साठवून ठेवण्यात आल्याची माहिती वन विभागाला प्राप्त झाली होती. त्यानुसार उपवनसंरक्षक जमीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली वन विभागाच्या पथकाने छापा टाकत कारवाई केली. शेतकरी संजय खरात (रा. शिंदी) यांच्या पडीत जमिनीवर आरामशीन मालक नरेंद्र पाटील (रा. साखरखेर्डा) यांनी कोणतीही परवानगी अथवा पास न घेता हा लाकूडसाठा लपवून ठेवला असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. वन विभागाने घटनास्थळी पंचनामा करून संपूर्ण मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई अंचरवाडी बिटचे वनरक्षक गजानन माणिकराव पोटे, वनसेवक ऋषिकेश तुपकर यांनी पार पाडली. सदर कारवाईस सहाय्यक वनसंरक्षक प्रादेशिक व कॅम्पा बुलढाणा वैभव काकडे तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी बुलढाणा सुनील वाकोडे यांचे मार्गदर्शन लाभले. पुढील तपास वनपाल प्रदीप प्रकाश मुंढे करीत असून संबंधितांविरोधात वन कायद्यान्वये कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती वन विभागाने दिली.










## शेतकऱ्यांसाठी दिलासादायक!

ऊस आणि कांदा उत्पादक शेतकरी प्रामुख्याने दर घसरण, वाढता उत्पादन खर्च, अनिश्चित हवामान आणि निर्यात धोरणांमधील बदलांमुळे त्रस्त आहेत. या दोन्ही पिकांचे प्रश्न थेट शेतकऱ्यांच्या अर्थकारणावर परिणाम करतात. कांद्याचे दर अनेकदा पडतात. सध्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना कांद्याला मिळणारा भाव बघता लागवड, काढणी आणि वाहतुकीचा खर्चही निघत नाही. ऊस उत्पादकांचेही चित्र काही यापेक्षा वेगळे नाही. साखर कारखान्यांकडून मिळणारा ऊस दर आणि उत्पादनासाठी लागणारा खर्च यात मोठी तफावत असते. शेतीसाठी लागणाऱ्या खते, औषधे आणि मजुरीच्या दरात भरमसाठ वाढ झाली आहे, मात्र त्या प्रमाणात एफआरपी वाढत नाही. कारखान्यांद्वारे ऊस तोडणीच्या वेळी वजन कपात (काटा मारणे) करणे किंवा वाहतूक खर्च शेतकऱ्यांच्या माथी मारणे या समस्या नेहमीच्या आहेत. साखरेच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ करणे, इथेनॉल कोटा वाढवणे, कर्ज पुनर्गठन, व्याज सवलत, शेतकऱ्यांकडून थेट कांदा खरेदी, शेतीमालाचे ग्रेडिंग, कांदा बियाण्यांवर अधिभार आदी शेतकऱ्यांच्या महत्त्वाच्या प्रश्नांबाबत केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्यासोबत झालेल्या सकारात्मक चर्चेमुळे राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. याबाबत लवकरच केंद्र सरकार अनुकूल निर्णय घेणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. साखरेची किमान आधारभूत किंमत वाढवणे गरजेचे असल्याचे केंद्रीय मंत्री शाह यांनी मान्य केले आहे. इथेनॉलचा कोटा मोठ्या प्रमाणात वाढवण्यासाठी येत्या दोन महिन्यांत निर्णय घेण्याबाबत त्यांनी सहमती दर्शवली असून कर्ज पुनर्गठनासंदर्भात राज्य शासनासोबत एकत्रितपणे काम करून मार्ग काढण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. त्यासह व्याज सवलतीचे (इंटरेस्ट सबव्हेंशन ) पैसे तात्काळ देण्याचे मान्य करण्यात आले आहे. 'क्वेल प्राइजिंग' (किंमत नियंत्रण) संदर्भात केंद्राने एक प्रस्ताव मागवला असून, राज्य शासनाकडून तो तयार केला आहे व लवकरच सादर केला जाईल. या प्रकल्पामुळे साखर कारखानदारीचे अनेक प्रश्न सुटण्यास मदत होऊ शकते. नाफेड आणि एनसीसीएफने सुरू केलेली कांदा खरेदी बाजारात थेट व्यापाऱ्यांकडून न होता, थेट शेतकऱ्यांकडून केली पाहिजे ही मागणी मान्य करण्यात आली आहे. २ लाख टनांऐवजी १० लाख टन कांदा खरेदी नाफेड आणि एनसीसीएफने करावी, यावर सकारात्मक निर्णय होण्याची अपेक्षा आहे. सध्या कांद्याचे बियाणे मोठ्या प्रमाणात निर्यात होत असल्याने देशांतर्गत कांद्याला एक्सपोर्ट मार्केट उरत नाही. यासाठी कांदा बियाण्यावर मोठ्या प्रमाणात 'एक्सपोर्ट सरचार्ज' लावला पाहिजे, ही मागणी देखील मान्य करण्यात आली आहे. कांद्याचा खरेदी भाव नुकताच वाढवून १५ रुपये ८० पैसे करण्यात आला आहे. तो आणखी कसा वाढवता येईल यावर पाऊल उचलण्याची गरज आहे. नाफेड किंवा एनसीसीएफमध्ये ग्रेडिंगच्या नावाखाली माल निकृष्ट दर्जाचा दाखवून खरेदी नाकारली जाते. यावर उपाय म्हणून आता यंत्रसामुग्रीच्या माध्यमातून ग्रेडिंग केले जाईल, ज्यामुळे शेतकऱ्यांना योग्य न्याय मिळण्याची अपेक्षा आहे. नवी दिल्ली येथे महाराष्ट्रातील साखर कारखानदारी, ऊस आणि कांदा उत्पादक शेतकरी यांच्या विविध अडचणींसंदर्भात केंद्रीय सहकार मंत्री शाह यांच्यासोबत झालेल्या या बैठकीनंतर शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. केंद्र सरकारने या आशावर पाणी फेरू नये, शेतकऱ्यांसाठी ही बैठक दिलासादायक ठरावी हीच अपेक्षा!

# मागोवा रुपयाच्या घसरणीचा

**परामर्श**

**- हेमंत देसाई,** ज्येष्ठ पत्रकार

डॉलरच्या तुलनेत रुपयाची सातत्याने होत असलेली घसरण ही केवळ चलन बाजारातील तांत्रिक हालचाल नसून भारतीय अर्थव्यवस्थेच्या सध्याच्या वास्तवाचे प्रतिबिंब आहे. चिंतेची बाब म्हणजे केंद्र सरकार आणि भारतीय रिझर्व्ह बँकेकडून परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी अपेक्षित हालचाल दिसत नाही. परिणामी परकीय गुंतवणूकदार विचलीत होत असून भांडवली बाजारातून काढता पाय घेऊ पहात आहेत.

रुपयाचे अवमूल्यन हे काही एका दिवसात समोर आलेले संकट नाही. जागतिक पातळीवरील अस्थिरता, अमेरिकेच्या 'फेडरल रिझर्व्ह'ची व्याजदरवाढ, पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थिती, कच्च्या तेलाचे वाढते दर आणि सुरक्षित गुंतवणुकीसाठी डॉलरकडे वाढणारा ओढा या सर्व कारणांचा परिणाम रुपयावर झाला आहे; मात्र भारतासाठी खरी समस्या अंतर्गत आर्थिक व्यवस्थापनातील कमतरता बाह्य घटकांइतकीच महत्वाची ठरत आहे. आर्थिक सुधारणा, रोजगार निर्मिती, उत्पादनवाढ आणि निर्यातक्षमता या मूलभूत क्षेत्रांमध्ये अपेक्षित प्रगती न झाल्याने रुपयाची ताकद कमी होत गेली. रुपया घसरल्याचा सर्वात मोठा परिणाम सामान्य नागरिकांवर होतो. भारत हा मोठ्या प्रमाणावर आयात करणारा देश आहे. विशेषत: कच्चे तेल, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, यंत्रसामग्री, खते आणि अनेक प्रकारच्या औद्योगिक कच्च्या मालासाठी भारताला परकीय चलन खर्च करावे लागते. रुपया कमजोर झाला, की या आयाती महाग होतात. परिणामी, पेट्रोल-डिझेलचे दर वाढतात. वाहतूक खर्च वाढतो आणि त्याचा थेट परिणाम महागाईवर होतो. किराणा सामानापासून औषधांपर्यंत आणि बांधकाम साहित्यापासून उद्योगधंद्यांपर्यंत सर्वच क्षेत्रांवर याचा परिणाम जाणवतो. सामान्य माणसाच्या खिशावर महागाईचा वाढता ताण ही रुपयाच्या घसरणीची सर्वात कठोर शिक्षा असते. याशिवाय परदेशात शिक्षण घेणारे विद्यार्थी, वैद्यकीय उपचारांसाठी बाहेर जाणारे नागरिक आणि आयात-आधारित उद्योग हे सर्वच रुपयाच्या घसरणीमुळे अडचणीत येतात. डॉलर महाग झाल्याने शिक्षण शुल्क, राहणीमान आणि परदेशातील खर्च प्रचंड वाढतो. त्याचा रोजगारनिर्मितीवरही नकारात्मक परिणाम होतो. या पार्श्वभूमीवर सरकारची भूमिका अधिक प्रश्नांकित ठरते.

सरकारकडून सातत्याने 'भारतीय अर्थव्यवस्था मजबूत आहे' अशी प्रतिमा उभी केली जाते; मात्र रुपयाच्या घसरणीकडे पाहण्याची त्यांची दृष्टी अनेकदा निष्काळजी वाटते. काही केंद्रीय मंत्री आणि धोरणकर्ते रुपया कमजोर नसून डॉलर मजबूत होत असल्याचे स्पष्टीकरण देतात. हे विधान तांत्रिकदृष्ट्या काही प्रमाणात योग्य असले, तरी त्यातून सरकारची जबाबदारी कमी होत नाही. जगातील अनेक उदयोन्मुख अर्थव्यवस्था डॉलरच्या दबावाला सामोरे जात असतानाही आपली चलने तुलनेने स्थिर ठेवण्यात यशस्वी ठरत आहेत. भारतात मात्र चलन बाजारातील हस्तक्षेप मर्यादित आणि प्रतिक्रियात्मक



स्वरूपाचा राहिला आहे. रिझर्व्ह बँकेकडूनही परिस्थिती हाताळताना अपेक्षित आक्रमकता दिसून आलेली नाही. परकीय चलन साठ्याचा वापर करून रुपयाला आधार देण्याचे प्रयत्न झाले असले, तरी ते तात्पुरते आणि अपुरे ठरले.

वास्तविक, चलन स्थिर ठेवण्यासाठी केवळ डॉलर विकणे पुरेसे नसते, तर आर्थिक धोरणांमध्ये सातत्य, गुंतवणूकदारांचा विश्वास, स्थिर व्याजदर धोरण आणि मजबूत निर्यातक्षमता आवश्यक असते; मात्र भारतात वित्तीय तूट वाढत आहे, बेरोजगारीचा प्रश्न गंभीर आहे आणि उत्पादन क्षेत्रातील वाढ अपेक्षेपेक्षा मंद आहे. अशा स्थितीत रुपयावरचा दबाव नैसर्गिकपणे वाढतो. अलिकडच्या काळात परकीय संस्थात्मक गुंतवणूकदारांनी (एफआयआय) भारतीय बाजारातून सातत्याने पैसे काढण्यास सुरुवात केली आहे. जागतिक अस्थिरतेच्या काळात गुंतवणूकदार सुरक्षित बाजारपेठांचा शोध घेतात. अमेरिकन बाँडवरील वाढते परतावे, चीनकडून दिल्या जाणाऱ्या नव्या प्रोत्साहन योजना आणि पश्चिमेकडील बाजारातील स्थिरता यामुळे भारतातील गुंतवणूक तुलनेने कमी आकर्षक वाटू लागली आहे. त्यातच भारतीय शेअर बाजारातील काही क्षेत्रांमधील अवास्तव मूल्यांकन, कॉर्पोरेट गव्हर्नन्सवरील प्रश्न आणि धोरणात्मक अनिश्चितता यामुळे परकीय गुंतवणूकदार सावध झाले आहेत. 'एफआयआय'ची माघार ही केवळ शेअर बाजारापुरती मर्यादित राहत नाही. त्याचा थेट परिणाम रुपयावर होतो. कारण परकीय गुंतवणूकदार भारतीय मालमत्ता विकून डॉलरमध्ये पैसे परत नेतात, तेव्हा डॉलरची मागणी वाढते आणि रुपया आणखी कमजोर होतो. ही दुष्टचक्रासारखी स्थिती निर्माण होते.

भारतासाठी सर्वात चिंताजनक बाब म्हणजे या संकटावर दीर्घकालीन उपाययोजना दिसत नाहीत. निर्यातवाढीबाबत सरकार मोठमोठ्या घोषणा करत असले, तरी जागतिक स्पर्धेत भारतीय उत्पादन क्षेत्र अजूनही मागे आहे. 'मेक इन इंडिया'सारख्या मोहिमा अपेक्षित परिणाम देऊ शकलेल्या नाहीत. उत्पादन खर्च, ऊर्जा दर, धोरणात्मक अडथळे यामुळे भारतीय उद्योगांना स्पर्धात्मक फायदा मिळत नाही. परिणामी, आयात वाढते आणि व्यापार तूट कायम राहते. व्यापार तूट वाढली की डॉलरची गरज वाढते आणि रुपयावर दबाव येतो. ऊर्जा आयातीवरील भारताचे प्रचंड अवलंबित्व हे आणखी एक मोठे संकट आहे. पश्चिम आशियातील प्रत्येक संघर्षाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर थेट परिणाम होतो. तेलाचे दर वाढले, की भारताचा आयात खर्च वाढतो. अशा वेळी मजबूत रुपया देशासाठी सुरक्षा कवच ठरू शकतो; पण रुपयाच कमजोर असेल, तर दुहेरी फटका बसतो.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

# पंतप्रधानांचे आवाहन चर्चेत का ?

**प्रासंगिक**

**- भागा वरखडे,** ज्येष्ठ पत्रकार

युद्धजन्य परिस्थिती, इंधन दरवाढ, रुपयाचे सतत घसरणे या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना इंधनाचा वापर कमी करण्याचे आणि सोने-चांदीची खरेदी टाळण्याचे आवाहन केले. यातून आर्थिक शिस्त, राष्ट्रीय जबाबदारी आणि 'राष्ट्र प्रथम' या विचारसरणीचा संगम दिसून येत असला तरी विषयाला दुसरी बाजूही आहे. सत्ताधारी तसेच विरोधकांनी चर्चेत आणलेल्या यामागील भूमिकांचा मागोवा.

भारत हा जगातील सर्वाधिक कच्चे तेल आयात करणाऱ्या देशांपैकी एक आहे. देशाच्या ऊर्जा गरजांपैकी मोठा हिस्सा परदेशातून आयात केला जातो. कच्च्या तेलाच्या किंमतीत वाढ झाली, की महागाईवर, वाहतूक खर्चावर आणि उद्योगांच्या उत्पादन खर्चावर थेट परिणाम होतो. त्याच वेळी, भारत हा जगातील सर्वात मोठा सोने आयातदार देश आहे. भारतीय समाजात सोने ही केवळ चैनीची वस्तू नाही, तर परंपरा, प्रतिष्ठा आणि सुरक्षित गुंतवणुकीचे प्रतीक आहे. त्यामुळे दरवर्षी अब्जावधी डॉलरचे सोने देशात आयात होते आणि परकीय चलन साठ्यावर मोठा ताण निर्माण होतो. चालू आर्थिक वर्षात सोन्याची आयात सुमारे ७२ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचल्याचे अंदाज



व्यक्त केले जात आहेत, तर कच्च्या तेलाच्या किंमती प्रति पिंप १०७ डॉलरच्या पुढे गेल्याने आयात खर्च झपाट्याने वाढला आहे. अशा परिस्थितीत सरकारसमोर दोनच पर्याय असतात. एक तर आयात बिल आणि आर्थिक तूट वाढू द्यायची किंवा नागरिकांना संयम आणि बचतीचे आवाहन करून आर्थिक दबाव कमी करण्याचा प्रयत्न करायचा.

पंतप्रधान मोदी यांनी अलिकडेच दुसरा मार्ग निवडला. या आवाहनाचा पहिला आणि सर्वाधिक तीव्र परिणाम शेअर बाजारावर दिसून आला. भाषणानंतरच्या पहिल्याच व्यवहार सत्रात ज्वेलरी क्षेत्रातील समभागांमध्ये मोठी घसरण झाली. टायटन, कल्याण ज्वेलर्स आणि सेनको गोल्ड यांसारख्या कंपन्यांच्या शेअर्समध्ये ९ ते १२ टक्क्यांपर्यंत घसरण झाली. बाजाराने हा संदेश थेट ग्राहक मागणीतील संभाव्य घट म्हणून घेतला. ग्राहकांनी प्रत्यक्षात सोनेखरेदी कमी केल्यास कंपन्यांच्या महसुलावर मोठा परिणाम होईल, अशी भीती गुंतवणूकदारांना वाटू लागली. त्यातूनच गेल्या काही दिवसांमध्ये देशात जोरदार मतमतांतरे पहायला मिळाली.

बाजारातील तज्ज्ञ अशा प्रतिक्रियेला 'नी-जर्क रिॲक्शन' मानतात. त्यांच्या मते, भारतातील सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन सोन्याशी इतके घट्ट जोडलेले आहे, की सोनेखरेदी वर्षभर पूर्णपणे थांबवणे व्यवहार्य नाही. लग्नसमारंभ, सण-उत्सव आणि ग्रामीण भागातील बचतीची पद्धत यामुळे सोन्याची मागणी पूर्णपणे कोसळणार नाही; मात्र अल्पकालीन अस्थिरता निश्चितच वाढू शकते. सराफा बाजारातही संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. व्यापाऱ्यांनी सरकारच्या आवाहनाचे स्वागत करतानाच त्याच्या परिणामांविषयी चिंता व्यक्त केली आहे. त्यांच्या मते सोने ही भारतीयांसाठी सुरक्षित गुंतवणूक आहे. **(क्रमश:)**

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

# माऊली आणि समर्थांचा मनोबोध





**|| मना पाहिजे अंकुश ||**

**डॉ. विकास बाहेकर**
नेत्रतज्ज्ञ बुलढाणा
मो.नं ९४२२१८१३२५

मनाविषयी ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, 'मन' इंद्रिय आणि बुद्धी यांच्या संगमावर, रजोगुणाच्या म्हणजेच चंचलत्वाच्या खांद्यावर बसलेले असते. आकाशाचा निळा रंग, मृगजळाच्या लाटा हे जसे आभासी आहे, तसेच 'मन' फसविणारे, आभासी आणि निष्फळरुपाने जन्माला आले आहे. महाभूतांपासून बुद्धी, मन, अहंकार आणि चित्त ही चतुष्टयी उत्पन्न झाली आहे. आकाशाची शुद्धता बुद्धीत, वायूची चंचलता मनात, अग्नीची तापकारकता अहंकारात, पाण्याची द्रवता चित्तात आणि पृथ्वीची स्थिरता सर्वातच आहे. सारांश, वायूचे निखळ चांचल्य मनात आहे.

बुद्धी हे विचारप्रधान तत्त्व आहे आणि मन हे स्वैर, भ्रमप्रधान तत्त्व आहे, कारण मन जेव्हा स्वैरपणाने संकल्पविकल्प आणि मनोराज्य करते. तेव्हा मनाच्या या व्यापारात बुद्धीचा विचार नसतो. म्हणून मन हे बुद्धीच्या बाहेर आहे आणि ते मन अहंकाराच्या उरावर मोठा दगड ठेवल्यासारखे आहे. म्हणून ते अहंकाराला देहादिक अनात्मपदार्थापासून हलू देत नाही व ब्रम्हस्वरुपापर्यंत जाऊ देत नाही. देहाच्या ठिकाणीच अहंकाराला स्थिर ठेवते. सारांश, मन स्वैरपणामुळे बुद्धीच्या बाहेर आहे आणि भ्रांतपणामुळे अहंकाराच्या उरावर बसले आहे. म्हणून बुद्धी आणि देहाचा अहंकार यांच्या मधल्या जागी ते बळकट झाले आहे. मन फारच चंचल आहे. ते शरीर आणि इंद्रिये यांना व्याकूळ करणारे आहे. तसेच बलवान आणि वश न होणारे आहे.

**'हे मन कैसे केवढें। ऐसें पाहों म्हणों तरी न सापडें।**
**एऱ्हवी रहाटावया थोडे। त्रैलोक्य यया ।।'**

हे 'मन' कसे व केवढे आहे याचा विचार करून पाहू म्हटले तर ते कुठेच सापडत नाही. एरव्ही याला फिरण्यास त्रैलोक्य देखील कमीच आहे. अशी ही मनाची चंचलता आणि गतिमानता, त्याचा अनावर स्वभाव स्पष्ट करताना ज्ञानेश्वरांनी म्हटले की, "माकड कधी समाधी अवस्थेइतके शांत बसेल काय? सोसाट्याचा वारा 'थांब' म्हटल्याने थांबेल काय? हे जसे अशक्यप्राय आहे तद्वतच मनाचा निग्रह सुद्धा अशक्यप्रायच किंवा महाकठीण आहे." असे हे मन बुद्धीचा, चांगुलपणाचा द्वेष करते. ज्ञानाचा द्वेष करते, बुद्धीच्या योग्य निश्चयास दूर सारते आणि सात्त्विक धैर्याच्या हातावर टाळी देऊन पळून जाते. ते विवेकशील आचरणाला भुलविते, तृप्त आणि समाधानी अवस्थेमध्येही विषयाचे व्यसन लावून संतोषाचा ऱ्हास करते. आपल्या चंचल स्वभावामुळे मनुष्य देहाने जरी एकाठिकाणी बसलेला असला तरी 'मन' त्याला कल्पनाविश्वात दहाही "दिशांना भटकवते.

मनाचा संपूर्ण विचार 'मनाचे श्लोक' रचून रामदासांनी स्पष्ट केला आहे. त्यांचे स्पष्ट मत असे होते की, माणसाचे जीवन या विश्वजीवनापासून वेगळे करता येत नाही. माणूस हा विश्वाचीच छोटी प्रतिकृती आहे. देहबुद्धीच्या नावाने मन दृश्य, विकारी, विनाशी वस्तुमध्ये आनंद शोधत असते. जेथे तो आनंद नाहीच तेथे तो शोधीत राहण्याचा वेडेपणा सोडून आपल्या मनाने तो भगवंतापाशी शोधावा म्हणून श्री. समर्थांनी मनाच्या श्लोकात 'मना'ची समजूत घातली आहे. 'ज्याचे चिंतन करावे त्याचेच रुप बनावे' हा आपल्या मनाचा मोठेपणा, सद्गुण आहे. यामुळेच नामस्मरणातून ईश्वरचिंतन करीत करीत मानवी मन अखेरीस स्वतः अनंत बनून विश्वमनाशी एकरुप होऊ शकते.

**'मना वासना दुष्ट कामा नये रे।**
**मना सर्वथा पापबुद्धि नको रे।**
**मना धर्म नीति सोडू नको हो।**
**मना अंतरी सार विचार राहो।।'**

या श्लोकात आचरणाची शुध्दता आणि नैतिकताच आध्यात्मिक जीवनात आवश्यक असते असे त्यांनी ठामपणे सांगितले आहे. या अध्यात्म मार्गापासून दूर करीत अधोगतीकडे नेणाऱ्या वासना आणि पापबुद्धीचा त्याग करून, नीती आणि सारासारविचार अंगीकारून आत्मोन्नती साधणे हेच साधकाचे कर्तव्य आहे, असे समर्थांनी म्हटले आहे.

सुख आणि दु:ख या सुद्धा मानसिक अवस्थाच आहेत. चिंता जिवंतपणीच मनाला जाळते. प्रारब्धाधीन जर जीवन असेल तर शुद्ध कर्मयोगाने प्रारब्ध बळकट करावे, त्यासाठी मिथ्याचार, अवडंबर, पाखंड इ. त्यागून सत्याची कास धरावी. सर्व वासना, कामनांचा त्याग करावा. म्हणजे जन्ममरणाच्या चक्रातून सुटका होऊन मुक्ती अथवा मोक्ष प्राप्त होईल. मानसिक दोष गेल्याशिवाय साधनेचा मार्ग स्पष्ट होत नाही. ज्ञानाला वैराग्यानेच सामर्थ्य प्राप्त होते आणि याच सामर्थ्याने मुक्ती, मोक्ष प्राप्त करून घेता येतो. अशाप्रकारे मानसिक परिवर्तनच मोक्षाचा मार्ग आहे. या परिवर्तनासाठी परिपूर्ण दिग्दर्शन करणारा दीपस्तंभ म्हणून 'मनाचे श्लोक' या ग्रंथाचा गौरवपूर्वक उल्लेख करावा लागेल.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

# सरकारच्या चुकीच्या धोरणाला कॉकरोच डंक मारणार का?



**- रमेश लांजेवार**
नागपूर,
मो. ९९२१६९०७७९

आता कॉकरोचचे वादळ थांबायचे नाय ! देश विकासाच्या प्रगतीचे पथावर आहे ही बाब सत्य आहे,तरीही देशात बेरोजगारी, कुपोषण, भुकमरी, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां, बेरोजगारांच्या समस्या, शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार आणि इतर क्षेत्रातील भ्रष्टाचार या सारख्या गंभीर समस्या आजही देशात घर करून बसल्या आहेत. कारण वाढल्या भ्रष्टाचाराने देशाला पोखरून टाकले आहे.

वाढती बेरोजगारी व महागाईचा कळस यात बेरोजगार तरूण भरडल्या जात आहे आणि आता बेरोजगारांची तुलना कॉकरोच सोबत करून बेरोजगारांच्या जखमेवर मीठ चोळन्याचे काम सरन्यायाधीशांनी केले. त्यामुळे याचे पडसाद संपूर्ण देशभर व देशाच्या बाहेर सुद्धा उमटतांना दिसत आहे. आज देशातील वाढत्या बेरोजगारीमुळे युवा वर्ग त्रस्त आहे आणि यात महागाईने मोठी भर टाकुन देशाच्या युवावर्गासोबतच देशाच्या १४० कोटी जनतेला व्दीधेमध्ये टाकले. सरकारने स्वतःच्या स्वार्थासाठी अनेक मोफत सुविधा अंमलात आणुन आम जनतेच्या खिशाला मोठी कात्री लावली आहे व देशाची अर्थव्यवस्था चौपट झाल्याचे दिसून येते. यामुळे देशात शेतकरी वर्ग, बेरोजगार युवक,आम जनता अत्यंत त्रस्त आहे. कारण सरकारने लावलेली मोफतच्या योजना याची संपूर्ण झळ महागाईच्या रूपात देशाच्या गरीब भोळ्याभाबड्या जनतेला भोगावी लागते आहे. मुख्य न्यायाधीश सूर्यकांत यांनी एका सुनावणी दरम्यान देशातील बेरोजगार तरूणांना झुरळ (कॉकरोच) म्हटले. ते म्हणाले की, काही बेरोजगार तरूण झुरळांसारखे (कॉकरोच सारखे) असतात, जे नंतर मीडिया, सोशल मीडिया किंवा आरटीआय कार्यकर्ते बनून व्यवस्थापनेवर हल्ला करू लागतात. या त्यांच्या वक्तव्याने देशातच नाही तर संपूर्ण जगभरात सोशल मीडियाच्या माध्यमातून खळबळ उडाली. शेवटी सरन्यायाधीशांनी म्हटले की, माझ्या वक्तव्याचा विपर्यास लावला. ही बाब आम्हीही समजु शकतो किंवा सत्य राहु शकते यात दुमत नाही.

झुरळ (कॉकरोच) या शब्दने देशातील संपूर्ण बेरोजगार तरूणांनवर एवढा मोठा घाव केला की, तो भरून निघने शक्य नाही. कारण देशात आपण ताजे नीट पेपर लिक प्रकरण पहाले यात २५ हजार युवकांना त्याची झळ सोसावी लागत आहे व त्यांची मनःस्थिति विस्कळीत झाली आहे आणि चार ते पाच युवकांनी या प्रकरणाला कंटाळून आत्महत्या सुध्दा केल्याचे दिसून येते. म्हणजे तरूणांच्या डोळ्यासमोर शिक्षण प्रणालीची खुली हत्या होत आहे, त्याचप्रमाणे शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात लुट




आताही सुरूच आहे, देशात करोडोंचे प्रोजेक्ट आल्याचे मिडियाच्या माध्यमातून सरकार कडून सांगितले जाते परंतु बेरोजगारांना अजुनही रोजगार उपलब्ध झालेला नाही, आज देशातील प्रत्येक जिल्ह्यातील किंवा शहरातील युवकांना त्यांच्या स्थानिक ठिकाणी रोजगार उपलब्ध नसल्याने आपला परिवार सोडून मुंबई, बंगलोर, पुणे, हैदराबाद, अहमदाबाद इत्यादी अनेक ठरावीक ठिकाणी रोजगारासाठी युवा वर्ग जातांना दिसतो. परंतु देशातील अनेक राज्यात स्थानिक पातळीवर पाहिजे त्याप्रमाणात रोजगार सरकार उपलब्ध करून देवू शकली नाही ही देशाची शोकांतिका आहे. त्यामुळे काही युवावर्ग पुणे, मुंबई, हैदराबाद, बंगलोर, अहमदाबाद अशा नामांकित ठीकाणी धाव घेतांना दिसतात. अशा ठिकाणी त्यांना रोजगार मिळाला तर ठीक आहे अन्यथा हताश होऊन आत्महत्या होतांना सुध्दा आपण पहिले आहे. अशा परिस्थितीत देशाचे उच्च पदस्थ अधिकारी बेरोजगारांची तुलना "कॉकरोच"सोबत करीत असेल तर हे स्वतंत्र भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.

सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी १५ मे २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयात एका खटल्याची सुनावणी करताना बेरोजगार तरुणांची तुलना झुरळांशी (कॉक्रोच) केली होती. वरिष्ठ वकील दर्जा मिळवण्याच्या याचिकेवर सुनावणी सुरू असताना, "काही बेरोजगार तरुण झुरळांसारखे असतात, जे नंतर मीडिया, सोशल मीडिया किंवा आरटीआय कार्यकर्ते बनून व्यवस्थेवर हल्ला करू लागतात," असे ते म्हणाले होते. या वक्तव्यामुळेच देशभरात मोठे वादळ निर्माण झाले. यावर प्रतिक्रिया उमटत असताना, सरन्यायाधीशांनी नंतर स्पष्टीकरण दिले की, त्यांचे हे वक्तव्य भारतातील सर्वसामान्य तरुणांविषयी नसून, बनावट पदव्या असलेल्या आणि समाजमाध्यमांवरून विनाकारण यंत्रणेला लक्ष्य करणाऱ्या विशिष्ट घटकाबाबत होते. हीबाब ठीक आहे व सत्य राहु शकते. परंतु कॉकरोच या शब्दरचनेमुळे युवकांमध्ये एक जागृता निर्माण झाली आहे आणि कॉकरोचचा झुंड ( युवावर्ग) एकत्र झाला तर सरकारची मनमानी आणि भ्रष्टाचार बंद झाल्याशिवाय रहाणार नाही. आज देशाच्या प्रत्येक बेरोजगार तरूणांच्या मनात राजकीय पुढाऱ्यांन विषयीं व्देशभावना दिसून येते कारण आजी-माजी लोकप्रतिनिधी-जनप्रतिनिधी यांचे वेतन, भत्ते, पेंशन, गाडी, बंगला, मोठ्या प्रमाणात करोडों रूपयांची चलअचल संपत्ती ही बाब नेहमी काळजात खुपत असते. कारण हे लोकप्रतिनिधी पाच वर्षात करोडपती होतात.

लोकप्रतिनिधी-जनप्रतिनिधी हा देशाची जनतेची सेवा करण्यासाठी निवडून दिलेला प्रतिनिधि असतो. परंतु देशसेवा व जनसेवेला पाठ दाखवून स्वतःच्या सेवेत जास्त मग्न असतो आणि तेथुनच भ्रष्टाचाराचा उगम होतो. आज याच राजकीय पुढाऱ्यांमुळे देशाच्या सरकारी शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहेत. कारण याच राजकीय पुढाऱ्यांनी आपली मोठमोठी शाळा-महाविद्यालये खोलुन व्यवसाय थाटला आहे आणि आपल्या मुलांना शिक्षणासाठी विदेशात पाठवितात. यावरून स्पष्ट होते की, देशाच्या राजकीय पुढाऱ्यांनी स्वतःच्या स्वार्थासाठी देशाच्या शिक्षण व्यवस्थेला पोखरून टाकले आहे. त्यामुळे खरोखरच देशाला कॉकरोचची गरज आहे असे मला वाटते. कदाचित सरन्यायाधीशांना वाटले असावे की, युवा क्रांती व्हावी आणि तोच शब्द त्यांच्या तोंडून निघावा ही एक बेरोजगार तरूणांनसाठी टर्निंग पॉईंट असु शकतो आणि आता खरोखरच देशातील युवा बेरोजगार वर्ग एकत्र येण्याची खरी वेळ आली आहे.

अमेरिका-इजरायल-इराण युध्दाला सुरुवात २८ फेब्रुवारी २०२६ ला सुरूवात झाली आणि या काळात देशातील पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका सुध्दा झाल्यात, मंत्री, प्रधानमंत्री, राज्यांचे मुख्यमंत्री, विरोधी पक्ष नेते इत्यादी संपुर्ण राजकीय फौजफाटा पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीमध्ये दोन महिने प्रचारात व्यस्त होता. या काळात करोडो लिटर पेट्रोल-डिझेलचा वापर झाला आणि मोठ्या देशाचा पैसा खर्च झाला तेव्हा पेट्रोल-डिझेल भाव एक पैसाही वाढला नाही व अर्थव्यवस्थेवर काहीच झळ पोहोचली नाही आणि आता युद्ध थांबता बरोबर व विधानसभा निवडणुका संपल्या बरोबर पेट्रोल-डिझेलचे भाव दहा दिवसांत चार वेळा वाढविण्यात आले हि गंभीर बाब आहे. कारण पेट्रोल -डिझेलमुळे सरकारला ७७ हजार कोटींचा नफा असुनही पेट्रोल-डिझेलचे चौथ्यांदा भाव वाढने ही देशासाठी धोक्याची घंटा आहे आणि सरकार सांगते की, देशाची अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी आपण हे भाववाढ करीत असल्याचे सरकार मार्फत सांगितले जात आहे. सरकार भाव वाढीचे कारण आंतरराष्ट्रीय आयात-निर्यातचे कारण सांगत आहेत. ही तर देशाची व देशाच्या युवावर्गाची फसवेगिरीच म्हणावी लागेल. सरकार खोटी आश्वासने देऊन बेरोजगार तरूणांनच्या जखमेवर मीठ चोळन्याचे काम करीत आहेत. त्यामुळे कॉकरोच आता सरकारला सुखाची झोप कदापि घेऊ देणार नाही. हा तरूणांनसाठी एक चांगला टर्निंग पॉईंट राहावा असे मला वाटते.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक **सुरेश बाबुराव देवकर** यांनी भास्कर प्रकाशन प्रा.लि.प्लॉट नं. टी ५१, फेज नं.४ एमआयडीसी ग्रोथ सेंटर अकोला येथे मुद्रित करुन दैनिक महाभूमि मुख्य कार्यालय, बी.के. कॉम्प्लेक्स, धाड नाका, बुलढाणा- ४४३००१ येथे प्रसिद्ध केले.मुख्य संपादक- **सुरेश बाबुराव देवकर** कार्यकारी संपादक-**ब्रह्मानंद रुपराव जाधव** (पीआरबी कायद्यानुसार मजकुराच्या निवडीची जबाबदारी यांची) आर.एन.आय.नं. MAHMAR/२०२३/८९१४८ पोस्टल नं.बीएलडी /२३९/२०२५-२७ ईमेल-**dainikmahabhoomi@gmail.com.** कार्यालय मोबा. **8960040018/19** (बुलढाणा न्यायालय कक्षेत)

दैनिक महाभूमि

This newspaper is printer, publisher and editor and Owner by **Suresh Baburao Deokar** Printed at Bhaskar Prakashan Pvt.Ltd Plot no.T-51, Phase No.4 MIDC Growth Center Akola (Maharashtra) Published at Head Office : DAINIK MAHABHOOMI B.K.Complex, Dhad Naka, Buldhana-443001, (M.S.) Executive Editor : **Bramhanand Ruprao Jadhao** **RNI No.MAHMAR/2023/89148 POSTAL NO.BLD/239/2025-27**

दैनिक महाभूमि

छत्रपती
# संभाजीनगर भूमि

शुक्रवार, २९ मे २०२६

mahabhoomimarathwada@gmail.com

## स्वातंत्र्यवीर सावरकर जयंतीचा शहरात उत्साह



छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त शहरात विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि देशभक्तीपर कार्यक्रमांचे गुरुवार, २८ मे रोजी आयोजन करण्यात आले असून संपूर्ण शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती महोत्सव समितीच्या वतीने दिवसभर विविध उपक्रम राबविण्यात येत असून नागरिकांचा प्रतिसाद मिळाला.

गुरुवारी सकाळी ८ वाजता समर्थनगर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून झाली. यावेळी विविध संस्था, सामाजिक संघटना, राजकीय पक्ष, युवक मंडळे आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून सावरकरांना अभिवादन करण्यात आले. यावेळी मंत्री अतुल सावे, महापौर समीर राजूरकर, सभापती अनिल मकरिये, माजी खासदार चंद्रकांत खैरे, नंदकुमार घोडेले, जालिंदर शेंडगे, सागर निळकंठ, भाऊ सुरडकर, सुभाष कुमावत, किरण सराफ, विजय जहागिरदार, जगदीश हर्सूलकर, गोपाल कुलकर्णी, गोविंद कुलकर्णी, साधना सुरडकर, कीर्ती शिंदे, अमृता पलोदकर, किशोर मानकापे, प्रदीप बुरांडे, मकरंद कुलकर्णी, सुरेंद्र कुलकर्णी, सुहास ठोसर, राजेश मेहता, अभिषेक कादी, सुधीर नाईक, सचिन खैरे, संजय मांडे, साहेबराव निकम, मुकेश शर्मा, प्रवीण कुलकर्णी, सुनील खोचे यांच्यासह आदींची उपस्थिती होती. दरम्यान, स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीनिमित्ताने सर्मथनगर येथे स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती महोत्सव समितीच्या वतीने रक्तदान शिबीर घेण्यात आले. यावेळी रक्तदान करून रक्तदात्यांनी अनोख्या पध्दतीने स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अभिवादन केले.

## न्यूज ब्रीफ

### स्वा. सावरकर यांना अभिवादन

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात स्वा. सावरकर जयंतीनिमित्त गुरुवार, १४ मे रोजी अभिवादन करण्यात आले.या निमित्त मुख्य ईमारतीतील स्वा.सावरकर यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ विजय फुलारी यांनी पुष्पहार अर्पण केला. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ.गणेश मंझा, अधिष्ठाता डॉ.भास्कर साठे, डॉ.वैशाली खापर्डे, डॉ.विना हुंबे, परीक्षा मंडळ संचालक डॉ.बी. एन.डोळे, विद्यार्थी विकास मंडळ संचालक डॉ.कैलास अंभुरे, आजिवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाचे संचालक डॉ.अश्विन रांजणीकर आदी उपस्थित होते.

### गुटखा, गोमांस घेऊन जाणाऱ्यास अटक


**वैजापूर :** येवला रस्त्यावरील नांदगाव फाट्याजवळ दुचाकीवरून गुटखा व गोमांस घेऊन जाणाऱ्याविरुद्ध वैजापूर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमजद हमीद खान पटेल (रा. तलवाडा, ता. वैजापूर) असे आरोपीचे नाव आहे. बुधवार, २७ मे रोजी सकाळी ११ वाजता अमजद हा दुचाकीवरून (एमएच १५ केटी ५७६१) ३ गोण्यांत गुटखा घेऊन जात असल्याचे पोलिसांना कळाले होते. गुटखा व ४ किलो गोमांसासह दुचाकी जप्त केली असून कॉन्स्टेबल शांताराम दिवेकर यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### वाळू विक्रेत्यांवर कारवाई करा

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील मुख्य रस्त्यांवर फर्निचर व्यावसायिकांनी आपले साहित्य रस्त्यावर ठेवलेले आहे. त्याचप्रमाणे वाळू, विटा आणि खडी विक्रेतेही रस्त्यावर साहित्य विकतात. अशा व्यापाऱ्यांवर कारवाई करावी असे निर्देश मंगळवारी आढावा बैठकीत मनपा आयुक्त येडगे यांनी दिले.

## उकाड्यामुळे अंगाची लाहीलाही, पावसाची प्रतीक्षा

# सूर्य कोपला : उन्हाचा पारा ४१ अंशावर, शहरवासीय घामाघुम




छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी

शहरासह तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून सूर्याचा पारा चढला असून, उन्हाच्या तीव्र झळांनी नागरिक हैराण झाले आहेत. विशेष म्हणजे, आकाशात अधूनमधून येणाऱ्या ढगाळ वातावरणामुळे हवेतील आर्द्रता वाढली असून, उकाड्यामुळे अंगाची लाहीलाही होत आहे. उन्हाच्या तडाख्यामुळे दुपारच्या वेळी बाजारपेठेत शुकशुकाट पाहायला मिळत आहे. दरम्यान, गुरुवार, २८ मे रोजी उन्हाचा पारा ४१ अंशावर गेल्याने शहरवासीय घामाघुम झाले होते.

मे महिन्याचा अखेरचा आठवडा सुरू असून कधी ढगाळ वातावरण तर कधी वादळी वारे सुटत आहे. गेल्या तीन ते चार दिवसात छत्रपती संभाजीनगर शहरासह ग्रामीण भागात उन्हाची तीव्रता प्रचंड वाढली आहे. सकाळी १० वाजेपासूनच उन्हाचे चटके जाणवू लागले आहेत. दुपारी १२ ते ४ या वेळेत रस्ते ओस पडत आहेत.

वाढत्या उष्णतेमुळे आरोग्यावरही परिणाम होत आहे. सध्या आकाशात ढगांची गर्दी होत असली तरी पाऊस पडण्याऐवजी वातावरणात कमालीचा उकाडा निर्माण झाला आहे. ढगांमुळे उष्णता जमिनीलगतच राहत असल्याने नागरिकांना घामाच्या धारा सोसाव्या लागत आहेत. घराघरांत आता पंखे आणि कूलरचा वापर वाढला असून, दुपारच्या वेळी घराबाहेर पडणे कठीण झाले आहे.

दरम्यान, उन्हाच्या तीव्रतेमुळे शहरातील वाहतूक दुपारच्यावेळी मंदावत असून बाजारपेठेत ग्राहकांची संख्या देखील रोडावली आहे. दुपारी कडाक्याचे ऊन पडत नसल्याने शहरवासीय दुपारी बारा वाजेपूर्वी कामे आटोपण्यावर भर देत आहेत. तसेच केवळ अत्यावश्यक कामासाठीच लोक घराबाहेर पडत आहेत. डोक्याला रुमाल बांधून आणि टोपी परिधान करुन घराबाहेर पडत आहेत.

### नागरिकांनी उन्हात फिरणे टाळावे

■ वाढत्या उन्हाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी भरपूर पाणी प्यावे, डोक्याला रुमाल किंवा टोपी वापरावी आणि शक्यतो दुपारी उन्हात फिरणे टाळावे, असे आवाहन मनपाचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. पारस मंडलेचा यांनी केले आहे. तसेच उष्माघाताचा त्रास जाणवत असल्यास नजीकच्या मनपा आरोग्य केंद्रास भेट देऊन औषधोपचार घ्यावे असे आवाहन देखील त्यांनी केले आहे.

## शाळेच्या बसमधून डिझेल चोरणारा गजाआड

### करमाड पोलिसांनी आरोपीसह कार केली जप्त




करमाड / प्रतिनिधी

परिसरात उभ्या असलेल्या शाळेच्या बसमधून डिझेल चोरी करणाऱ्या आरोपीला करमाड पोलिसांनी अटक केली असून त्याच्याकडून चोरीतील डिझेल व गुन्ह्यात वापरण्यात आलेली कार जप्त करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रल्हाद रामा जाधव (रा. पिंप्रीराजा) यांनी गुरूवार, २१ मे रोजी करमाड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. नंदनवन हॉटेलसमोर उभ्या असलेल्या शाळेच्या बसमधून अज्ञात चोरट्याने सुमारे १०० लिटर डिझेल चोरी करून नेल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले होते. त्यानुसार करमाड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस निरीक्षक सम्राटसिंग राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार विजयसिंग जारवाल, प्रशांत नांदवे, दादासाहेब ढवळे, सोपान डकले व कपूर चव्हाण यांच्या पथकाने तपासाची चक्रे फिरविली. गोपनीय माहितीच्या आधारे गणेश प्रल्हाद अकाळ (रा. भोरसी, ता. चिखली, जि. बुलढाणा) यास ताब्यात घेण्यात आले.

चौकशीदरम्यान आरोपीने साथीदारांसह चोरी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी आरोपीकडून २० लिटर डिझेल तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेली कार क्रमांक (एमएच-०३-बीई-३३२७) जप्त केली आहे. या प्रकरणातील इतर साथीदारांचा शोध सुरू असून पुढील तपास जमादार विजयसिंग जारवाल करीत आहेत.

### सहा जणांचे मोबाइल लंपास

**खुलताबाद :** येथे भरणाऱ्या आठवडी बाजारात मोबाइल चोरी करणाऱ्या टोळीने तब्बल सहा जणांचे महागडे मोबाइल लंपास केले. एकाच दिवशी एवढ्या मोठ्या प्रमाणावर चोऱ्या झाल्याने बाजारपेठेत खळबळ उडाली आहे. बाजारात गर्दी वाढलेली असताना दुपारी तीन वाजेच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी नागरिकांच्या खिशातील मोबाइल लांबवले.

चोरी गेलेल्या मोबाइलमध्ये खुलताबाद तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर मातकर, छत्रपती संभाजीनगर येथील कंत्राटदार भाऊसाहेब मुंडवाडकर यांच्यासह शहरातील इतर नागरिकांच्या मोबाइलचा समावेश आहे. याप्रकरणी संबंधितांनी खुलताबाद पोलिस ठाण्यात धाव घेतली आहे.

## छावणी ईदगाहमध्ये नमाज अदा करून जनकल्याणासाठी विशेष प्रार्थना

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी

बकरी ईदच्या (ईद-उल-अजवा) निमित्ताने गुरुवार, २८ मे रोजी शहरातील छावणी ईदगाह परिसरात भक्ती, उत्साह आणि बंधुभावाचे अनोखे चित्र पाहायला मिळाले. मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने ईदगाह मैदानावर उपस्थित होते. यावेळी जवळपास ५० हजार बांधवांनी एकाचवेळी नमाज अदा करून जनकल्याणासाठी प्रार्थना केली.

शहर, राज्य आणि देशात शांतता नांदावी, समाजात सलोखा टिकून राहावा तसेच सर्वसामान्य जनतेच्या कल्याणासाठी विशेष दुआ करण्यात आली. जवळपास ५० हजारांहून अधिक मुस्लिम बांधवांनी या सामूहिक नमाजात सहभाग नोंदविला. सकाळी सात वाजल्यापासूनच शहरातील विविध भागांतून नागरिक ईदगाहकडे येऊ लागले होते. अनेकजण दुचाकी, चारचाकी तसेच पायी चालत नमाजासाठी पोहोचले.

नमाज झाल्यानंतर हाफीस मोहम्मद जाकीर यांच्या मार्गदर्शनाखाली नमाज अदा करण्यात आली. यानंतर मौलाना मोहम्मद नसमोद्दिन मिफ्ताही, शेख अलहदीस आणि कासीफुउल्लूम यांनी कुर्बानीवर मार्गदर्शन केले. यावेळी समाजातील गरीब, गरजू आणि वंचित घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचविणे हीच खरी ईद आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी डॉ. जावेद मुखर्रम यांनी सध्याच्या सामाजिक आणि जागतिक परिस्थितीवर भाष्य केले. आज परिस्थिती कोणतीही असो, एकमेकांशी प्रेमाने वागणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

प्रेम, भाईचारा आणि माणुसकी जपण्याचा संदेश आजच्या दिवशी देतो असे ते म्हणाले. तसेच समाजातील गरजू घटकांना मदत करण्याचे आवाहनही त्यांनी केले. गरजूंच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण करणे, त्यांना मदतीचा हात देणे आणि समाजात समानतेची भावना निर्माण करणे हीच खरी ईद साजरी करण्याची पद्धत आहे. असेही त्यांनी स्पष्ट केले. मौलाना अब्दुल कादिर यांनी देखील मार्गदर्शन केले. मोहमान नदवी यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. जावेद खान यांनी ईदगाहचा अहवाल सादर केला.

## पंचगंगा शुगर कारखान्यात 'मिल रोलर' पूजन उत्साहात




वैजापूर / प्रतिनिधी

तालुक्यातील महालगाव येथे असलेल्या पंचगंगा शुगर अँड पावर प्रा. लि. कारखान्याच्या आगामी गळीत हंगाम २०२६-२७ च्या पार्श्वभूमीवर कारखान्याचे चेअरमन प्रभाकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवार, २८ मे रोजी मिल रोलर पूजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

महालगाव येथील पंचगंगा शुगर ॲण्ड पावर प्रा. लि. कारखान्याच्या आवारात झालेल्या या कार्यकमात मिल रोलरचे पूजन संस्थेचे संचालक सचिन माने यांच्या हस्ते सपत्नीक करण्यात आले. याप्रसंगी कारखान्याचे मार्गदर्शक उत्तम गोविंदराव शिंदे, संचालक मंडळातील बाळासाहेब उत्तमराव शिंदे, बाबासाहेब उत्तमराव शिंदे, कार्यकारी संचालक विवेक बाळासाहेब शिंदे, सी.ए. भाऊराव गायकवाड, कॅप्टन प्रशांत माने, प्रबोध प्रभाकर शिंदे, सुधीर माने, तेजस बाबासाहेब शिंदे यांच्यासह कारखान्याचे सर्व अधिकारी, विभागप्रमुख, अभियंते, कर्मचारी उपस्थित होते.

## वैजापूर तालुक्यातील वाळु घाटाची लिलाव प्रक्रिया रखडली; वाळु तस्करांना सुगीचे दिवस

वैजापूर / प्रतिनिधी

तालुक्यातील सात वाळू घाटांपैकी केवळ दोन गटातून वाळु उपवास प्रशासनाकडून परवानगी मिळाली असून उर्वरित पाच गटांचा अद्याप लिलाव झालेला नाही. पावसाळा तोंडावर आला असतानाही प्रशासनाची लिलाव प्रक्रिया रखडल्याने वाळू माफियांना अवैध वाळू उपशासाठी रान मोकळे झाले आहे. रात्रीच्या वेळी नदीपात्रातून मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा सुरू आहे. दररोज शेकडो ब्रास वाळूची चोरी होत असून शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत असून महसूल प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे अशी मागणी नागरिकांतून करण्यात येत आहे.

वैजापूर तालुक्यातून गोदावरी व शिवना या दोन नद्या वाहतात. या दोन्ही नद्यांच्या माध्यमातून शासनाला मोठा महसूल वाळु लिलावातून मिळतो. गोदावरी नदीच्या अव्वलगाव, नागमठाण, वांजरगाव, बाभूळगाव गंगा व शिवना नदीच्या राजुरा, उंदीर वाडी, लाखणी, झोलेगाव व शहाजतपूर, लासुरगाव या सात घाटात ६० हजार ८४ ब्रास वाळू उपलब्ध आहे. याशिवाय महसूल प्रशासनाने डाग पिंपळगाव व बाभुळगाव गंगा येथे वाळु साठे जप्त केले आहेत. हे दोन्ही साठयात ४ हजार ३१८ ब्रास वाळू उपलब्ध आहे. कोटी रुपयांचा महसूल मिळेल इतका वाळु साठा उपलब्ध असताना या वाळु गटाची लिलाव प्रक्रिया रखडली आहे.

महसूल विभाग आणि संबंधित यंत्रणांकडून पावसाळ्यापूर्वी वाळू उपसा घाटांचा लिलाव होणे अपेक्षित असताना प्रशासनाच्या दिरंगाईमुळे परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. वाळु माफीया या वाळुची चोरी करण्यासाठी सक्रिय झाले असून लिलाव न झाल्याने त्यांना रान मोकळे झाले आहे. तालुका स्तरीय तांत्रिक समीतीने सात वाळु घाटांत ६० हजार ८४ ब्रास वाळू उपलब्ध असल्याचे ११ जुलै २०२५ रोजी वरीष्ठ कार्यालयाला कळवले आहे.

२०२५ -२०२६ या वर्षीच्या लिलावासाठी ही वाळु उपलब्ध आहे.मात्र आतापर्यंत लिलाव प्रक्रिया रखडली आहे.

सात वाळू घाटांपैकी शिवना नदी गटाच्या शहाजतपूर, लासुरगाव व झोलेगाव या दोन गटाची लिलाव प्रक्रिया पुर्ण होऊन वाळु उपशास परवानगी मिळाली आहे. शहाजतपूर, लासुरगाव गटाचा लिलाव शिला अनिल औताडे रा. छत्रपती संभाजीनगर यांनी ४०८१ ब्रासचा २२ लाख ९ हजार ७४० रुपयांच्या बोलीत घेतला आहे. तर झोलेगाव गटाचा ठेका आदीनाथ नवनाथ मुळे रा देवळी ता कन्नड यांनी घेतला आहे.या घाटांतून शासनाला अपेक्षीत रक्कमेपेक्षा तीन पट अधिक रक्कम मिळाली आहे.या गटात ३५७६ ब्रास वाळू उपलब्ध आहे. शासनाला या वाळुतून १९ लाख ३१ हजार ४० रुपये अपेक्षित होते.मात्र मुळे यांनी ५७ लाख पाच हजार रुपये बोली लावून हा ठेका घेतला. तर जप्त असलेल्या डाग पिंपळगाव येथील १५०३ ब्रास वाळुचा ठेका स्मीता अनुराग शिंदे यांनी ११ लाख १३ हजार ३१२ रुपयांत घेतला. तसेच बाभूळगाव गंगा येथील जप्त असलेल्या २८१५ ब्रास वाळुचा ठेका योगेश केशव घंगाळे यांनी २१ लाख ३० हजार ९९२ रुपयांत घेतला.

## हिरडपुरीत सोडले पाणी

**पैठण :** कडक उन्हाळ्यामुळे पाण्याचे संकट झेलणाऱ्या पैठण तालुक्यासाठी अखेर दिलासादायक बातमी समोर आली आहे. गोदावरी नदी पात्राच्या कडेला असलेल्या गावांमध्ये निर्माण झालेली तीव्र पाणीटंचाई आणि जनावरांच्या पाण्याचा प्रश्न लक्षात घेता, जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार बुधवार, २७ मे रोजी सुमारास जायकवाडी धरणातून दोन बंधाऱ्यांकडे प्रत्येकी १०० क्युसेक वेगाने पाणी सोडण्यास सुरुवात करण्यात आली आहे.

## पक्षी पाकोळी पक्षास निसर्गमित्राने दिले जीवनदान

नाचनवेल / प्रतिनिधी

येथील निसर्गमित्र देविदास थोरात यांनी पक्षी पाकोळी नावाच्या पक्षाला जीवनदान दिले आहे. निसर्ग मित्र थोरात यांनी गेल्या दहा ते बारा वर्षात शेकडो पशु-पक्ष्यांना जीवनदान देत त्यांना निसर्गाच्या सानिध्यात सोडले आहे.

नाचनवेल येथील मारुती मंदिर परिसरात शिक्षक अंकुश थोरात यांना आपल्या गाडीजवळ एक काळसर रंगाचा छोटा पक्षी दिसला. त्यांनी तत्काळ त्याला पाणी पाजले मात्र त्याला उडता येत नव्हते. त्यांनी निसर्गमित्र देविदास थोरात यांना याची माहिती दिली. निसर्गमित्र देविदास थोरात यांना हा पक्षी पाकोळी नावचा पक्षी असल्याचे निदर्शनास आले. चिमणीच्या आकाराचा हा पक्षी असून तो साधारण: आठ ते नऊ महिने आकाशात उडत असतो. त्यानंतर दोन महिन्यासाठी तो



खाली जमिनीवर प्रजनन करण्यासाठी येतो. दुर्मिळ होत असलेल्या या पक्षाच्या पायाची बोटे आखूड व नाका मजबूत असतात. या पक्षाला तारेवर किंवा झाडावर बसता येत नाही. त्यामुळे हा पक्षी हवेतच उडतांना झोप घेतो अशी माहिती निसर्ग मित्र देविदास थोरात यांनी दिली. तसेच कोणाला जखमी पशु, पक्षी आढळून आल्यास त्याची माहिती निसर्ग मित्रांना देऊन सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

## फर्दापूर पाणीपुरवठा योजनेसाठी शासनाकडून ५० लाख रुपये मंजूर

सावळदबारा / प्रतिनिधी

सोयगाव तालुक्यातील सावळदबारा-फर्दापूर सर्कलमधील गावांना पाणीपुरवठा योजना सुरळीत व्हावी यासाठी राज्यशासनाने ५० लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. फर्दापूर येथील पाणीपुरवठा योजनेसाठी निधी मिळावा यासाठी भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यांनी शासनाकडे पाठपुरावा केला होता. फर्दापूर येथील पाणी पुरवठा योजनेसाठी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर करुन आणल्याबद्दल भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांनी त्यांचा गुरुवार, २८ मे रोजी सत्कार केला आहे.

सोयगाव तालुक्यातील सावळदबार - फर्दापूर सर्कलमधील विविध गावांना सुरळीतरित्या पाणीपुरवठा व्हावा यासाठी शासनाने निधी द्यावा यासाठी भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यांनी पाठपुरावा केला होता.

शासनाने या योजनेसाठी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

सावळदबारा-फर्दापूर सर्कलमधील गावांच्या पाणीपुरवठ्यासाठी शासनाने ५० लाख रुपयांचा निधी मंजूर केल्याबद्दल भाजपचे तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांनी त्यांचा गुरुवारी सत्कार केला. यावेळी फर्दापूर जिल्हा परिषद सदस्य माहिन इद्रिस मुलतानी, फर्दापूर पंचायत समिती सदस्य राहुल राठोड, सभापती उत्तम चव्हाण यांची उपस्थिती होती.



### डॉ. महेंद्र शिरसाठ यांनी खेचून आणला २० कोटीचा निधी

## विद्यापीठात दोन दशकात राबविले २८ संशोधन प्रकल्प

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील पदार्थविज्ञान विभागातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ.महेंद्र शिरसाठ यांनी गेल्या २३ वर्षात तब्बल २० कोटीचा निधी खेचून आणला आहे. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय संस्थाकडून प्राप्त निधी संशोधन प्रकल्प राबविण्यात आले आहेत.

पदार्थविज्ञान विभागातील अध्यापक, संशोधक असलेले डॉ.शिरसाठ इलेक्ट्रॉनिक्स व दिनदयाल उपाध्यास कौशल्य केंद्राचे संस्थापक विभागप्रमुखही आहेत. उच्च शिक्षण क्षेत्रातील ३८ वर्षांच्या अध्ययन, संशोधन सेवेनंतर येत्या शनिवार, ३० मे रोजी निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी दुपारी ४ वाजता महात्मा फुले सभागृहात हा कार्यक्रम होत आहे. डॉ.महेंद्र शिरसाठ हे ऑगस्ट २००३ पासून विद्यापीठातील पदार्थ विज्ञान विभागात कार्यरत आहेत. विशेषत: संशोधन क्षेत्रातील हे योगदान लक्षात घेऊन कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांनी विज्ञान शाखेच्या अधिष्ठाता पदाची जबाबदारी दिली होती. या काळात



एकुण २८ संशोधन प्रकल्प राबविण्यात आले. यामध्ये केंद्राशासनाचा विज्ञान व तंत्रज्ञान विभाग, सीएसआयआर, विद्यापीठ अनुदान आयोग, आयक्युएसी, इंटर युनिव्हर्सिटी ॲक्सलेटर सेंटर, डीएसटी-इन्स्पायर या संस्थाकडून निधी प्राप्त झाला. तसेच पायाभूत सुविधा संदर्भात देखील सात संशोधन प्रकल्प राबविण्यात आले.

यामध्ये रुसा सेंटर फॉर ॲडव्हान्स स्टडीज, डीएसटी-फिस्ट, डीडीयुकेके, इन्क्यूबूशन सेंटर, कम्युनिटी कॉलेज, युजीसी सॅप या प्रकल्पांचा समावेश आहे. तसेच अमेरिकेतील 'नॅशनल इन्स्टीटयूट ऑफ हेल्थ सायन्सेस' यांनी २ लाख ४० हजार डॉलर्सचा निधी 'बेरेबल नॅनोसेन्सर ॲटी फॉर रिअल टाइम मॅनिटरींग ऑफ डिझेल ॲण्ड गॅसोलाईट एक्झाहस्ट' हा प्रकल्प राबविण्यात आला. याशिवाय विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता, कुलसचिव, विभागप्रमुख, अकॅडमिक स्टाफ कॉलेजचे संचालक म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे.

### राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्य

■ डॉ.महेंद्र शिरसाठ यांनी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठे संशोधन कार्य केले आहे. स्लोव्हाकिया, तैवान, केंद्रीय विद्यापीठ इंग्लंड, सेऊल, ऑस्ट्रेलिया, हाँगकाँग आदी देशातील विद्यापीठात 'व्हिजीटरींग फॅक्टरी' म्हणून त्यांनी कार्य केले आहे. या कार्याचा गौरव म्हणून मार्च महिन्यात आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजनही करण्यात आले होते.

## शेडला आग लागून पाच जनावरे दगावली

सिल्लोड / प्रतिनिधी

तालुक्यातील रहिमाबाद शिवारातील गट न ५३ मध्ये शेतकरी सांडू धोंडीबा पाडळे यांचे जनावरांसाठी असलेले शेड जळून लाखो रुपयांचे नुकसान झाले. या घटनेत चार शेळ्या आणि एक बैल अशी पाच जनावरे, गव्हाच्या १२ गोण्या, शेतीसाठी ठेवलेला ठिंबक पाईपचा संच आदी जळून खाक झाले. पत्र्याच्या शेडला आग लागल्याची घटना बुधवार, २७ मे रोजी रात्री आठ ते दहा वाजेच्या दरम्यान घडली.

रहिमाबाद येथील शेतकरी सांडू पाडळे यांची गट नंबर ५३ मध्ये शेतजमीन असून त्यांच्याजवळ असलेली जनावरे ठेवण्यासाठी त्यांनी शेतातच पत्र्याचे शेड उभारले होते. बुधवारी रात्री आठ ते दहा वाजेच्या दरम्यान शेडला लाग लागली. या आगीत शेडमध्ये असलेल्या चार शेळ्या, एक बैल, गव्हाच्या गोण्यांसह शेतीउपयोगी साहित्य जळून खाक झाले.

## न्यूज ब्रीफ

### माता रमाई यांना अभिवादन

**वैजापूर :** तालुक्यातील नालेगाव येथील ग्रामपंचायत कार्यालयात माता रमाई यांना स्मृती दिनानिमित्त बुधवार, २७ मे रोजी अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी ग्रामपंचायतचे सरपंच कांताबाई रावसाहेब बागुल, ग्रामसेवक निलेश पान पाटील, डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती अध्यक्ष वेणुनाथ बागुल, उपाध्यक्ष मधुकर त्र्यंबक त्रिभुवन, सल्लागार बाबासाहेब त्रिभुवन, ग्रामपंचायत कर्मचारी विलास त्रिभुवन, पांडुरंग जानराव, गणेश फुलारे, सत्यदीप त्रिभुवन आदींची उपस्थिती होती.

### रमाबाई आंबेडकर यांना अभिवादन



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात रमाई यांच्या स्मृतिदिनानिमित्त रमाबाई आंबेडकर अल्पसंख्यांक मुलींचे वस्तीगृह येथे बुधवार, २७ मे रोजी अभिवादन करण्यात आले. अभिवादनासाठी यशवंतराव चव्हाण मुलींच्या वस्तीगृहाच्या रेक्टर डॉ. गौरी कल्लावार, पर्यवेक्षक प्रभा भिंगारे, रमाबाई आंबेडकर अल्पसंख्यांक मुलींच्या वस्तीगृहाच्या रेक्टर डॉ अश्विनी मोरे, सरला वाकळे, वर्षा अहिरे, प्रवेशिका हुमने या उपस्थित होत्या.

### वादळी वाऱ्यामुळे सोलर पॅनलचे नुकसान



**गंगापूर :** वादळी वाऱ्यामुळे गंगापूर तालुक्यातील दिनवाडा येथील शेतकरी तथा ग्रामपंचायत सदस्य उषा कडू ठोंबरे यांच्या गट क्रमांक ४७ मधील शेतातील सौर पॅनलचे नुकसान झाले. सौर पॅनलचे नुकसान झाल्याची घटना सोमवार, २५ मे रोजी सायंकाळी घडली. सोलर पॅनलचे स्ट्रक्चर उखडून पॅनल दूरवर जाऊन पडल्याने पॅनलचे नुकसान झाले आहे. ऐन खरीप हंगामाच्या तोंडावर सौर पॅनलचे नुकसान झाल्याने पाणीपुरवठा व शेतीची कामे खंडित झाली आहेत. महसूल आणि कृषी विभागाने तातडीने याचा पंचनामा करुन नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकरी उषा ठोंबरे यांनी केली आहे.

### डिझेल वितरण सुसूत्रतेसाठी परमिट सुविधा राबवावी

**परभणी :** पेट्रोलियम कंपनीकडून मागणीप्रमाणे पेट्रोल व डिझेल येण्यास होणारा विलंब आणि वाहनधारकांसह शेतकऱ्यांची डिझेल मागणी यामुळे परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात आहे. डिझेल वितरणात सुसूत्रता आणण्यासाठी तहसीलदारांनी सात बारा, फार्मर आयडी व आधार कार्ड, ट्रॅक्टर आरसी बुक तपासून पेट्रोलपंप निहाय शेतकऱ्यांना परमिट सुविधा राबवावी, असा सूर पेट्रोलपंपचालकांमधून निघत आहे. सेलू शहर व वालूर येथील पेट्रोलपंपावर डिझेल टैंकर येण्यापूर्वी शेतकरी कॅन घेऊन रांगा लावत आहेत. त्यामुळे आलेले डिझेल काही तासात संपत आहे. यामुळे पंपावर वाद होत आहेत.

---

कृषी निविष्ठा संनियंत्रण समिती बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देश

# शेतकऱ्यांना बियाणे, खते वेळेत उपलब्ध करुन द्या



**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**

खरीप हंगामाच्या दृष्टीने आवश्यक कृषी निविष्ठा जिल्ह्यात उपलब्ध आहेत. पेरणीच्या वेळापत्रकाप्रमाणे त्या शेतकऱ्यांपर्यंत सुव्यवस्थित नियोजन करुन पोहोचवा,असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी बुधवार, २७ मे रोजी दिले आहेत.

कृषी निविष्ठा संनियंत्रण समितीची बैठक आज जिल्हा नियोजन सभागृहात पार पडली. विभागीय कृषी सहसंचालक सुनिल वानखेडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दीपक गवळी, जिल्हा कृषी विकास अधिकारी प्रकाश पाटील, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, सर्व तालुका कृषी अधिकारी, कृषी निविष्ठा उत्पादक, विक्रेते, वितरक, वाहतुकदार आदी बैठकीस उपस्थित होते. सहसंचालक वानखेडे यांनी सांगितले की, शेतकऱ्यांना खतांची मागणी मोबाईलवरुन नोंदवून घरपोच खते देण्याबाबत पथदर्शी प्रकल्प राबविला जाणार आहे. त्यासाठी कृषी सेवा केंद्रांनी आपले आयडी तयार करावे. आयएफएमएस असे या पोर्टल/ॲपचे नाव असून याद्वारे शेतकरी मोबाईलद्वारे आपली मागणी नोंदवू शकतील,असे त्यांनी सांगितले. हा प्रथदर्शी प्रकल्प आपल्या जिल्ह्यात राबवावयाचा असून त्यासाठी निविष्ठा विक्रेत्यांनी आपले आयटी तयार करावे,असे त्यांनी सांगितले. जिल्ह्यात कृषी निविष्ठा विक्रीसाठी तब्बल ८९९२ विक्रेते आहेत. त्यात बियाणे विकेते-४४७६, खत विक्रेते-२३८६, कीटक नाशक विक्रेते-२१३० असे आहेत. वितरण विक्री प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रत्येक तालुकानिहाय १ याप्रमाणे ९ व जिल्हास्तरीय १ असे १० भरारी पथके आहेत. गुणनियंत्रणासाठी जिल्हास्तरीय ४ निरीक्षक तर तालुकास्तरीय १८ असे २२ निरीक्षक आहेत.

जिल्हा कृषी विकास अधिकारी प्रकाश पाटील यांनी सादरीकरण करुन नियोजन सादर केले. त्यांनी माहिती दिली की, जिल्ह्यात ३ लाख ४५ हजार ८०६७ हेक्टर क्षेत्रावर खरीपाच्या पेरणीचे नियोजन असून त्यासाठी ३१ हजार ३२ क्विंटल बियाण्याची आवश्यकता आहे. सर्वाधिक नियोजीत क्षेत्र कपाशी लागवडीचे असून त्यासाठी ७७११ क्विंटल (१७ लाख १३ हजार पाकिटे) बियाणे आवश्यक आहे. जिल्ह्यात रासायनिक खतांचा सरासरी वापर २ लाख ७३ हजार १९३ मे.टन इतका असून खरीप हंगाम २०२६ साठी ३ लाख ९५ हजार ७४९ मे.टन इतकी मागणी आहे. त्यात युरिया- १ लाख ५१ हजार २३० मे.टन, डीएपी- ४७ हजार ३६० मे.टन, एम.ओ.पी.-२६४१२ मे.टन., एनपीके-१ लाख ४१ हजार ९५५ मे.टन, एसएसपी- २८७९२ मे.टन असे एकूण ३ लाख ९५ हजार ७४९ मे.टन खतांची मागणी आहे. जिल्ह्यासाठी मंजूर आवंटन २ लाख ९२ हजार ७०० मे.टन इतके आहे. हे आवंटन आवश्यकतेनुसार पुरवठा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यात एप्रिल २०२५ अखेर शिल्लक खत साठा १ लाख २३ हजार ९२८ मे.टन इतका आहे.

### पिकनिहाय प्रस्तावित पेरणीक्षेत्र

■ कापूस-३०८४५४ हे., मका-२६५६३० हे., तूर-५४८०३ हे., सोयाबीन- ३४२१७ हे., मुग- १२१६७ हे., बाजरी- ९०६८ हे., भुईमुग- ८१९९ हे., उडीद-३८६६ हे, खरीप ज्वारी- ७३ हे.,तीळ-१३९ हे, इतर पिके-४७१ हे. असे एकूण ६ लाख ९७ हजार १८७ हेक्टर क्षेत्रावर पिकनिहाय पेरणी प्रस्तावित आहे.

### लिंकींग केल्यास कारवाई

■ जिल्हाधिकारी गौडा म्हणाले की, बियाणे विक्री करण्याआधी त्यांची उगवण क्षमता तपासणी करणे आवश्यक आहे. त्याशिवाय बियाणे विक्री करु अनका. खतांच्या पुरवठ्याचे नियमन करतांना गरजेला प्राधान्य द्या नंतर संरक्षित साठ्याचे नियोजन करा. खताचे लिंकींग करु नका. अशाप्रकारे लिंकींग करुन शेतकऱ्यांची अडवणूक केल्यास जीवनावश्यक वस्तू अधिनियमाप्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात येईल. एकंदर एल निनो आणि आखाती देशातील युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभुमिवर कृषी निविष्ठा विक्रेत्यांनी पारदर्शकता जपून शेतकऱ्यांना वेळेत बियाणे, खते उपलब्ध करुन द्यावे. जिल्ह्यात डिजेल, पेट्रोलचा पुरवठा सुरळीत आहे. त्यामुळे कृषी निविष्ठांच्या वाहतुकीला कोणतीही अडचण येणार नाही,असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

---

## शिवना नदीवरील पुल पडला; पावसाळ्यात शेकडो गावांचा संपर्क तुटणार



**गंगापूर / प्रतिनिधी**

तालुक्यातील कायगावदेवगाव रस्त्याचे काम संथगतीने सुरु असल्याने परिसरातील वाहनधारक, प्रवासी आणि ग्रामस्थांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. दरम्यान, शिवना नदीवरील जुना पुल तोडण्यात आला असल्याने यंदाच्या पावसाळ्यात लासूर स्टेशनसह परिसरातील शेकडो गावांचा संपर्क तुटणार आहे. संबंधित ठेकेदाराने कामाचा वेग वाढवून पावसाळ्यापूर्वी रस्ता आणि पुलाचे काम पूर्ण करावे अशी मागणी वाहनधारकांतून करण्यात येत आहे.

गंगापूर तालुक्यातील कायगाव ते देवगाव राज्य रस्ता क्रमांक ३९ चे काम गेल्या एक ते दीड वर्षापासून कासवगतीने सुरु आहे. रस्त्याचे काम कासवगतीने सुरु असल्याने परिसरातील वाहनधारकांना आणि ग्रामस्थांना विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे. खराब रत्यामुळे दररोज लहान-मोठे अपघात होवून वाहनधारक जायबंदी होण्याचे प्रमाण वाढले आहे. तसेच दुचाकी वाहनांचेही नुकसान होण्याचे प्रमाण वाढले आहे.

मालुंजा येथील शिवना नदीवरील जुना पुल तोडण्यात आला असून त्या ठिकाणी पर्यायी छोटा तात्पूरता पुल उभारण्यात आला होता. परंतु हा पुल अरुंद आणि लहान असल्याने त्यावर वाहतुकीचा ताण येत आहे. पावसाळ्यात नदीला पाणी आल्यास हा पर्यायी मार्ग बंद होण्याची शक्यता परिसरातील नागरिकांतून व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, कायगाव ते देवगाव रस्त्याचे काम करणाऱ्या कंत्राटदाराने कामाची गती वाढवून पावसाळ्यापुर्वी रस्त्याचे आणि पुलाचे काम पूर्ण करावे अशी मागणी वाहनधारक आणि त्रस्त नागरिकांतून करण्यात येत आहे.

---

## आ. अनुराधा चव्हाण यांच्याकडून पेट्रोलपंपाची पाहणी

**वडोद बाजार / प्रतिनिधी**



सध्या संपूर्ण जिल्ह्यात इंधन तुटवड्याची समस्या निर्माण झाली आहे. अनेक ठिकाणी - पेट्रोल-डिझेलसाठी नागरिकांची धावपळ - सुरू आहे. अशा परिस्थितीत नायगव्हाण येथील सेवा पेट्रोल पंपाने पारदर्शक, शिस्तबद्ध - व्यवस्थापन ठेवले आहे. ग्राहकांना दिलासा मिळाला आहे. पंपाच्या कामकाजाची आमदार अनुराधा चव्हाण यांनी नुकतीच पाहणी केली.

पाहणी दौऱ्यात आमदार अनुराधा चव्हाण यांच्यासोबत सभापती सर्जेराव मेटे, जिल्हा परिषद सदस्य गोपाल वाघ यांनी सेवा पेट्रोल पंपाला भेट दिली. या वेळी आमदार अनुराधा चव्हाण यांनी या पंपावरील पेट्रोल, डिझेलचा उपलब्ध साठा याची माहिती घेतली. तसेच इंधन तुटवडा असतानाही योग्य नियोजन केलेले दिसून आले.

इंधनाची सुरक्षित साठवणूक दिसली. प्रशासकीय नियमांचे काटेकोर पालन केल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. आ. अनुराधा चव्हाण यांनी व्यवस्थापनाच्या कार्यपद्धतीवर समाधान व्यक्त केले. तसेच त्यांनी पंपावरील कर्मचाऱ्यांच्या तत्परतेचे कौतुक केले. दरम्यान, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना पेट्रोल, डिझेलचा पुरवठा करावा असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

### पद्म पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**जालना :** २६ जानेवारी २०२७ रोजी घोषित होणाऱ्या पद्म पुरस्काराकरिता (पद्मश्री, पद्म भूषण, पद्मविभूषण) शिफारशी केंद्र शासनामार्फत नामांकन प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. पद्म पुरस्कार हे सर्वोच्च नागरी पुरस्कारांपैकी एक असून, ते अतिशय प्रतिष्ठेचे आहेत. याबाबतचे अधिनियम आणि नियम केंद्र शासनाच्या गृहमंत्रालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्यानुसार, जालना जिल्ह्यातील पद्म पुरस्कारासाठी पात्र आणि इच्छुक मान्यवरांची वैयक्तिकरीत्या ऑनलाइन नामांकन पोर्टलवर ३१ जुलै रोजी पर्यंत सादर करावेत, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## कृषी सेवा केंद्र चालकांनी मांडल्या व्यवसायाच्या व्यथा

**सोयगाव / प्रतिनिधी**



तालुक्यातील कृषि सेवा केंद्र चालकांच्या विविध अडचणी व खत पुरवठ्याच्या समस्यांबाबत तालुका कृषी अधिकारी कार्यालयात सभा घेण्यात आली. या सभेला सावळदबारा ते गोंदेगाव परिसरातील ५१ कृषि सेवा केंद्र चालक उपस्थित होते.

सभेच्या प्रारंभी कृषि अधिकारी रमेश गुंडीले यांनी दुकानदारांनी दुकानात कोणकोणती दप्तरे व नोंदी जतन कराव्यात, याबाबत मार्गदर्शन केले. त्यानंतर तालुका कृषी अधिकारी भारत कासार यांनी प्रास्ताविकात कृषि सेवा केंद्र हे केवळ विक्री केंद्र न राहता शेतकऱ्यांसाठी सुविधा केंद्र म्हणून कार्यरत राहणे आवश्यक असल्याचे सांगितले. यावेळी उपस्थित विक्रेत्यांनी खत पुरवठ्याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. कंपनीकडून मागणीनुसार खत उपलब्ध होत नसल्याने व्यवसाय अडचणीत आला असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच जिल्हाबंदीमुळे इतर जिल्ह्यांतून खत आणण्यास अडचणी निर्माण होत असल्याची खंतही व्यक्त करण्यात आली. दुकानदारांनी चाळीसगाव, पाचोरा, जळगाव किंवा मलकापूर येथे रॅक पॉईंट सुरू करण्याची मागणी केली.

सोयगाव तालुक्याला मागणीप्रमाणे खत मिळत नसल्याने दिवसेंदिवस व्यवसाय करणे कठीण होत असल्याचेही त्यांनी नमूद केले. सभेच्या शेवटी तालुका कृषी अधिकारी भारत कासार यांनी उपस्थितांनी मांडलेल्या सर्व अडचणी वरिष्ठ स्तरावर पाठविण्यात येतील, असे आश्वासन दिले. सभेचे सूत्रसंचालन सहायक कृषी अधिकारी मयुर बारी यांनी केले.

---

## एम.आय.टी. रोटेगावच्या १३४ विद्यार्थ्यांना मिळाली नोकरी



**वैजापूर / प्रतिनिधी**

तालुक्यातील रोटेगाव येथील एम.आय.टी. पॉलिटेक्निक अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या कॅम्पस ड्राइव्हमध्ये विविध नामांकित राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये १३४ विद्यार्थ्यांची निवड झाली.

या कॅम्पस ड्राइव्ह प्रक्रियेद्वारे विविध नामांकीत कंपन्या सहभागी झाल्या होत्या. या प्लेसमेंट प्रक्रियेद्वारे ॲग्रीकल्चरल, सिव्हिल, कंप्युटर, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन आणि मेकॅनिकल इंजिनिअरिंग शाखांतील अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या. विशेष बाब म्हणजे विद्यार्थ्यांना अंतिम सत्राचा निकाल जाहीर होण्यापूर्वीच नियुक्तीपत्र प्राप्त झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढला आहे. विद्यार्थ्यांच्या निवड प्रक्रियेमध्ये तिन्ही वर्षांतील शैक्षणिक गुणवत्ता, ॲप्टिट्यूड टेस्ट, तांत्रिक कौशल्य चाचणी तसेच प्रत्यक्ष मुलाखत अशा विविध टप्प्यांचा समावेश करण्यात आला होता.

संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. वाय. ए. कवडे, महासंचालक प्रा. मुनिष शर्मा, संचालक प्रा. डॉ. शकुंतला लोमटे, संचालक प्रा. भूपेश मिश्रा, संचालक प्रा. बिजली देशमुख, प्रा. शीतल देशमुख आणि ग्रा. शि.मंडळाचे ओ.एस.डी. प्रा. श्रीकांत शिराळकर, संस्थेचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफीसर प्रा डॉ उमेश कुमार चव्हाण, प्राचार्य डॉ एम आर वैद्य यांनी निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

## गायरान जमिनीवर आमची उपजीविका; सौर कृषी वाहिनी योजना बंद करा

**परभणी / प्रतिनिधी**

जिंतूर तालुक्यातील शासकीय गायरान व वन जमिनीवरील अतिक्रमणधारकांचे नियमन करून भूमिहीनांना मालकी हक्काने जमीन वाटप करावे, तसेच गायरान जमिनीवर राबविण्यात येत असलेली मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना तत्काळ बंद करावी, अशी मागणी आजाद समाज पार्टीच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात मंगळवारी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन पाठविण्यात आले.

जिल्ह्यात अनेक वर्षापासून भूमिहीन कुटुंबे गायरान व वन जमिनीवर वास्तव्यास असून त्याच जमिनीवर शेती करून उदरनिर्वाह करत आहेत. अनेक कुटुंबांची उपजीविका पूर्णपणे या जमिनीवर अवलंबून असल्याने शासनाने त्यांच्या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. राज्य शासनाने मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेला प्राधान्य देत विविध ठिकाणी प्रकल्प उभारणीच्या सूचना दिल्या आहेत. मात्र ज्या गायरान जमिनीवर भूमिहीन कुटुंबे शेती करत आहेत, त्या जमिनी प्रकल्पासाठी वापरण्यात आल्यास अनेक कुटुंबांपुढे उपजीविकेचा गंभीर प्रश्न निर्माण होणार असल्याचा इशारा आजाद समाज पार्टीने दिला आहे. अरविंद कांबळे यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले. निवेदनावर शिवाजी वीर, सुभाष वावळे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### जुन्या वादातून मारहाण; चौघांविरुद्ध गुन्हा

**परभणी :** साडेगाव येथे किरकोळ वादातून एका कुटुंबावर शिवीगाळ व मारहाण झाल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी ग्रामीण पोलिसांत चार जणांविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली आहे. फिर्यादी शबाना शेख अजगर (रा. साडेगाव) यांच्या माहितीनुसार, रविवार, २४ मे रोजी रात्री काही जणांनी घरासमोर येऊन शिवीगाळ करत वाद घातला.

## जीर्ण खांब अन् विद्युत वाहक तारा दुरुस्त करा

**परभणी :** जिल्ह्यातील जीर्ण झालेले विद्युत खांब, लोंबकळणाऱ्या विद्युत वाहक तारा तसेच धोकादायक स्थितीत असलेल्या वीज वाहिन्यांची तत्काळ दुरुस्ती करावी, अशी मागणी परभणी जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने करण्यात आली. यासंदर्भात मंगळवारी अधीक्षक अभियंत्यांना निवेदन देण्यात आले. तातडीने लाईनची पेट्रोलिंग करून दुरुस्ती कराती, धोकादायक खांब बदलावेत तसेच झाडांच्या फांद्यांची छाटणी करावी, अशी मागणी युवक काँग्रेसने केली आहे. सचिन जवंजाळ यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले. निवेदनावर दिगंबर खरवडे, राजेश रेंगे, मयूर मोरे, गोविंद झाडे, काशीनाथ हुलगुडे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## अंबड ते सिल्लोड बससेवा सुरू करा; ग्रामस्थांची मागणी



**अंबड / प्रतिनिधी**

गेल्या काही महिन्यापासून बंद असलेली अंबड ते सिल्लोड मार्गावर पारनेर, किनगाव चौफुली, लोणार, भायगाव, नानेगाव, बदनापूर, रोषणगाव, कंडारी, राजूर व भोकरदन मार्गे नवीन बससेवा सुरू करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांच्या वतीने महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या जालना विभाग नियंत्रक मनीषा सपकाळ यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

याबाबत अंकुश रुस्तुमराव चव्हाण, भास्कर जिवनराव चव्हाण व ग्रामस्थांच्या वतीने सोमवार, २५ मे रोजी जालन्याचे विभाग नियंत्रक मनीषा सपकाळ यांना निवेदन देण्यात आले. ग्रामीण भागातील नागरिकांना तालुका व जिल्हा ठिकाणी ये-जा करण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, प्रस्तावित बससेवा सुरू झाल्यास विद्यार्थ्यांसह शेतकरी, कामगार व सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच या बससेवेच्या माध्यमातून भाविकांना राजूर देवस्थान येथे जाण्यासाठीही सोयीची प्रवास सेवा उपलब्ध होणार असल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

---

## खंडाळा परिसरात चोरट्यांचा धुमाकूळ; दोन घरे फोडली

**वैजापूर / प्रतिनिधी**

तालुक्यातील खंडाळा परिसरात चोरट्यांचा सुळसुळाट सुरू असून २३ व २४ मे रोजी रात्री सलग दोन दिवस चोरीच्या घटना घडली. तर एका ठिकाणी चोरीचा प्रयत्न फसला.

रविवार, २४ मे रोजी पहाटे साडेतीन वाजता खंडाळा येथे शिक्षक कॉलनी येथील सेवानिवृत्त शिक्षक सोपान सोनवणे यांच्या गेटची कुलूप तोडून चोरटे आत शिरत होते. त्यावेळी सोनवणे यांना आवाज आल्याने ते जागी झाले. त्यामुळे चोर मुद्देमाल घटनास्थळी सोडून पळून गेले. तर खंडाळा बसस्थानक परिसरात सेवानिवृत्त गट विकास अधिकारी राजाराम बागूल हे राहतात. त्यांच्या कडे नातेवाईक आलेले होते. घरात उकडत असल्याने ते सर्व जण अंगणात झोपले होते.रविवारी पहाटे च्या सुमाराला चोरट्यांनी दोन महीलांच्या पर्समधील साडे सतरा हजार रुपये रोख, दोन मोबाईल व तीन घड्याळ चोरट्यांनी लंपास केला.

१५५ किलोमीटर लांबीचे शिव रस्ते होणार

## फुलंब्रीत १०७ पाणंद रस्त्यांना मंजुरी, शेतकऱ्यांना दिलासा

**वडोद बाजार / प्रतिनिधी**

फुलंब्री तालुक्याच्यातील ग्रामीण विकासासाठी महत्त्वाची ठरणारी मुख्यमंत्री बळिराजा पाणंद रस्ता योजना तालुक्यात वेगाने आकार घेत आहे. या योजनेअंतर्गत तब्बल १०७ पाणंद रस्त्यांना मंजुरी मिळाली आहे. सुमारे १५५ किलोमीटर लांबीचे हे रस्ते तयार होणार असल्याने तालुक्यातील शेतकरीवर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. यासाठी आमदार अनुराधा चव्हाण यांनी शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा केला होता.

फुलंब्री तालुक्यात अनेक गावांमध्ये शेत शिवारातील शेतात पोचण्यासाठी पक्के रस्ते नसल्याने शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. तर पावसाळ्यात चिखलमय रस्त्यांमुळे ट्रॅक्टर, मालवाहू वाहने तसेच दुचाकींची वाहतूक ठप्प होत असल्याने शेतमाल वेळेत बाजारपेठेत पोचवणे कठीण होत होते. आता मुख्यमंत्री बळिराजा योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या १०७ पाणंद रस्त्यांमुळे गाव ते शेत आणि शेत ते बाजारपेठ हा प्रवास अधिक सुलभ होणार आहे. रस्त्यांच्या कामामुळे शेतकऱ्यांचा वाहतूक खर्च कमी होण्यास मदत होणार असून, शेतमाल वेळेत बाजारात पोचून आर्थिक फायदादेखील होणार आहे. ग्रामीण भागातील दुर्गम वस्त्यांनादेखील याचा मोठा लाभ मिळणार आहे.

विशेष म्हणजे या रस्त्यांमुळे केवळ शेतीपुरताच नव्हे, तर शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक, रुग्णवाहिका सेवा, दूध संकलन आणि ग्रामीण व्यापारालाही मोठी चालना मिळणार आहे. तालुक्यातील विविध गावांमधील प्रलंबित असलेल्या रस्त्यांचा समावेश या योजनेत करण्यात आला आहे. या योजनेमुळे फुलंब्री तालुक्यातील ग्रामीण भागाच्या विकासाला मोठी गती मिळणार असून, शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवे बळ मिळणार असल्याचे चित्र आहे.

### पाणंद रस्त्यांचा लाभ शेतकऱ्यांना होणार



पाणंद रस्त्यासाठी शेतकऱ्यांची मोठी मागणी होती. त्यामुळे सातत्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांच्या माध्यमातून फुलंब्री तालुक्यात मुख्यमंत्री बळीराजा योजनेतून १५५ किलोमीटर लांबीचे १०७ पाणंद रस्ते मंजूर झाले असल्याची माहिती आमदार अनुराधा चव्हाण यांनी दिली आहे. तसेच या पाणंद रस्त्यांचा लाभ फुलंब्री तालुक्यातील शेतकऱ्यांना होणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.



# बालांगण

## हायबरनेशन

हायबरनेशन म्हणजे काही प्राण्यांची एक खास जिवंत राहण्याची युक्ती आहे. थंडीच्या दिवसांत अन्न कमी मिळते आणि हवामान खूप कठीण होते. अशा वेळी काही प्राणी आपली हालचाल खूप कमी करतात आणि एका प्रकारच्या गाढ विश्रांतीत जातात. यालाच हायबरनेशन असे म्हणतात. ही साधी झोप नसते. हायबरनेशनमध्ये प्राण्याचे शरीर खूपच मंद गतीने काम करते. त्याचे हृदय हळू ठोके देऊ लागते. श्वास कमी होतो. शरी–राचे तापमानही खाली येते. त्यामुळे त्याला कमी ऊर्जा लागते. तो अनेक दिवस तर कधी कधी महिन्यांपर्यंत काही न खाता पिता जगू शकतो. अस्वल, साप, बेडूक, वटवाघूळ असे अनेक प्राणी हायबरनेशन करतात. काही प्राणी बिळात, गुहेत किंवा जमिनीखा–ली लपून बसतात. बेडूक तर चिखलात किंवा पाण्याखालीही राहू शकतो. अस्वल हिवाळ्यापूर्वी भरपूर अन्न खाऊन शरीरात चरबी साठवते आणि त्याच ऊर्जेवर हायबरनेशन करते. हायबरनेशन सुरू होण्याआधी प्राणी खूप तयारी करतात. ते अन्न साठवतात. सुरक्षित जागा शोधतात. शरीरात ऊर्जा जमा करतात.



रंजक विज्ञान

एकदा हायबरनेशन सुरू झाले की ते खूप कमी हलतात. कधी कधी ते मध्येच थोडावेळ जागे होतात, पण पुन्हा त्या अवस्थेत जातात. हायबरनेशन करणारे प्राणी साधारणपणे थंड हवामान असलेल्या प्रदेशात जास्त आढळतात. उदा. उत्तर अमेरिका, युरोप, रशिया किंवा हिमालयासारखे डोंगराळ भाग. कारण तिथे हिवाळा खूप कडक असतो आणि अन्न कमी मिळते, त्यामुळे प्राण्यांना हायबरनेशनची गरज पडते. भारतामध्येही बेडूक, साप, सरडे, काही कीटक आणि वटवाघुळे हे प्राणी थंडीच्या काळात निष्क्रिय होतात. हिमालयासारख्या खूप थंड भागात हे अधिक दिसून येते. आपल्याला हे प्राणीसहजपणे दिसत नाहीत. कारण हायबरनेशनच्या वेळी ते बिळात, झाडांच्या फटीत, जमिनीखाली किंवा पाण्याखाली लपून बसतात. ते बाहेर येतच नाहीत. त्यामुळे आपल्याला ते दिसू शकत नाहीत. वसंत ऋतू सुरू झाला की हवामान उबदार होते आणि अन्न उपलब्ध होऊ लागते. तेव्हा हे प्राणी हळूहळू हायबरनेशनमधून बाहेर येतात आणि पुन्हा सामान्य जीवन सुरू करतात. निसर्गात प्रत्येक प्राणी आपल्या परिस्थितीनुसार जुळवून घेतो. थंडीपासून वाचण्यासाठी आणि ऊर्जा जपण्यासाठी हायबरनेशन ही एक खूप हुशार पद्धत आहे. त्यामुळेच हे छोटे–मोठे प्राणी कठीण परिस्थितीतही जगू शकतात.

## महत्त्वपूर्ण निकेल

खनिजांच्या जगात

निकेल हे एक महत्त्वाचे धातू खनिज आहे. त्याचा रंग चंदेरी पांढरा असतो. धातुरूपातील निकेल कडक व मजबूत असते. निकेल इतर खनिजांबरोबर मिश्र स्वरूपात आढळते. प्रामुख्याने गंधक असलेल्या खडकांमध्ये किंवा काही लालसर मातीसारख्या खडकांमध्ये निकेल आढळते. निकेल हा लाव्हा, खडकांची निर्मिती आणि झीज या नैसर्गिक भूगर्भीय प्रक्रियांमुळे तयार झालेला धातू आहे.

रशिया, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि इंडोनेशिया या देशांमध्ये मोठ्या प्रमाणात निकेल मिळते. भारतामध्ये झारखंड, ओडिशा आणि कर्नाटक या भागांमध्ये निकेलचे साठे आढळतात. हे खनिज जमिनीच्या आत खडकांच्या थरांमध्ये असते. खाणीतून मोठे दगड काढून त्यातून निकेल मिळवले जाते. निकेल मुबलक प्रमाणात उपलब्ध असलेला धातू आहे; पण तो खडकांमध्ये इतर घटकांसोबत मिश्र रूपात असल्यामुळे त्यातून निकेल वेगळा काढण्यासाठी प्रक्रिया करावी लागते. निकेल काढण्यासाठी प्रथम खडक फोडून छोटे केले जातात. त्यानंतर त्यातील निकेल असलेले भाग वेगळे केले जातात. पुढे या पदार्थाला तापवले जाते. या प्रक्रियेमुळे अशुद्ध घटक वेगळे होतात आणि हळूहळू शुद्ध निकेल मिळते.




निकेलचा सर्वात महत्त्वाचा उपयोग म्हणजे इतर धातूंमध्ये मिसळून मजबूत धातू तयार करणे. लोखंडात निकेल मिसळले की स्टील अधिक मजबूत आणि गंज न लागणारे बनते. त्यामुळे स्वयंपाकघरातील भांडी, चमचे, सुरी, तसेच काही यंत्रांचे भाग तयार करण्यासाठी त्याचा वापर होतो.

निकेलचा उपयोग नाणी बनवण्यासाठीही केला जातो. तसेच बॅटऱ्या तयार करण्यासाठीही निकेल महत्त्वाचा आहे. याशिवाय निकेलचा उपयोग रंग देण्यासाठी आणि काही रासायनिक पदार्थ तयार करण्यासाठीही केला जातो. तो उष्णता सहन करू शकतो आणि त्यावर गंज चढत नाही. त्यामुळे तो उद्योगांमध्ये खूप उपयोगी ठरतो.

## परीक्षा द्यायची तर...

स्टडी टिप्स

दहावी–बारावी हा आयुष्यातला अत्यंत महत्त्वाचा टप्पा. या परीक्षा दिल्यानंतर करिअरचा मार्ग ठरतो. अनेक व्यावसायिक अभ्यासक्रमांची कवाडं खुली होतात. या अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा असतात. मेडिकल, इंजिनिअरींग, एमबीए तसंच इतर अभ्यासक्रमांसाठीही प्रवेश परीक्षा द्याव्या लागतात. बोर्डाच्या परीक्षांनंतर



लगेचच या परीक्षा असतात. मग प्रवेश परीक्षेची तयारी करावी का बोर्डाच्या परीक्षेला महत्त्व द्यावं, असा प्रश्न विद्यार्थ्यांना पडतो. याबाबतचं हे मार्गदर्शन.

✻ उच्च शिक्षण घेण्यासाठी बोर्डाच्या परीक्षेच्या गुणांना महत्त्व दिलं जातं. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या परीक्षेकडे विशेष लक्ष द्यायला हवं. प्रवेश परीक्षेत चांगले गुण मिळवणाऱ्यांना बोर्डाच्या परीक्षेत तुलनेने कमी गुण मिळाल्याचं चित्र पहायला मिळतं. पण दहावी–बारावीच्या परीक्षांकडे दुर्लक्ष करणं चुकीचं आहे.

✻ अभ्यासासाठी सकाळची वेळ योग्य ठरते. त्यामुळे कठिण विषयांचा अभ्यास सकाळच्या वेळेत करा. सकाळी वाचलेलं अधिक काळ लक्षात राहतं. सातत्याने अभ्यास करत राहिल्याने मेंदूवर ताण येतो. त्यामुळे अभ्यासादरम्यान थोडी विश्रांती घ्यायला हवी. मधल्या काळात तुम्ही पुस्तकं वाचू शकता. आवडीची गाणी ऐकू शकता. यामुळे तुम्ही ताजेतवाने होता.


✻ अभ्यासाचं वेळापत्रक तयार करा. त्याचं काटेकोर पालन करा. परीक्षा कोणतीही असली तरी वेळापत्रक महत्त्वाचं आहे. कोणत्या विषयाला किती वेळ द्यायचा हे ठरवा.

✻ परीक्षेचा अजिबात ताण घेऊ नका. पेपरच्या आधी शांत झोप घ्या. यामुळे पेपर लिहिताना तुम्हाला झोप येणार नाही. सगळी उजळणी आधीच करून ठेवा.

## फोबिया म्हणजे काय?

माहीत आहे?

भीती ही एक भावना आहे. प्रत्येकाला कशाना कशाची भीती वाटत असते. काहींना मॉल किंवा रेल्वे स्थानकांवरील सरकत्या जिन्यांवर चढण्याची भीती वाटते. काहींना पाण्याची तर काहींना उंचीची भीती वाटते. काही जण कुत्र्यांना घाबरतात. या भीतीला इंग्रजीत 'फोबिया' असं म्हटलं जातं. तसं पहायला गेलं तर कशाची तरी भीती वाटणं ही सर्वसाधारण बाब आहे. काही मुलांना परीक्षेची, शाळेतल्या शिक्षकांची भीती वाटते. त्यात वावगं काही नाही. पण फोबिया यापेक्षा वेगळा असतो. आपल्याला विशिष्ट परिस्थिती किंवा घटनेची प्रचंड भीती वाटते. काही केल्या ही भीती जात नाही. एखाद्या गोष्टीचा फोबिया असलेली मुलं ती करायला धजावतच नाहीत. त्यांच्या मनात त्याची भीती बसलेली असते.



अशी परिस्थिती टाळण्यासाठी मुलं कोणत्याही थराला जाऊ शकतात. या भीतीमुळे मग घाम येतो, हातपाय थरथरू लागतात. काही मुलं रडू लागतात. हृदय धडधडू लागतं. याचा भविष्यात खूप त्रास होऊ शकतो. आपल्या बाबतीत काही तरी वाईट घडणार आहे असं वाटू लागतं. छोट्या मुलांमध्ये ही भावना वाढीस लागते. याला भीतीचा झटका असं म्हणता येईल. हा झटका काही काळासाठी टिकून रहात असला तरी त्याचा अनुभव घेणाऱ्यांसाठी हा काळ खूप जास्त असू शकतो. त्यामुळे मुलांनो, एखाद्या गोष्टीची भीती वाटत असेल तर त्याबद्दल सांगायला हवं. कशाची भीती वाटते हे स्पष्ट करून ती दूर करण्याचा प्रयत्न करायला हवा. काही मुलांना समाजात मिसळायची भीती वाटते. ही समस्या बऱ्याचजणांना असते. पण या भीतीवर मात करून आपण पुढे जाऊ शकतो, हे लक्षात घ्यायला हवं. असं करून फोबियाला हरवायला हवं. तुम्हालाही कशाची भीती वाटत असेल तर त्याबद्दल बिनधास्त बोला.

## दुधाचे दही कसे होते ?

दुधाचे दही होणे ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. त्यासाठी लॅक्टिक ॲसिड बॅक्टेरिया अर्थात चांगले जीवाणू काम करतात. आपण गरम दुधात थोडे जुने दही म्हणजेच विरजण घालतो, तेव्हा त्यातील हे जीवाणू दुधात वाढायला लागतात. हे जीवाणू दुधातील लॅक्टोजचे म्हणजेच साखरेचे रूपांतर लॅक्टिक ॲतसिडमध्ये करतात. त्यामुळे दूध आंबट होते आणि घट्ट होऊन दही तयार होते. उबदार वातावरणात ही प्रक्रिया लवकर होते, म्हणून दही लवकर जमते. थोडक्यात, दही म्हणजे जीवाणूंनी दुधावर केलेली एक चांगली आणि उपयोगी प्रक्रिया आहे. लुई पाश्चर या फ्रेंच शास्त्रज्ञाने १८५०–६० च्या सुमारास महत्त्वाचे संशोधन केले. त्यांनी दाखवून दिले की आंबणे ही प्रक्रिया जीवाणूंमुळे होते. त्यामुळेच दही, चीज, ब्रेड यांसारख्या पदार्थांमागे जीवाणूंचा हात आहे हे समजले.



## पक्षी रस्ता चुकत कसे नाहीत?

थंडीच्या दिवसांत काही भागात अन्न कमी होते. त्यामुळे पक्षी उबदार आणि अन्नाने भरपूर असलेल्या ठिकाणी जातात. तसेच, प्रजननासाठी सुरक्षित आणि योग्य जागा मिळावी म्हणूनही ते स्थलांतर करतात. हे पक्षी हजारो किलोमीटरचा प्रवास अचूकपणे करतात. ते मार्ग लक्षात ठेवतात असे वाटते. पण पक्षी सूर्य आणि ताऱ्यांच्या स्थितीवरून दिशा ओळखतात. दिवसा सूर्य, तर रात्री तारे त्यांना मार्ग दाखवतात. काही पक्षी पृथ्वीच्या चुंबकीय शक्तीचा वापर करतात. जणू त्यांच्या शरीरात छोटासा कंपासच असतो. ते नद्या, डोंगर, समुद्र किनारे यांसारखी भूचिन्हेही लक्षात ठेवतात. पक्षी लहानपणापासूनच हा मार्ग शिकतात आणि मोठे झाल्यावर स्वतः प्रवास करतात. पक्ष्यांची दिशा ओळखण्याची क्षमता आणि निसर्गातील संकेत यामुळे ते इतका लांब प्रवास सहज करतात.




## इथिओपियन हायलँड्स

गोष्टी पर्वतरांगांच्या

इथिओपियन हायलँड्स ही आफ्रिका खंडातील एक महत्त्वाची आणि उंच पर्वतरांग मानली जाते. ही प्रामुख्याने इथिओपिया देशात पसरलेली आहे, म्हणून तिला इथिओपियन उंच प्रदेश असेही म्हणतात. या प्रदेशाला आफ्रिकेचे छत असेही म्हणतात, कारण तो आसपासच्या भागांपेक्षा खूप उंच आहे. साधारणपणे हा प्रदेश १५०० मीटर ते ३००० मीटर उंचीवर पसरलेला आहे.

या भागातील सर्वात उंच शिखर रास दाशेनअसून त्याची उंची सुमारे ४५५० मीटरआहे. या पर्वतरांगेची निर्मिती साधारणपणे लाखो वर्षांपूर्वी ज्वालामुखीच्या क्रियेमुळे झाली असे मानले जाते. पृथ्वीच्या आतून गरम लाव्हा वर येऊन मोठ्या प्रमाणावर पसरला. हा लाव्हा हळूहळू थंड होऊन कठीण खडकात बदलला आणि त्याची उंच पठारासारखी रचना तयार झाली. नंतर वारा, पाऊस आणि नद्यांच्या प्रवाहामुळे या भागात खोल दऱ्या, कडे आणि खा–चखळगे निर्माण झाले. त्यामुळे आजचा हा प्रदेश डोंगर, पठार आणि दऱ्यांचा सुंदर संगम दिसतो.

या उंच प्रदेशात हवामान तुलनेने थंड आणि आल्हाददायक असते. येथे मानवी वस्ती मोठ्या प्रमाणात आढळते. इथिओपियातील अम्हारा, ओरोमो, आणि टिग्राय हे प्रमुख आदिवासी समुदाय अनेक वर्षांपासून या उंच प्रदेशात राहतात. त्यांची स्वतःची भाषा, संस्कृती, पोशाख आणि परंपरा आहेत. काही लोक अजूनही पारंपरिक पद्धतीने शेती आणि पशुपालन करतात. गहू, कॉफी आणि इतर पिके येथे घेतली जातात. विशेष म्हणजे, जगप्रसिद्ध कॉफीचा उगम याच प्रदेशात झाला असे मानले जाते. येथील वनस्पती आणि प्राणीही वैशिष्ट्यपूर्ण आहेत. इथिओपियन लांडगा आणि जेलाडा नावाचा माकड तसेच डोंगरात राहणारा शेळीसारखा प्राणी म्हणजे वॉलिया आयबेक्स यासारखे अत्यंत दुर्मिळ प्राणी फक्त याच भागात आढळतात. उंच गवताळ प्रदेश, झुडपे आणि काही दाट जंगल भाग येथे दिसतात. इथे हवामान अनुकूल असल्यामुळे जैवविविधता समृद्ध आहे. इथिओपियन हायलँड्समधून अनेक महत्त्वाच्या नद्या उगम पावतात. त्यांपैकी ब्लू नाईल ही नदी विशेष प्रसिद्ध आहे. ही नदी पुढे जाऊन नाईल नदीला मिळते. त्यामुळे या प्रदेशाला पाण्याचे मनोरे असेही म्हणतात, कारण अनेक नद्यांचे स्रोत येथे आहेत.



पर्यटनाच्या दृष्टीनेही हा प्रदेश आकर्षक आहे. खोल दऱ्या, उंच कडे, धबधबे आणि हिरवेगार दृश्य यामुळे पर्यटक येथे येतात. काही भागांना राष्ट्रीय उद्यान म्हणून संरक्षण दिले गेले आहे.

## एल पी जी आणि पी एन जी

एलपीजी आणि पीएनजी हे दोन्ही इंधन म्हणून वापरले जातात.पण त्यांच्यात काही महत्त्वाचे फरक आहेत. एलपीजी म्हणजे लिक्विफाईड पेट्रोलियम गॅस. हा गॅस सिलिंडरमध्ये साठवला जातो. त्यात प्रामुख्याने प्रोपेन आणि ब्यूटेन असतात. ते दाबाखाली द्रवरूपात ठेवले जाते आणि वापरताना वायूरूपात बाहेर येते. क्रूड ऑइल शुद्ध करताना हा गॅस तयार होतो. पेट्रोल, डिझेल काढताना त्यातून एलपीजी हा उप उत्पादन म्हणून मिळतो.




त्यामुळे एलपीजीचा संबंध खनिज तेलाशी जास्त आहे. तर पीएनजी म्हणजे पाईप्ड नॅचरल गॅस. हा पाइपला–इनद्वारे थेट घरापर्यंत पोहोचवला जातो. यात मुख्यतः मिथेन असतो. त्यामुळे सिलिंडरची गरज नसते. पीएनजी मात्र थेट जमिनीखालून गॅसच्या साठ्यातून काढला जा–तो. तो खनिज तेलासोबत सापडू शकतो. पण तो स्वतंत्र साठ्यातही मिळतो.

## दूध ऊतू जाण्यामागचं विज्ञान

तापवायला ठेवलेलं दूध भसकन बाहेर आल्याचं तुम्ही पाहिलं असेल. अशा पद्धतीने दूध बाहेर पडण्याला दूध ऊतू जाणं असं म्हणतात. दुधाच्या बाबतीत असं का बरं होत असावं? यामागचं नेमकं कारण काय? हा प्रश्न तुम्हाला पडत असेल. यामागचं विज्ञान समजून घेऊया.

पाण्याप्रमाणे दूध हा साधासुधा द्रवपदार्थ नाही. दूध हा चिकट द्रव पदार्थ आहे. दुधात विविध प्रकारचे घटक असतात. प्रथिनं, साखर आणि फॅट्स हे दुधातले काही महत्त्वाचे घटक आहेत. दूध गरम करायला ठेवल्यानंतर त्यातली प्रथिनं आणि फॅट्स हे घटक वेगळे होतात. प्रथिनं आणि फॅट्सचं वजन दुधाच्या तुलनेत हलके असल्याने ते वरच्या भागात जाऊन बसतात. हे घटक सायीच्या रूपात दुधाच्या पृष्ठभागावर साठून राहतात. दुधात पाण्याचं प्रमाणही बरंच जास्त असतं. दूध गरम करण्याच्या प्रक्रियेदरम्यान यातल्या पाण्याचं बाष्पीभवन होतं. हे बाष्प वजनाने हलकं असल्याने वर येतं. पण दुधाच्या वरच्या भागात आधीच सायीचा थर तयार झालेला असल्याने हे बाष्प त्याखाली अडकून बसतं. दुधाला आणखी उष्णता मिळाल्यानंतर हे बाष्प प्रसरण पावतं आणि दुधाच्या वरच्या भागात जाडसर फेस तयार होतो.




यानंतर सायीच्या थराच्या खालच्या भागात अडकून पडलेलं बाष्प हा थर वर सरकवतं आणि अखेरीस या थराला भेदत बाहेर पडतं. बाष्प बाहेर येण्याच्या या प्रक्रियेमुळे दूध आणि साय भांड्याबाहेर सांडतात. दूध ऊतू जाण्यापासून आपण थांबवू शकतो. यासाठी बाष्पाला बाहेर जाण्याचा मार्ग उपलब्ध करून द्यायला हवा. यासाठी मोठ्या दांड्यांचा चमचा दुधात ठेवता येईल. यामुळे बाष्पाला बाहेर जायला मार्ग मिळतो आणि दूध ऊतू जात नाही.

## गूगलला कशी मिळतात उत्तरं?

वाचा तर खरं

कोणतीही माहिती मिळवायची म्हटली की आपण लगेच गूगलकडे वळतो. प्रत्येक प्रश्नाचं उत्तर गूगल देणारच याची आपल्याला पूर्ण खात्री असते. आता गूगलकडे ही सगळी माहिती येते तरी कुठून, गूगल स्वत:च सगळी माहिती मिळवतं का त्यांचेही काही स्रोत आहेत... चला तर मग या प्रश्नांची उत्तरं जाणून घेऊ.

सर्चमध्ये काही टाईप केल्यानंतर गूगल वेब पेजेसवर काय उपलब्ध आहे हे जाणून घेतं. यासाठी पेजेस क्रॉल केली जातात आणि नवी पेजेस जोडली जातात. यासाठी गूगल बॉट्स या वेब क्रॉलिंग सॉफ्टवेअरचा वापर केला जातो. हे क्रॉलर्स वेब पेजेस शोधून त्यावरील लिंक्स फॉलो करतात. मग ते एका लिंकवरून दुसऱ्यावर जाऊन माहिती गोळा करतात आणि गूगलच्या सर्व्हरवर आण–तात.




यानंतर इंडेक्सिंगची प्रक्रिया सुरू होते. क्रॉलर्सना वेबपेज सापडल्यानंतर कंपनीची प्रणाली त्यावरील माहिती तपासते. क्रॉल केलेल्या पानावर नेमकं काय आहे हे तपासलं जातं. यात की वर्डस, वेबसाईट किती नवीन आहे, जुनी माहिती आहे का हे सगळं पाहिलं जातं. मग सगळी माहिती गूगल इंडेक्समध्ये साठवून ठेवली जाते आणि मग एक डाटाबेस तयार केला जातो. गूगल सर्चमध्ये टाईप केल्यानंतर बरेच सर्च रिझल्ट्स दिसतात. हे सगळं या प्रक्रियेमुळे शक्य होतं. म्हणूनच गूगलकडे आपल्या सगळ्या प्रश्नांची उत्तरं असतात.

### प्राणी जगत

#### आफ्रिकेतले जंगली श्वान

आफ्रिका खंडात अनेक जंगलं आहेत. इथे गेल्यावर जंगल सफारीचा आनंद घेता येतो. सिंह, हत्ती, गेंडे असे अनेक प्राणी इथे पहायला मिळतात. इथे लांडग्यांसारखे दिसणारे जंगली कुत्रे आढळतात. हा प्राणी खूप हुशार आणि समाजप्रेमी असतो. त्यांची शेपूट झुबकेदार असते तर आकार मध्यम आकाराच्या कुत्र्यांएवढा असतो. हे प्राणी एकमेकांसोबत मिळून–मिसळून राहतात. ते आजारी, गरीब प्राण्यांना खातात. यामुळे पर्यावरणाचं संतुलन राखलं जातं.



### ट्राय इट

#### गाजराची पौष्टिक कोशिंबिर


मित्रांनो, गाजरामध्ये अनेक पोषक घटक असतात. 'अ' जीवनसत्त्व मिळवण्यासाठी गाजर खायला हवं. गाजराची कोशिंबिर खूप छान लागते.ती बनवायची पद्धतही खूप सोपी आहे. यासाठी तीन ते चार गाजरं, पाव कप बेदाणे, एक चमचा मायोनिज सॉस, ३ टेबलस्पून दही हे साहित्य घ्या. गाजर किसून घ्या. किसलेलं गाजर एका बाउलमध्ये ठेवा. त्यात बेदाणे घाला. आता मायोनिज आणि दही घालून नीट हलवून घ्या. चवीला मीठ घाला. हवं असेल तर थोडं तिखट घालता येईल. कांदा, टोमॅटो, कोबी अशा भाज्याही त्यात घालता येतील.



### लाईफस्टाईल

#### टॅटू काढत असाल तर...

सध्या टॅटूची क्रेझ आहे. अंगावर काढलेला टॅटू मस्त दिसतो. पण या टॅटूमुळे बरंच नुकसान होऊ शकतं. त्वचेचे विकार होऊ शकतात. टॅटू काढल्यानंतर साधारण वर्षभर तुम्हाला रक्तदान करता येत नाही. तसंच अंगावर सूज आणि पुरळ येऊ शकतं. जंतूसंसर्ग होण्याची शक्यता वाढते. टॅटूमुळे स्नायूंमध्ये वेदना जाणवू शकतात. त्यामुळे रस्त्यावरून किंवा एखाद्या जत्रेत गेल्यावर शक्यतो टॅटू काढू नका.



### योगा टाईम

#### जालंधर बंध

शरीरातला रक्तप्रवाह सुरळीत सुरू राहण्यासाठी जालंधर बंध हा प्रकार करता येईल. यासाठी मान खाली करून हनुवटी गळ्यामध्ये घट्ट दाबून धरा. यामुळे सुषुम्ना ही नाडी कार्यरत होते. यामुळे डोक्यातल्या वरच्या भागात असलेल्या पीनियल नामक ग्रंथींचं काम सुरू होतं. यामुळे हार्मोन्सचा स्राव वाढतो. हे हार्मोन्स हृदयापर्यंत पोहोचतात आणि रक्ताभिसरणाची क्रिया सुधारते.



## ट्रॅक्टर मशागतीचे दर एकरी ३०० रुपयांनी वाढले; शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले

# इंधन दरवाढ; मजूर टंचाईमुळे खर्च वाढला

**अंढेरा / प्रतिनिधी**

खरीप हंगाम तोंडावर आल्याने देऊळगाव राजा तालुक्यातील ग्रामीण भागात सध्या शेतीपूर्व मशागतीच्या कामांना वेग आला आहे. बंधारे दुरुस्ती, काडीकचरा वेचणे, शेत साफसफाई, नांगरणी, रोटाव्हेटर, पाळी देणे, पेरणीपूर्व मशागत आदी कामांसाठी शेतकरी मोठ्या प्रमाणावर ट्रॅक्टर व कृषी यंत्रांचा वापर करत आहेत. मात्र डिझेल-पेट्रोल दरवाढ, ग्रामीण भागातील इंधन टंचाई आणि तीव्र मजूर कमतरता यामुळे मशागतीच्या खर्चात मोठी वाढ झाली असून शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे.

देऊळगाव मही, सिनगाव, पांगरी .मेव्हणा राजा, तुळजापूर .अंढेरा, पाडळी शिंदे, शिवणी आरमाळ, पिंपरी आंधळे, टाकरखेड भागिले, नारायणखेड, दिग्रस, सरंबा, मंडपगाव, चिंचखेड आदी परिसरात खरीपपूर्व शेतीची लगबग सुरू झाली आहे. तूर, उडीद, मूग, सोयाबीन, मका, कपाशी आदी पिकांच्या पेरणीपूर्व तयारीसाठी शेतकरी दिवस-रात्र शेतात राबताना दिसत आहेत. शेतातील जुने बांध दुरुस्त करणे, पाण्याचा निचरा सुरळीत ठेवणे, काडीकचरा हटविणे तसेच मशागतीची प्राथमिक कामे पूर्ण करण्यासाठी शेतकऱ्यांची धावपळ सुरू आहे. मात्र डिझेल दरवाढ आणि वेळेवर इंधन उपलब्ध न होण्यामुळे ट्रॅक्टर व कृषी यंत्रांच्या भाड्यात मोठी वाढ झाली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा मशागतीचे दर प्रति एकर सरासरी २०० ते ३०० रुपयांनी वाढले आहेत.

ट्रॅक्टर, रोटाव्हेटर, नांगरणी, पाळी, पेरणी यंत्र आदी सर्वच कृषी कामांचे भाडे वाढल्याने लहान व मध्यम शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. अनेक ठिकाणी ट्रॅक्टर चालकांना डिझेलसाठी पेट्रोलपंपावर तास न तास प्रतीक्षा करावी लागत आहे. काही भागात डिझेलसाठी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असल्याने शेतीची कामे वेळेत पूर्ण होत नसल्याचे चित्र आहे.



**मशागतीचा खर्च वाढला**

गेल्या वर्षी ट्रॅक्टर मशागतीसाठी प्रति एकर १८०० ते २००० रुपये लागत होते. आता तोच खर्च २२०० ते २३०० रुपयांपर्यंत पोहोचला आहे. डिझेल मिळण्यात अडचणी येत असल्याने कामे वेळेत होत नाहीत. तसेच डिझेल दरवाढीमुळे आम्हालाही दर वाढवावे लागत आहेत.

**– लक्ष्मण भीमराव सानप,**
वाहनधारक, अंढेरा

**डिझेल टंचाईमुळे शेती कामे अडचणीत**

शेतीतील प्रत्येक काम वेळेत होणे गरजेचे असते. मात्र सध्या मजूर सहज मिळत नाहीत आणि मशागतीच्या दरातही मोठी वाढ झाली आहे. बियाणे, खते, औषधे यांचे दर आधीच वाढलेले आहेत. त्यात मशागत आणि मजुरीचा वाढलेला खर्च परवडत नाही. ग्रामीण भागातील इंधन पुरवठा सुरळीत करून शेतीसाठी आवश्यक डिझेल उपलब्ध करून द्यावे.

**– राजेंद्र शिरसाट,**
माजी तालुका अध्यक्ष,
राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.)

## ॲट्रोसिटी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी बुलढाणा येथे पोलीस कार्यशाळा

**बुलढाणा/ प्रतिनिधी**

नागरी हक्क संरक्षण पथक यांच्या वतीने २२ मे रोजी प्रभा हॉल, पोलीस मुख्यालय येथे अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९ तसेच सुधारित अधिनियम २०१५ च्या प्रभावी अंमलबजावणी व गुणवत्तापूर्ण तपासासाठी विशेष पोलीस कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत चाललेल्या या कार्यशाळेत जिल्ह्यातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

ही कार्यशाळा पोलीस महासंचालक, नागरी हक्क संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कार्यक्रमाची प्रस्तावना नागरी हक्क संरक्षण पथकाच्या पोलीस निरीक्षक अर्चना जाधव यांनी केली. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून अमोल गायकवाड (म.पो.से.), अपर पोलीस अधीक्षक, बुलढाणा हे उपस्थित होते. त्यांनी उपस्थित




अधिकारी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना अत्याचार प्रतिबंधक कायद्याची संवेदनशीलता लक्षात घेऊन प्रकरणांचा सखोल व निष्पक्ष तपास करण्याचे आवाहन केले. या कार्यशाळेत सेवानिवृत्त पोलीस उपअधीक्षक श्री दिलीप तडवी, बार्टीचे प्रकल्प अधिकारी महेंद्र शामदे, ॲड. दिपक मापारी तसेच ॲड. सानप, विधी व सेवा प्राधिकरण यांनी मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याच्या विविध तरतुदी, तपासाची प्रक्रिया, पीडितांना तात्काळ मदत व न्याय मिळवून देण्यासाठी आवश्यक उपाययोजना यावर सखोल मार्गदर्शन केले. कार्यशाळेत ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत दाखल होणाऱ्या गुन्ह्यांचा प्रभावी तपास, पुरावे संकलन, पीडितांच्या हक्कांचे संरक्षण तसेच कायद्याची काटेकोर अंमलबजावणी यावर विशेष भर देण्यात आला. यावेळी विविध प्रकरणांचे उदाहरण देत तपास प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी व त्यावरील उपाय याबाबतही चर्चा करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पोलीस उपनिरीक्षक रामदास वाढे व सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक केशव नागरे यांनी केले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी पोलीस निरीक्षक श्रीमती अर्चना जाधव व नागरी हक्क संरक्षण पथकाच्या टिमने परिश्रम घेतले.

## फुटबॉल सामन्यांत जिल्ह्यातील ७० खेळाडूंचा सहभाग




**बुलढाणा /प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य , पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय ,बुलढाणा व ब्राईट क्रीडा व बहुउद्देशीय संस्था ,बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक फुटबॉल दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या सामन्यांमध्ये जिल्ह्यातील ७० खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

फुटबॉल खेळाचा प्रचार व प्रसार व्हावा, लहान वयोगटातील खेळाडूंना एक प्लॅटफॉर्म व सुप्त गुणांना वाव मिळावा, त्यांच्यामध्ये खेळाची आवड निर्माण व्हावी म्हणून २१ ते २५ मे दरम्यान जिल्हा क्रीडा फुटबॉल प्रशिक्षण केंद्र ,जिजामाता क्रीडा संकुल येथे वयोगट १३ वर्षाखालील मुलांच्या फुटबॉल साखळी सामन्याचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा क्रीडा फुटबॉल प्रशिक्षण केंद्राच्या ४५ तर शारदा ज्ञानपीठ शाळेच्या २५ खेळाडूंनी सहभाग नोंदविला तर जिल्हातील एकूण ७० खेळाडूंनी ६ संघामध्ये सहभाग घेतला होता. २० मे २०२५ रोजी जिल्हा क्रीडा अधिकारी भक्ती आंब्रे, तालुका क्रीडा अधिकारी बी. एस. महानकर व प्रशांत मंडले यांच्याहस्ते स्पर्धाच्या टिशर्ट, ट्रॉफी व जागतिक फुटबॉल दिन लोगोच्या फ्रेमचे अनावरण करण्यात आले. स्पर्धेच्या बक्षिस वितरण कार्यक्रमाला जिल्हा क्रीडा अधिकारी भक्ती आंब्रे , उज्वला लांडगे, जिल्हा फुटबॉल संघटना अध्यक्ष एस. एस. ठाकरे आदींची उपस्थिती होती. सूत्रसंचालन राज्य क्रीडा मार्गदर्शक डॉ. जीवन मोहोड तर आभार प्रदर्शन मनोज श्रीवास यांनी केले .

## भोई समाजाच्या स्मशानभूमिवरील अतिक्रमण हटविण्याची मागणी

**बुलढाणा /प्रतिनिधी**

खामगाव तालुक्यातील लाखनवाडा बु. येथे भोई समाजाच्या पारंपरिक स्मशानभूमीवर गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या अतिक्रमणाच्या प्रकरणाने पुन्हा गंभीर वळण घेतले आहे. संबंधित अतिक्रमणधारकांकडून प्रशासनाच्या आदेशाचे उल्लंघन करून पुन्हा जागेवर कब्जा करण्याचा प्रयत्न सुरू असल्याने समाजामध्ये संताप आहे. भोई समाजाच्या स्माशानभूमीवरील अतिक्रमण तात्काळ हटवावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते प्रा. ज्ञानेश्वर बावणे यांनी केली आहे.

जिल्हा पोलिस अधिक्षक यांना दिलेल्या निवेदनात नमूद आहे की, सन २००० पासून काही व्यक्तींनी स्मशानभूमीवर बेकायदेशीररित्या अतिक्रमण करून विटभट्टी चालविणे तसेच इतर व्यावसायिक वापर सुरू करण्याचा प्रयत्न केला आहे. सदर जागा ही समाजाच्या अंत्यसंस्कार व धार्मिक विधींसाठी राखीव असूनही त्यावर मोठ्या प्रमाणात माती टाकून विटांचे उत्पादन करण्यात येत आहे. या संदर्भात समाजाकडून यापूर्वी



उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, मंडळ अधिकारी, तलाठी आदी संबंधित विभागांकडे अनेकदा तक्रारी व निवेदने देण्यात आली होती. तसेच गावचे सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामविकास अधिकारी आणि ग्राम महसूल अधिकारी यांच्या उपस्थितीत स्मशानभूमीचा ताबा घेण्याची कारवाईही करण्यात आली होती.

मात्र, २७ मे २०२६ रोजी अतिक्रमणधारकांनी प्रशासनाने उभारलेले तार कंपाऊंड अनधिकृतपणे काढून टाकून पुन्हा अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केला आहे. संबंधित व्यक्तींकडून विरोध करणाऱ्यांना जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. प्रशासनाकडे तात्काळ चौकशी करून संबंधित अतिक्रमणधारकांविरुद्ध कठोर कारवाई करावी तसेच स्मशानभूमीवरील अतिक्रमण कायमस्वरूपी हटवून समाजास न्याय द्यावा, अशी मागणी भोई समाजाच्या वतीने करण्यात आली आहे.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार; आरोपी अटकेत

**पिंपळगाव सराई / प्रतिनिधी**

सैलानी यात्रे दरम्यान एका अल्पवयीन मुलीस लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार करणाऱ्या रायपूर पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या साकेगाव येथील आरोपीस रायपूर पोलीसांनी अटक केले आहे.

साकेगांव येथील आशिक रिवाज पवार याने देऊळगाव राजा परिसरातील एका मुलीला २०२४ मध्ये सैलानी यात्रेमध्ये आपल्या प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिला लग्नाचे आमिष दाखवून तिचे सोबत इच्छेविरुद्ध वारंवार लैंगिक अत्याचार केले. तीला लग्नास नकार दिल्याने अल्पवायीन मुलीच्या तक्रारीवरून आरोपी विरूध्द रायपूर पोलीस स्टेशनला आरोपी विरुद्ध बलात्कार व पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई ठाणेदार निलेश सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी दशरथ शितोळे, राहुल जाधव, अनंत कळमकर, अख्तर शे पोउपनि गिरीशकुमार पाटील व लक्ष्मण शिंदे यांनी केली.

## गरजेपुरतेच पेट्रोल, डिझेल वापरण्याचे आवाहन

**सिंदखेडराजा/ प्रतिनिधी**



तालुक्यासह परिसरात सध्या डिझेल व पेट्रोलच्या तुटवड्याची परिस्थिती निर्माण झाल्याने अनेक पेट्रोल पंपावर वाहनाच्या लांबच लांब रांगा लागल्याचे दिसून येत आहे त्यामुळे गोंधळाचे वातावरण निर्माण होते या पार्श्वभूमीवर उपविभागीय अधिकारी सिंदखेडराजा प्रा संजय खडसे यांनी नागरिकांना महत्त्वाचे आव्हान करत घाबरून न जाता केवळ गरजेपुरतेच डिझेल पेट्रोल खरेदी करावे व कोणत्याही प्रकारचा अनावश्यक साठा करू नये असे आवाहन केले आहे.

गेल्या काही दिवसापासून पेट्रोल व डिझेल उपलब्ध बाबत विविध प्रकारच्या अफवा सोशल मीडियाच्या माध्यमातून पसरवल्या जात आहेत इंधन पूर्णपणे बंद होणार, इंधनपुरवठा बंद होणार, अशा प्रकारच्या संदेशामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे या अफवांमुळे नागरिक मोठ्या प्रमाणात पेट्रोल व डिझेल खरेदी करून त्याची साठवणूक करीत आहेत हे अनआवश्यक साठी बाजी चा थेट परिणाम सर्वसामान्य नागरिकावर होत असून त्यामुळे नागरिकांना तासनतास रांगेत उभे राहावे लागत आहे अनेकांना वेळेवर डिझेल व पेट्रोल न मिळाल्याने शेतकरी, रुग्णवाहिका, चालक, व्यापारी, प्रवासी तसेच आवश्यक सेवेमध्ये कार्यरत असलेल्या नागरिकांना मोठ्या अडचणीला सामोरे जावे लागत आहे.

एसडीओ प्रा.संजय खडसे यांनी सांगितले की पेट्रोल डिझेलचा पुरवठा सुरळीत सुरू ठेवण्यासाठी नागरिकांनी संयम राखून जबाबदारीने वागण्याची गरज आहे व आवश्यक तेवढेच इंधन घेतले तर सर्वांना नियमितपणे पेट्रोल व डिझेल उपलब्ध होऊ शकते कोणीही अनावश्यक प्रमाणात साठा करू नये. पेट्रोल पंपावर महसूल व पोलीस विभागाची संयुक्त यंत्रणा सतर्क असून परिस्थितीवर लक्ष ठेवले जात आहे.

### स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अभिवादन

**बुलढाणा :** स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात गुरूवारी निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे यांनी स्वातंत्र्यवीरांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केले. यावेळी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.


### जि. प.च्या न्यायालयीन अधिवक्ता पदी.ॲड.रोठे

**बुलढाणा :** जिल्हा परिषद अंतर्गत विविध विभागांमार्फत जिल्ह्यातील ग्रामीण भागातील योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करीत असतांना प्रशासकीय विभाग आणि अधिकाऱ्यांना येणाऱ्या न्यायालयीन अडचणी सोडविण्यासाठी सरकारी अधिवक्ता म्हणून ॲड.सतीशचंद्र रोठे पाटील यांची बुलढाणा जिल्हा परिषदचे सरकारी अधिवक्ता म्हणून निवड केली आहे. विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांच्या परिपत्रकानुसार जिल्हा परिषद सीईओ गुलाबराव खरात यांनी सदर नियुक्तीचे आदेश पारित केले आहे.

### तक्रारीच्या सोडवणूकीसाठी आ.श्वेता महाले यांची बैठक

**चिखली :** विधानसभा मतदारसंघाच्या आमदार श्वेता महाले यांनी दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी तहसील कार्यालय येथे जनता दरबार आयोजित करण्याचा उपक्रम सुरू केला आहे. मे महिन्यात झालेल्या पहिल्या जनता दरबारात प्राप्त २५० तक्रारींच्या सोडवणुकीचा आढावा घेण्यासाठी त्यांनी नुकतीच तहसील कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची बैठक घेतली. जनतेच्या प्रत्येक तक्रारीची दखल घेऊन कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी अधिकाऱ्यांना दिले.

## दैनिक महाभूमि शब्दसंगम 983



**–: आडवी विधाने :–**

1) भारतीय क्रिकेट संघाचा एक भूतपूर्व संघनायक
6) वानरसेनेला लंकेत नेण्यासाठी रामाच्या आज्ञेने समुद्रावर बांधलेला पूल
10) शक्ती, सामर्थ्य
11) इंद्राजवळ असलेले आयुध
12) ऊसाचा दाट रांधा
13) सत्यात नसलेले, खोटे
16) पाय, तंगडी, जनावरांच्या पावलावरील टणक त्वचा
18) रोख पैसे
19) लग्न लागल्यावर वधू-वरांच्या हातून करण्यात येणारा लाह्यांच्या होमाचा एक विधी
20) कीर्ती, प्रसिद्धी, जय
22) श्रीकृष्णाची आई
24) घरातील भिंतीवर, अडगळीच्या ठिकाणी आढळणारा एक जीव
25) रानात राहणारा, शहरी रीतभात माहित नसलेला
27) दिलेला शब्द न पाळणे
28) शक्ति, सामर्थ्य
30) शुद्ध, निर्मळ, पुण्यप्रद
31) आपले कार्य साधण्यासाठी गुप्तपणे दिलेले धन
32) मिठी, वेंध
34) मोरोपंतांनी रचलेले काव्य
36) X X X माझे मडके भरी, लहान मुलांचे एक गीत
38) अतिशय श्रीमंत व्यक्ती
40) वर्जणे, सोडणे, टाकणे
42) रंग
43) पूर्वीच्या काळातील राजा महाराजांचे एक वाहन
46) निराश, उदास
49) एक दिवस जेवण आणि एक दिवस उपवास या क्रमाने करण्याचे व्रत
50) उष्णता, ज्वर
52) तुकडा
53) विवाह प्रसंगी वधू आणि वर यांच्या कपाळावरील एक भूषण, हे बैलाच्या डोक्यावरसुद्धा असते
54) लालूच, मोह पाडणे
55) पद्धत, चालरीत
57) खूप गडबड, मस्ती
59) मृतास जिवंत करणारी वनस्पती
61) कोणत्याही कार्यात सर्वात महत्वाचा वाटा उचलणे
63) हाताचे किंवा पायाचे सर्वात लहान बोट
65) वक्रता
66) लोखंडाची भली मोठी जाड कांब
67) जासूस, गुप्तपणे बातम्या काढणारा
68) बिछाईत घालणारा (फारशी)
69) इराण देशात राहणारा
72) हुशारीने काम चालविणे, व्यवस्थित कारभार
74) अरण्य, जंगल
76) शरच्चंद्र चॅटर्जींच्या एका बंगाली कादंबरीत पारोच्या विरहाने मद्याच्या आहारी गेलेला प्रियकर
77) वाणी
78) दृढभक्ती, श्रद्धा, विश्वास
79) आच्छादन, वेष्टण, व्याप्ती

**–: उभी विधाने :–**

1) एखादी वस्तू देऊन त्याऐवजी दुसरी वस्तू घेणे
2) नांगर
3) ऑगस्ट हा महिना हिंदीत लिहा
4) आजारी व्यक्ती, रोगी
5) लग्नातील उत्सवमूर्ती
7) गुच्छ, मंजिरी, एक शिरोभूषण
8) पाणी तापविण्याचे पितळी किंवा तांब्याचे मोठे पात्र
9) पुण्याजवळ संत ज्ञानेश्वराची समाधी असलेले ठिकाण
13) दिवस-रात्र
14) ठेंगणा व्यक्ती
15) आयुष्याची गेलेली वर्षे
17) अतिशय कंटाळणे
18) प्राचीनकालीन दमयंतीचा प्रियकर
21) शब्दांची मनोवेधक रचना
23) धाक, दरारा
24) होडीस बांधलेला दोर, पगार
26) गुण-दोषाचे विवेचन करणारा, समीक्षक
29) मनस्वी, मनात येईल तसे वागणारा
30) ढग, मेघ
33) कॉम्प्यूटर
35) हत्या करणारा (हिं.)
37) प्राप्ती, येणे (प्राकृत)
39) पती, यजमान, स्वामी
41) हत्तीच्या चालीसारखी ऐटीत चालणारी स्त्री
44) भयंकर, दाट
45) अनुत्तीर्ण
46) पैसा म्हणून चालणारे धातूचे तुकडे
47) वारा भरण्याची कातडी पिशवी
48) एक सरपटणारा प्राणी
49) प्रज्वलित होणे, तापणे
51) दुरीकरण, निरसन
52) रात्री हळूच प्रकाशणारा एक किडा
53) वाफ तयार करण्याची क्रिया
54) येणे, प्राप्ती, येणारे
56) बोलणे, वाणी
58) बगिच्याची निगा राखणारा
60) अत्यंत जवळचा मित्र
61) राजाचे रत्नजडित आसन
62) टाचण्याची धातूची तार
64) श्रीकृष्णाची राजधानी
66) शेवटची हद्द, अतिशयपणा
70) दानव
71) मोठया भावाचे संबोधन
73) गव्हाचे दाणेदार पीठ
75) दागिना, वस्तु, पर्वत

(उत्तर पुढील अंकी)

**मागील महाशब्दकोडेचे उत्तर**

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रि | या | आ | ज | मा | झी | | स्मि | ता | त | ळ | व | ल | क | र | |
| य | | दा | मा | द | | पा | | रां | ग | | क्री | | मा | ग | णे |
| द | र | सा | ल | | वा | व | डिं | ग | | न | भ | स्त | ल | | |
| र्श | | | गो | व | र्ध | न | | ण | | र | व | | खा | स | गी |
| नी | र | | टा | | क्य | | क | | | | न | व | नी | त | |
| | ग | | | जा | | अ | वि | श्रां | त | | | म | हा | क्र | ली |
| गं | ड | घा | ल | णे | | स्थि | | त | प | न | | न | र | | ला |
| गा | | | व | | अ | पं | ग | | | व | ज्र | | | भां | |
| भा | त | | चि | त्ता | | ज | ड | भ | र | त | | मृ | दं | ग | |
| गि | | | क | | ना | र | द | | जा | र | ज | | ग | | पा |
| र | चि | त | | भा | ग | | | रा | | | हा | | | दा | ई |
| थी | | पा | | स | वा | र | | ज | | ख | ल | ब | त | | क |
| | शा | स | क | | पा | | ज | न | म | त | | ड | | चा | |
| पा | | नी | ला | | ऊ | द | | र्त | | रा | | त | रु | त | ल |
| न | व | स | | कं | स | | पा | की | जा | | उ | र्फ | | क | व |
| गा | र | | ना | क | | क्रे | क | | च | | मा | | | | ण |

uday munde - 8446302691

दैनिक महाभूमि

# अकोला भूमि

शुक्रवार । २९ मे २०२६

mahabhoomiakolawashim@gmail.com

## न्यूज ब्रीफ

### शिक्षण संस्थेला संगणक भेट

**अकोट:** आजच्या डिजिटल युगात संगणक शिक्षणाची गरज ओळखून श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था, श्री क्षेत्र श्रद्धासागर, अकोट येथे सुप्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ. साहेबराव वालसिंगे यांच्या तर्फे दोन संगणक भेट देण्यात आले. सदगुरू श्री जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था, श्री क्षेत्र आळंदी देवाची उपशाखा असलेल्या या संस्थेतील विद्यार्थी तसेच उन्हाळी शिबिरार्थ्यांना संगणक शिक्षणाचा लाभ मिळावा, या उद्देशाने ही मदत करण्यात आली.

### ट्रॅक्टरखाली येऊन चालकाचा दुर्दैवी मृत्यू

**अकोट:** तालुक्यातील बेलुरा येथे सध्या शेतीच्या मशागतीचे जोमाने कामे सुरू आहेत. शेतामध्ये फन्टन सुरू असताना ट्रॅक्टर चालकाला अचानक चक्कर आल्याने तो ट्रॅक्टरखाली पडला. त्यामुळे चालकाचा जागेवरच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. सविस्तर माहिती अशी की गणेश रामदास सोळंके वय ३२ असे संबंधित मृतक चालकाचे नाव आहे. दि. २७ मे बुधवारी सायंकाळी ५ वाजता दरम्यान गणेश ट्रॅक्टरने गावातीलच रामा सोळंके यांच्या शेतात फंटन मारत होता. त्याला चक्कर आल्याने चालू ट्रॅक्टरमध्ये तोल जाऊन मागील चाकात आला त्यामुळे जागेवरच मृत्यू झाला.

### युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

**मूर्तिजापूर:** तालुक्यातील सांगवामेळ येथे २१ वर्षीय युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना गुरुवार २८ मे रोजी उघडकीस आली. या प्रकरणी ग्रामीण पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत युवकाचे नाव दीप श्रीकृष्ण खंडारे (वय २१, रा. सांगवामेळ ता. मूर्तिजापूर) असे आहे. याप्रकरणी त्यांचे वडील श्रीकृष्ण गुलाबराव खंडारे (वय ५४) यांनी फिर्याद दिली आहे. २८ मे रोजी दुपारी सुमारास फिर्यादी जेवणासाठी घरी येत असताना त्यांची पत्नी अंगणवाडीतून घरी येताना रस्त्यात भेटली.

## ५० टक्के आरक्षण मर्यादेमुळे बदलणार ग्रा.पं.चे समीकरण

# जिल्ह्यात २४३ ग्रा.पं.साठी १२ जूनला आरक्षण सोडत

**अकोला / प्रतिनिधी**

जिल्ह्यातील ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने सदस्य आरक्षण निश्चितीचा कार्यक्रम जाहीर केला असून, आरक्षणाची एकूण मर्यादा ५० टक्क्यांच्या आत ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. ओबीसींसाठी २७ टक्के आरक्षण लागू करताना अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि ओबीसी आरक्षणाचा एकत्रित टक्का ५० च्या पुढे जाणार नाही, याची दक्षता घेण्यात येणार आहे.

या पार्श्वभूमीवर अकोला जिल्ह्यातील २४३ ग्रामपंचायत सदस्यांच्या आरक्षणाची सोडत १२ जून रोजी विशेष सभेत काढण्यात येणार आहे. या प्रक्रियेत कोणते प्रभाग कोणत्या प्रवर्गासाठी राखीव राहणार तसेच महिला आरक्षणाचे स्वरूप काय असेल, हे स्पष्ट होणार आहे. त्यामुळे इच्छुक उमेदवार आणि स्थानिक राजकीय गटांचे लक्ष आता या सोडतीकडे लागले आहे.




### आरक्षण प्रक्रियेचे वेळापत्रक

■ ८ जून रोजी विशेष ग्रामसभेची सूचना दिली जाणार आहे. १२ जून रोजी विशेष ग्रामसभेत आरक्षण सोडत काढली जाईल. १९ जून रोजी प्रारूप आरक्षण प्रसिद्ध केले जाईल, तर १९ ते २५ जूनदरम्यान हरकती नोंदविता येणार आहेत. अंतिम आरक्षणास १० जुलै रोजी जिल्हाधिकाऱ्यांची मंजुरी मिळणार आहे.

जिल्ह्यात सन २०२४ मध्ये २० ग्रामपंचायतींचा कार्यकाल संपला होता. त्यानंतर फेब्रुवारी २०२६ मध्ये आणखी २२३ ग्रामपंचायतींचा कार्यकाल पूर्ण झाला. अशा एकूण २४३ ग्रामपंचायतींसाठी आरक्षण प्रक्रिया राबविण्यात येत आहे. कार्यकाल संपल्यानंतर संबंधित ग्रामपंचायतींमध्ये प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली होती. यंदा ग्रामपंचायत सदस्य आरक्षण निश्चित करताना ५० टक्के मर्यादा काटेकोरपणे लागू केली जाणार आहे. त्यामुळे काही ग्रामपंचायतींमध्ये पूर्वीच्या तुलनेत आरक्षित जागांची संख्या कमी होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

### अपूर्णांकावर आरक्षणाला नाही मान्यता

■ पूर्वी सात सदस्यीय ग्रामपंचायतीत ३.५ जागांचा अपूर्णांक गृहित धरून चार जागा आरक्षित केल्या जात होत्या. मात्र, यंदा अपूर्णांक विचारात न घेण्याचा निर्णय घेतल्याने अशा ग्रामपंचायतींमध्ये तीनच जागा आरक्षित राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे विविध ग्रामपंचायतींमध्ये नवे राजकीय समीकरण तयार होणार असल्याचे बोलले जात आहे.

## महाविद्यालयात विज्ञान शाखेची मागणी!

**आडगाव बु / प्रतिनिधी**

अडगाव बु येथील जि प कनिष्ठ महाविद्यालयात गेल्या १९८५ पासून कला शाखा असून आता विज्ञान शाखेची मागणी नागरिकांनी केली आहे. अकोट हिवरखेड राज्य महामार्गावरील जि प कनिष्ठ महाविद्यालयाचा स्वतः चा मोठा परिसर असून वर्ग खोल्या ही उपलब्ध आहेत अडगाव बु च्या लगत पाच किलोमीटर च्या आत असलेल्या मालठाणा, शिवाजी नगर,चितलवाडी, खंडाळा,सदरपुर,चोरवड,एदलापुर,अडगाव खुर्द व सीरसोली येथील शेकडो विद्यार्थी आर्थिक भुर्दंड सहन करत विज्ञान शाखेच्या प्रवेशासाठी तालुका स्तरावर जात आहेत सद्द परीस्थितीत येथे असलेल्या कला शाखेला जोडून विज्ञान शाखा दिल्यास अडगाव परीसरातील विद्यार्थी वर्गाची सोय होईल व त्यांचा खर्च वाचेल.

अडगावसह परीसरातील नागरीकांनी विज्ञान शाखेची जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अकोला यांना माजी जि प सदस्य डॉ मनमोहन व्यास, गोपाल कोल्हे, माजी सरपंच अशोक घाटे, शाळा समिती अध्यक्ष विलास वानखडे व शिक्षण मित्र अमोल खंडारे यांनी दिलेल्या निवेदनातून मागणी केली आहे.



## धुळीच्या त्रासाविरोधात ‘भिकमांगो आंदोलन’

### नियमित पाणी मारण्याचे आश्वासन

**गणेश बुटे**

**अडगाव बु.:** एकीकडे देशात हायटेक रस्ते आणि ‘डिजिटल इंडिया’च्या घोषणा दिल्या जात असताना, दुसरीकडे रस्त्यावर उडणारी धूळ थांबवण्यासाठी नागरिकांना हातात झोळी घेऊन आंदोलन करावे लागत असल्याचे चित्र अडगाव बु. येथे पाहायला मिळाले.

सध्या अकोट ते हिवरखेड मार्गाच्या रुंदीकरणाचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. या कामासाठी रस्ता उखडण्यात आल्याने तसेच जड वाहनांची मोठ्या प्रमाणावर वाहतूक सुरू असल्याने परिसरात दिवसभर धुळीचे लोट उसळत आहेत. परिणामी वाहनचालकांना समोरील रस्ता दिसेनासा होत असून अपघाताचा धोका वाढला आहे. धुळीमुळे प्रवासी, पादचारी आणि स्थानिक व्यापाऱ्यांनाही श्वसन व डोळ्यांच्या आजारांचा त्रास होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. नियमांनुसार कंत्राटदाराने रस्त्यावर नियमित पाणी मारणे आवश्यक असताना त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत छत्रपती प्रतिष्ठानने आंदोलनाचा मार्ग स्वीकारला. प्रतिष्ठानचे अध्यक्ष पंकज देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली २७ मे रोजी सकाळी अडगाव बु. बसस्टँड परिसरात कार्यकर्त्यांनी हातात झोळी घेऊन ‘भिकमांगो आंदोलन’ सुरू केले. पाण्याच्या टँकरसाठी नागरिकांकडून मदत गोळा करण्यात आली. या आंदोलनाला स्थानिक व्यापारी आणि वाहनधारकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आंदोलनाची दखल घेत कंत्राटदाराच्या संबंधित कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. तसेच रस्त्यावर नियमितपणे पाणी मारण्यात येईल, असे आश्वासन देत तात्काळ पाणी मारण्यास सुरुवात करण्यात आली.

## कुटासा गावात रस्ते, नाल्यांची समस्या झाली बिकट

**अक्षय पाटील**

**अकोट :** अकोला जिल्ह्यातील अकोट तालुक्यातील कुटासा हे सुमारे वीस हजार लोकसंख्येचे मोठे गाव असले तरी आजही विविध मूलभूत समस्यांनी ग्रासलेले असल्याचे चित्र दिसून येत आहे.

गावातून अनेक राजकीय नेते उदयास आले, तसेच माजी आमदार अमोल मिटकरी हेही याच गावातील स्थानिक असून त्यांनी सहा वर्षे विधान परिषदेत आमदार म्हणून प्रतिनिधित्व केले. मात्र, गावाच्या सर्वांगीण विकासासाठी अपेक्षित पातळीवर काम झाले नसल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. गावात रस्ते, नाले आणि सांडपाण्याच्या समस्या गंभीर बनल्या असून अनेक ठिकाणी सांडपाणी थेट रस्त्यावर वाहत आहे. त्यामुळे दुर्गंधी वाढली असून विविध साथीच्या रोगांचा धोका निर्माण झाला आहे. गावातील अनेक रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. काही भागांतून वाहने चालविणेही कठीण झाले असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे.

ग्रामस्थांच्या मते, खराब रस्ते, तुंबलेल्या नाल्या आणि अस्वच्छतेमुळे दैनंदिन जीवनावर परिणाम होत आहे. विशेषतः पावसाळ्यापूर्वीच परिस्थिती गंभीर बनल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. या प्रश्नांवर स्थानिक लोकप्रतिनिधी आणि राजकीय नेते ठोस भूमिका घेत नसल्याचा आरोपही ग्रामस्थांकडून केला जात आहे. कुटासा गावातील वाढत्या समस्यांकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन रस्ते दुरुस्ती, नाल्यांची साफसफाई आणि सांडपाणी व्यवस्थापनाची कामे हाती घ्यावीत, अशी मागणी आता जोर धरत आहे.



> कुटासा या गावांमध्ये स्थानिक आमदार आणि स्थानिक नेते असून गावामध्ये रस्ते नाले पाणी कोणत्या कामाकडे लक्ष नाही सध्या कुटाच्या गावची परिस्थिती एकदम भकास झाली असून निवडणुकीमध्ये मोठे मोठे आश्वासन देणारे आता सगळे गायब झाले आहेत यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे संबंधित प्रशासन यांनी याकडे लक्ष देण्याची गरज आहे.
>
> – **वैभव जगताप**, संस्थापक अध्यक्ष, युवा प्रतिष्ठान

## अकोट येथे बकरी ईद उत्साहात

**अकोट / प्रतिनिधी**

हिवरखेड रोडवरील जुनी ईदगाह येथे गुरुवारी सकाळी ७.४५ वाजता ईद-उल-अजहा (बकरी ईद) निमित्त विशेष नमाज अदा करण्यात आली. मुस्लिम धर्मगुरू मौलवी रफिक साहब यांच्या मार्गदर्शनाखाली हजारो मुस्लिम बांधवांनी मोठ्या श्रद्धाभावाने नमाज पठण केले.

नमाजनंतर मौलवी रफिक साहब यांनी धार्मिक प्रवचनातून हिंदू-मुस्लिम समाजात एकता, बंधुता आणि प्रेम कायम राहावे तसेच देशात शांतता व सौहार्द टिकून राहावे यासाठी अल्लाहकडे प्रार्थना केली. यावेळी उपस्थितांनीही सामाजिक सलोखा जपण्याचा संदेश दिला. ईद-उल-अजहाच्या निमित्ताने अकोटचे उपविभागीय पोलीस अधिकारी निखिल पाटील, अकोट शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार अमोल माळवे तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विष्णू बोडखे यांनी जुनी ईदगाह येथे भेट देऊन मुस्लिम धर्मगुरू मौलवी रफिक साहब व मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. त्यांच्या उपस्थितीमुळे हिंदू-मुस्लिम ऐक्याचे सुंदर दर्शन घडल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. यावेळी जुनी ईदगाह ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. अंजुम काझी, हाजी अब्दुल रशीद, पत्रकार सैय्यद अहमद, नदीम खान, वसी पेंटर, सैय्यद नेहाल, आवेस खान यांच्यासह मुस्लिम समाजातील अनेक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, ईद-उल-अजहाची नमाज शांततेत आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडावी यासाठी पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता. याबद्दल जुनी ईदगाह ट्रस्टच्या वतीने पोलीस प्रशासनाचे आभार व्यक्त करण्यात आले.



## अधिक मास: ज्येष्ठ श्रीमद भागवत सप्ताह

**अकोट / प्रतिनिधी**

येथील श्री संत नरसिंग महाराज संस्थान व श्री संत नरसिंग महाराज झोपडी यांच्या संयुक्त विद्यमाने पवित्र अधिक मासानिमित्त ज्येष्ठ श्रीमद भागवत कथा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा धार्मिक सोहळा अधिक १ जून ते ७ जूनदरम्यान भक्तिमय वातावरणात पार पडणार आहे. या सप्ताहात प्रसिद्ध कथावाचक कुंजबिहारी महाराज (कामरगावकर) यांच्या मधुर वाणीतून श्रीमद भागवत कथा सादर करण्यात येणार असून परिसरातील भाविकांना कथा श्रवणाची सुवर्णसंधी लाभणार आहे. दररोज दुपारी ३ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत भागवत कथा होणार आहे. सप्ताहाचा समारोप सोमवार ८ जून रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत होणाऱ्या काल्याच्या कीर्तनाने होणार असून हे कीर्तन अशोक महाराज राजगुरु सादर करणार आहेत. सप्ताहादरम्यान दररोज सायंकाळी ७ वाजता हरिपाठ तसेच रात्री ८ ते १० या वेळेत हरिकीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. हरिकीर्तनासाठी येणाऱ्या कीर्तनकारांची नावे दररोज भागवत कथेदरम्यान जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. याशिवाय विटाळी, सावरगाव, वणी वारुळा आणि नंदीपेठ येथील भजन मंडळेही या कार्यक्रमात सेवा देणार आहेत.

## अकोला जीएमसीच्या एआरटी विभागाचा गौरव

**अकोला / प्रतिनिधी**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला येथील एआरटी विभागाने एचआयव्ही नियंत्रण आणि रुग्णसेवेत केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल विभागाचा नुकताच गौरव करण्यात आला.

जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या हस्ते एआरटी विभाग प्रमुख डॉ. आशिष लाहोळे यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. आंध्र प्रदेश येथे सीएसटी विभागांतर्गत आयोजित केंद्रस्तरीय आढावा बैठकीत महाराष्ट्र राज्याच्या एआरटी सेवेला प्रथम श्रेणी प्रदान करण्यात आली होती.

तसेच राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये करण्यात आलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल सीएसटी विभागाचाही गौरव करण्यात आला. नुकत्याच झालेल्या कार्यक्रमात जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या हस्ते डॉ. आशिष लाहोळे यांना प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी एआरटी विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. एआरटी विभागाला उत्कृष्ट कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले आहे.



### राज्यस्तरावर अकोल्याच्या कार्याची दखल

■ महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई अंतर्गत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अकोला येथील एआरटी केंद्राने केलेल्या कामाची विशेष दखल घेण्यात आली. अधिष्ठाता, नोडल अधिकारी तसेच विभागातील अधिकारी-कर्मचारी यांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे हे यश मिळाल्याचे प्रशस्तीपत्रात नमूद करण्यात आले आहे.

## जिल्हाधिकारी मीणा : सोनोग्राफी केंद्रांवरील तपासण्या वाढवण्याचे निर्देश

# पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करा

**अकोला / प्रतिनिधी**

गर्भधारणा पूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्रज्ञान (लिंग निवड प्रतिबंध) अर्थात पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्ह्यातील सोनोग्राफी केंद्रांवर नियमित निरीक्षण व छापेमारीची संख्या वाढवावी, तसेच ‘ट्रॅकिंग सिस्टिम’ अधिक सक्षम करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीणा यांनी दिले.

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा एड्स नियंत्रण समिती, तंबाखू विरोधी अभियान तसेच पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गत गठित समितीच्या बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. बैठकीला जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बलिराम गाढवे, डॉ. आशा मिरगे, मोहन खडसे, डॉ. सीमा तायडे, प्रतिभा अवचार, डॉ. विनोद करंजीकर, कायदेशीर सल्लागार ॲड. शुभांगी ठाकरे, डॉ. मनीष शर्मा आणि जिल्हा कार्यक्रम अधिकारी दर्शन जनइकर उपस्थित होते. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी सांगितले की, पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सोनोग्राफी केंद्रांवर नियमित तपासण्या आणि छापेमारी वाढविणे आवश्यक आहे. भ्रूण लिंग तपासणीबाबत माहिती देणाऱ्या व्यक्तीस शासनाकडून १ लाख रुपयांचे बक्षीस देण्याची तरतूद असून, या कायद्याबाबत व्यापक जनजागृती करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.




### तंबाखूविरोधी अभियानाला गती

■ कोटपा कायद्यांतर्गत तंबाखूजन्य पदार्थांच्या प्रतिबंधासाठी प्रत्येक शाळेत नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जागतिक तंबाखू निषेध दिनानिमित्त पोस्टर स्पर्धा, रील स्पर्धा तसेच विविध जनजागृती उपक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

### एचआयव्ही नियंत्रणात सकारात्मक प्रगती

■ जिल्ह्यात सध्या ६७ तपासणी व उपचार केंद्र कार्यरत असून ४ हजार ८०० रुग्णांवर उपचार सुरू आहेत. २०१५-१६ मध्ये ४३० एचआयव्ही बाधित आढळले होते, तर २०२५-२६ मध्ये ही संख्या घटून १७३ वर आली आहे. गर्भवती महिलांमधील संसर्गाचे प्रमाणही घटले असून २०१५ मध्ये २१ महिलांमध्ये संसर्ग आढळला होता, तर २०२५-२६ मध्ये ही संख्या केवळ ३ वर आली असल्याची माहिती दर्शन जनइकर यांनी दिली.

### जनजागृतीसाठी विविध उपक्रम

■ एचआयव्ही नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील १८ महाविद्यालयांमध्ये रेड रिबन क्लब स्थापन करण्यात आले असून २१० शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच जनजागृतीसाठी सायक्लोथॉनचे आयोजन करण्यात आले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील एआरटी केंद्राला राज्यातील सर्वोत्कृष्ट केंद्राचा मान मिळाल्याबद्दल जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

## कुंभारीत १ जूनपासून निवासी बालसंस्कार शिबिर

**अकोला / प्रतिनिधी**

जय बजरंग व्यायाम शाळा, जय बजरंग विद्यालय कुंभारी आणि जिल्हा क्रीडा कार्यालय अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने १० ते १५ वर्षे वयोगटातील मुलांसाठी दहा दिवसीय ग्रीष्मकालीन निवासी बालसंस्कार व क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर १ जून ते १० जूनदरम्यान कुंभारी येथील जय बजरंग विद्यालयात होणार असून विविध शालेय क्रीडा प्रकारांसह संस्कारवर्गाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

शिबिरात मुलांसाठी निवासी सुविधा उपलब्ध असणार असून मुलींसाठी अनिवासी स्वरूपात प्रशिक्षण दिले जाणार आहे. मुलींना सकाळी ६ वाजता शिबिरस्थळी आणून सायंकाळी ८ वाजता पालकांनी परत घेऊन जाण्याचे नियोजन करण्यात आले आहे. शिबिर पूर्णतः मोफत असून सहभागी मुला-मुलींसाठी भोजन, दोन वेळचा नाश्ता तसेच लोअर व टी-शर्ट स्वरूपातील गणवेश आयोजकांकडून उपलब्ध करून दिला जाणार आहे. प्रशिक्षणात योग, व्यायाम, कवायत, समूहगान, देशी खेळ, संस्कार प्रबोधन व ज्ञानामृत सत्रांचा समावेश राहणार आहे. तसेच धनुर्विद्या, योग, नेटबॉल, थ्रोबॉल आणि मल्लखांब यांसारख्या शासनमान्य खेळांचे प्रशिक्षण नामांकित प्रशिक्षकांकडून दिले जाणार आहे. कुंभारी, कातखेड, कैलासनगर, मराठा नगर, येवता आणि परिसरातील ग्रामीण भागातील विद्यार्थी या शिबिरात सहभागी होऊ शकणार आहेत. शिबिर आयोजन समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

## न्यूज ब्रीफ

### भाविकाची बॅग फोडून २१ हजारांचा ऐवज लंपास

**शेगाव :** दर्शनासाठी आलेल्या बिपीन शेषराव राऊत (३२) रा. गोधनी रेल्वे, नागपूर यांची बॅग फोडून मोबाइल, रोख रक्कम व महत्त्वाची कागदपत्रे असा एकूण २१ हजार २०० रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना आनंद विसावा मंडप क्रमांक १ येथे घडली. याप्रकरणी २७ मे रोजी शेगाव शहर पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### टिनपत्री गोडाऊनवर पोलिसांचा धाडसी छापा

**पिंपळगाव राजा :** पिंपळगाव राजा ते तरवाडी मार्गावरील बगाडे फिल्टर प्लॅन्टच्या मागील टिनपत्री गोडाऊनवर खामगाव उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय आणि खामगाव ग्रामीण पोलिसांच्या संयुक्त पथकाने २७ मे रोजी धाड टाकून तब्बल ४ किलो गांजा तसेच सार्वजनिक वितरण प्रणालीतील २३ क्विंटलहून अधिक तांदूळ जप्त केला. या कारवाईमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून अवैध साठेबाजी व अमली पदार्थाच्या व्यवहारांवर पोलिसांनी मोठा आळा घालण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येत आहे. पिंपळगाव राजा येथील गुलजारपुरा भागातील रहिवासी मोहम्मद अतीक मोहम्मद शफीक याच्या ताब्यातील गोडाऊनमध्ये संशयास्पद माल साठवून ठेवण्यात आल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पंचांसमक्ष तसेच महसूल आणि पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत गोडाऊनची सखोल तपासणी करण्यात आली.

### घराबाहेर पडलेली विवाहित महिला बेपत्ता

**मलकापूर :** तालुक्यातील दाताळा येथील कोळीवाडा परिसरातून २६ मे रोजी ई-केवायसी करण्यासाठी मलकापूरला जात असल्याचे सांगून घराबाहेर पडलेली एक विवाहित महिला बेपत्ता झाल्याची घटना घडली आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आशा निवृत्ती चंडोल (३०), रा. टिटवी, ता. सोयगाव, जि. संभाजीनगर व सध्या रा. कोळीवाडा, दाताळा या २६ मे रोजी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास लाडकी बहीण योजनेचे पैसे खात्यात जमा होत नसल्याने ई-केवायसी करण्यासाठी मलकापूर येथे जात असल्याचे सांगून घरातून निघून गेल्या होत्या. त्यानंतर त्या परत न आल्याने त्यांच्या नातेवाईकांनी गावात तसेच इतर संभाव्य ठिकाणी शोध घेतला, मात्र त्यांचा कोणताही ठावठिकाणा लागला नाही. याबाबत सविता उखा वरकडे (६०) रा. कोळीवाडा, दाताळा यांनी मलकापूर ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दिली. तक्रारीवरून पोलिसांनी बेपत्ता महिलेची नोंद करून शोधकार्य सुरू केले आहे.

---

#### इंधन दरवाढी विरोधात काँग्रेसचे आंदोलन ; राष्ट्रपतींना निवेदन

# मेलोडी चॉकलेट वाटून जनविरोधी धोरणांचा काँग्रेसकडून निषेध

**खामगाव/प्रतिनिधी**

देशात सातत्याने होणारी इंधन दरवाढ आणि महागाई विरोधात तसेच शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी २८ मे रोजी बुलढाणा जिल्हा काँग्रेस कमिटी अनुसुचित जाती विभाग व खामगाव विधानसभा काँग्रेस कमिटीच्या वतीने येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले.

आंदोलनानंतर उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत महामहीम राष्ट्रपती व राज्यपाल यांना मागण्यासंदर्भात निवेदन सादर करण्यात आले. सदर निवेदनामध्ये केंद्र व राज्य सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे दिवसेंदिवस इंधन दरवाढ होत असून शेतकऱ्यांना वेळेवर डिझेल मिळत नाही, त्यांना डिझेल पंपावर तासंतास रांगेत उभे राहावे लागत असून त्याचा शेतीच्या कामावर परिणाम होत



आहे. तसेच शेतकऱ्यांच्या शेती मालाला म्हणजे कांद्याला योग्य भाव मिळत नाही तर दुसरीकडे बी बियाणे व रासायनिक खतांच्या किंमती सुध्दा खूप वाढल्या असून यामुळे बळीराजा संकटात सापडला आहे. तरी सरकार व प्रशासनाने तातडीने पेट्रोल व डिझेलचे दर कमी करावेत, शेतकऱ्यांना शेती कामासाठी डिझेलचा पुरवठा सुरळीत करावा, कांद्याला उत्पादन खर्चावर आधारित भाव द्यावा, शेतकऱ्यांना पाहिजे ते खत दरवाढ न करता, लिंकींग न करता उपलब्ध करून देण्यात यावे, बि बियाणे विक्री मध्ये यापूर्वी काळाबाजार व बोगस बियाणे विक्री झाल्याचे प्रकार घडलेले आहेत, त्यामुळे शेतकऱ्यांना चांगल्या प्रकारचे बि बियाणे माफक व रास्त दरात उपलब्ध करुन देण्यात यावे आदी मागण्या करण्यात आल्या आहेत.

या आंदोलनात काँग्रेस पक्षाचे अनु. जाती विभाग अध्यक्ष ॲड. अशोक इंगळे, काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष तेजेंद्रसिह चौहाण, शहराध्यक्ष स्वप्निल ठाकरे पाटील, कार्याध्यक्ष किशोरआप्पा भोसले, ओबीसी विभागाचे सचिव अजय तायडे, शेगाव तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर शेजोळे, जिल्हा सरचिटणीस संजय तायडे, खरेदी विक्री संघाचे संचालक पांडुरंग राखोंडे, कृउबास संचालक प्रमोद चिंचोळकर, ओबिसी तालुकाध्यक्ष गुलाबराव निंबाळकर, विमुक्त जाती विभागाचे तालुकाध्यक्ष संदिप राठोड, सेवादलाचे तालुकाध्यक्ष सोपान पाटील, किसान काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रकाश इंगळे, एनएसयुआयचे तालुकाध्यक्ष साहिल देशमुख, शहराध्यक्ष सौरभ रिछारिया, श्रिकृष्ण मोरे, निलेश देशमुख, ॲड. अविनाश इंगळे, राजकुमार शेगोकार, सुधाकर डुकरे, दिलीपसिंह राजपूत, गणेशराव खराटे, मिरगे, अमित तायडे, अजय पवार, अमोल वावगे, विठ्ठल हिंगणे, ओम डांगे, कृष्णा बोदडे, गणेश तायडे, गजाननराव हिंगणे, रविंद्र सोळंके, वैभव तायडे, महादेव बुंदे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते संख्येने उपस्थित होते.

> ■ यावेळी केंद्र सरकारच्या जनविरोधी धोरणांचा निषेध करत काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी संपूर्ण परिसर घोषणाबाजीने दणाणून सोडला. तसेच नागरिकांना मेलोडी चॉकलेटचे वाटप करून भाजपा सरकारचा अनोखा निषेध नोंदविण्यात आला.

---

## जान्हवी माहुरेला संजय गांधी निराधार योजनेचा आधार

#### मंजुरीपत्र वसावे व कविता इंगळे यांच्या हस्ते प्रदान



**खामगाव/प्रतिनिधी**

शहरातील दाळफैल परिसरात वास्तव्यास असलेल्या माहुरे कुटुंबातील सहा वर्षांची जान्हवी बजरंग माहुरे हिला संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत मंजुरी मिळाली असून तिच्या हाती नायब तहसीलदार यांच्याहस्ते मंजुरीपत्र प्रदान करण्यात आले.

जान्हवी ही जन्मताच दोन्ही डोळ्यांनी अंध असून कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. या संदर्भाची माहिती मिळाल्यानंतर विराट मल्टिपर्पज फाउंडेशनच्या जिल्हाध्यक्ष कविता इंगळे यांनी पुढाकार घेत जान्हवीसाठी यूडीआयडी आधारे १०० टक्के अंधत्वाचे प्रमाणपत्र मिळवून दिले. त्यानंतर कुटुंबाची परिस्थिती लक्षात घेता जान्हवीला आर्थिक सहाय्य मिळावे, यासाठी संजय गांधी निराधार योजनेचा प्रस्ताव तहसील कार्यालयाकडे सादर करण्यात आला. प्रकरणाची दखल घेत तहसीलदार सुनील पाटील यांनी नायब तहसीलदार शिरीष वसावे यांना तत्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार संबंधित प्रकरण जलदगतीने निकाली काढण्यात आले. मंजुरीपत्राचे वितरण गौरक्षण रोडवरील श्री गजानन महाराज मंदिराजवळ आयोजित कार्यक्रमात नायब तहसीलदार शिरीष वसावे व कविता इंगळे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी विजय उगले, शत्रुघन इंगळे, पल्लवी पाटील, प्रदीप वेरुळकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमास जान्हवीचे कुटुंबीय गजानन दामोदर माहुरे, कांता माहुरे तसेच गणेश बऱ्हाणपूरे, यश इंगळे, शैलेश गवई, देविदास कल्याणकर आदी उपस्थित होते. या उपक्रमासाठी विराट मल्टिपर्पज फाउंडेशनचे विशेष योगदान लाभले.

---

## अजिंक्य तिडके यांना राजीव गांधी कृषीरत्न पुरस्कार

**सोनाळा/प्रतिनिधी**

सोनाळा येथील युवा कृषी उद्योजक तथा प्रगतशील शेतकरी अजिंक्य तिडके यांना सन २०२६ चा राज्यस्तरीय राजीव गांधी कृषीरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. शेतकऱ्यांच्या उपस्थितीत त्यांच्या शेतीच्या बांधावर हा सन्मान सोहळा पार पडला.

राजीव गांधी कृषी विज्ञान प्रतिष्ठान, अमरावती यांच्या वतीने दरवर्षी महाराष्ट्रातील नाविन्यपूर्ण शेती करणारे तसेच शेतीपूरक उद्योग उभारणाऱ्या प्रगतशील शेतकऱ्यांचा माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त गौरव केला जातो. यावर्षी हा मान अजिंक्य तिडके यांना मिळाल्याने परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. कार्यक्रमात



बोलताना प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रकाश साबळे यांनी अजिंक्य तिडके यांनी आधुनिक शेतीसोबत शेतीपूरक उद्योग उभारून युवकांसमोर आदर्श निर्माण केल्याचे सांगितले. त्यांच्या कार्यातून इतर युवकांना शेतीकडे वळण्याची प्रेरणा मिळेल, असेही त्यांनी नमूद केले. यावेळी श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीचे उपाध्यक्ष केशवराव मेतकर यांनी शेतकऱ्यांनी जैविक तंत्रज्ञान व आधुनिक शेती पद्धतीचा अवलंब करण्याचे आवाहन केले. तसेच जिजामाता कृषिभूषण पुरस्कार प्राप्त महिला शेतकरी पौर्णिमा सवाई यांनी युवकांनी शेतीसोबत पूरक व्यवसायाला प्राधान्य द्यावे असे मत व्यक्त केले. हा कार्यक्रम अजिंक्य तिडके यांच्या शेती व संबंधित उद्योगाच्या ठिकाणी संपन्न झाला. यावेळी मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. कार्यक्रमास विश्वनाथ तिडके, केशवराव मेतकर, डॉ. दिलीप काळे, गुलाबराव महाले, डॉ. मुकेश कापरे, ऐनल्ला खान, अजीज खान आदी मान्यवर उपस्थित होते. विशेष म्हणजे, अजिंक्य तिडके यांनी शेतकरी प्रतिनिधी मंडळासोबत स्पेन व युरोप देशांचा कृषी अभ्यास दौरा केला आहे. त्यानंतर त्यांनी सोनाळा परिसरात कृषी उद्योगाला चालना देत रोजगार निर्मितीला गती दिली. तसेच जेएसटी फ्रुट्सच्या माध्यमातून संत्रा व्यापार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत कृषी व्यवसायात नवे दालन खुले केले आहे. आपल्या सत्काराला उत्तर देतांना अजिंक्य तिडके यांनी दैनिक महाभुमीचे आभार व्यक्त केले. यापूर्वीही अजिंक्य तिडके यांना मिळालेल्या पुरस्काराच्या बातम्या प्रकाशित केल्या होत्या. त्यामुळे त्यांनी सत्काराला उत्तर देताना भाषणात दैनिक महाभुमीचे आभार व्यक्त केले.

---

## हजारो मुस्लिम बांधवांनी केली ईदगाह येथे ईद-उल-अजहाची नमाज अदा

**खामगाव/प्रतिनिधी**

सजनपुरी येथील ईदगाह येथे २८ मे रोजी सकाळी ९:०० वाजता हजारो मुस्लिम बांधवांनी ईद-उल-अजहाची नमाज अदा केली. फाटकपुरा मशिदीचे पेश इमाम हाफिज सरफराज खान यांनी नेतृत्व करुन ईदची नमाज पठण केली. ईदच्या नमाजानंतर, हाफिज सरफराज खान यांनी खुतबा दिला. नंतर सामूहिकरीत्या दुआ (प्रार्थना) मागितली. त्यामध्ये त्यांनी देशात आणि खामगाव शहरात शांतता व सलोखा नांदावा, एकमेकांमध्ये प्रेम, स्नेह आणि बंधुभाव टिकून राहावा, आपल्या मातृभूमी हिंदुस्तानचे दहशत आणि भीतीपासून रक्षण व्हावे, जगातील सर्व मानवतेचे रक्षण करावे तसेच वीर जवानांचे आरक्षण करावे, आजारी लोकांना आरोग्य लाभावे, अशा सामूहिक प्रार्थना करण्यात आल्या. याशिवाय, पावसाळा सुरू व्हावा आणि आशीर्वादांचा वर्षाव व्हावा. यासाठीही प्रार्थना करण्यात आल्या. नमाजानंतर, मुस्लिम बांधवांनी



एकमेकांना अलिंगण दिल्या. ईदगाह नंतर मुस्लिम बांधवांनी स्थानिक बड़े प्लॉट येथील कब्रस्तानात जाऊन आपल्या नातेवाईकांच्या कबरींसाठी प्रार्थना केली. ईदगाहमध्ये लहान मुलांसाठी खेळण्यांचे दुकान उभारण्यात आले होते, जिथे मुलांनी भरपूर खरेदी केली. ईदगाह आणि शहरातील विविध परिसरांमध्ये कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. ईदगाहच्या नमाजापूर्वी, मुस्लिम बांधवांनी सकाळी ६:३० ते ८:३० दरम्यान शहरातील विविध मशिदींमध्ये नमाज अदा केली.

---

## शेतकऱ्याला मारहाण; चौघांविरुद्ध गुन्हा

**मलकापूर/प्रतिनिधी**

गावाजवळील पुलाजवळ शेती कामावरून घरी परतणाऱ्या एका शेतकऱ्याला अडवून, लोखंडी रॉडने मारहाण केल्याची घटना समोर आली. चार जणांच्या टोळक्याने केलेल्या या हल्ल्यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी मलकापूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अरूण श्यामराव तायडे (४२), रा. पान्हेरा वडोदा हे २५ मे रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास पान्हेरा गावाजवळील पुलावरून जात होते. यावेळी आरोपी भैय्या ज्ञानदेव गायकवाड, मुन्ना ज्ञानदेव गायकवाड, निलेश विजय वेरूळकर आणि अमोल विजय वेरूळकर (सर्व रा. वडोदा) यांनी त्यांना अडवले. भैय्या गायकवाड याने अरुण तायडे यांना 'तुला जास्त मस्ती आली आहे,' असे म्हणत हातातील लोखंडी रॉडने त्यांच्या डाव्या हातावर प्रहार केला. इतकेच नाही तर इतर तीन आरोपींनी मिळून अरूण तायडे यांना चापटबुक्क्यांनी मारहाण केली. यावेळी आरोपींनी त्यांना शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी देखील दिली. या घटनेनंतर अरूण तायडे यांनी मलकापूर शहर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदविली. पोलिसांनी भैय्या ज्ञानदेव गायकवाड, मुन्ना ज्ञानदेव गायकवाड, निलेश विजय वेरूळकर आणि अमोल विजय वेरूळकर यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

---

## कठीण परिस्थितीवर मात; सोनाजी नगरच्या दोन युवकांची मुंबई पोलिस दलात निवड

**सोनाळा/प्रतिनिधी**

संग्रामपूर तालुक्यातील सोनाळा येथील सोनाजी नगर परिसरातील दोन होतकरू युवकांनी कठीण परिस्थितीवर मात करत मुंबई पोलीस दलात निवड मिळवून परिसराचे नाव उज्वल केले आहे. गोपाल शंकर चव्हाण व किरण सुरळकार या दोन्ही युवकांच्या यशामुळे संपूर्ण परिसरातून त्यांचे कौतुक होत आहे.



विशेष म्हणजे हे दोघेही युवक यापूर्वी बुलढाणा होमगार्ड पदावर कार्यरत होते. पोलीस होण्याचे स्वप्न त्यांनी जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर पूर्ण करून दाखवले. गोपाल शंकर चव्हाण हा युवक होमगार्डची ड्युटी नसताना स्वतःचा व्यवसाय सांभाळत होता. अत्यंत कठीण परिस्थितीतून संघर्ष करत त्याने हे यश संपादन केले. गोपाल व त्याचे दोन भाऊ सैनिक सेवेत असून देशसेवा करत आहेत, ही बाब परिसरासाठी अभिमानाची ठरत आहे. तर किरण सुरळकार याची आर्थिक परिस्थितीही अत्यंत हलाखीची होती. होमगार्डची ड्युटी नसताना तो शेतीची कामे करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होता. त्याचबरोबर पोलीस भरतीची तयारी सुरू ठेवत अखेर मेहनतीचे फळ म्हणून त्याची मुंबई पोलीस दलात निवड झाली. विशेष म्हणजे गोपाल चव्हाण व किरण सुरळकार हे दोघे जिवलग मित्र असून दोघेही होमगार्ड म्हणून कार्यरत होते. तसेच ते एकाच परिसरात म्हणजेच सोनाजी नगर, सोनाळा येथे वास्तव्यास आहेत. या दोन्ही युवकांच्या यशामुळे संपूर्ण सोनाळा परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांकडून त्यांचे कौतुक केल्या जात आहे.

---

## खामगावात दोघांचा संशयास्पद मृत्यू

**खामगाव :** शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दोन वेगवेगळ्या संशयास्पद मृत्यूंची नोंद झाल्याने खळबळ उडाली आहे. दोन्ही घटनांमध्ये पोलिसांकडून मर्ग दाखल करण्यात आला असून पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे.

पहिल्या घटनेत अकोला येथील प्रसाद सोसायटी, गोकुळ कॉलनी परिसरातील रहिवासी विरेश वसंतराव ढोके (४५) यांना २७ मे रोजी सायंकाळी मृत अवस्थेत खामगाव येथील सामान्य रुग्णालयात आणण्यात आले. मोहाडी ता. खामगाव हद्दीत ही घटना घडल्याची माहिती समोर आली आहे. डॉ. वेदांती शिंगाडे यांच्या लेखी मेमोवरून कक्षसेवक छगण महादेव भोयर यांनी पोलिसांना माहिती दिल्यानंतर कक्षसेवक छगण महादेव भोयर यांनी पोलिसांना माहिती दिल्यानंतर खामगाव शहर पोलिसांनी कायम मर्ग दाखल केला. या प्रकरणाचा प्राथमिक तपास पोहेकॉ. नारायण चव्हाण यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. दुसऱ्या घटनेत खामगावातील शिवाजी वेस परिसरातील रहिवासी सागर संतोष पुरोहित (३०) यांचा संशयास्पद मृत्यू झाल्याची नोंद करण्यात आली आहे. अनुपम स्टोअरसमोरील फरशी परिसरात ते बेशुद्ध अवस्थेत पडलेले आढळून आले होते. त्यानंतर आनंद गांधी यांनी त्यांना तातडीने सामान्य रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले. या प्रकरणीही डॉ. वेदांती शिंगाडे यांच्या तर्फे कक्षसेवक छगण महादेव भोयर यांनी दिलेल्या माहितीवरून कायम मर्ग दाखल करण्यात आला आहे.

---

#### महागाईमुळे सोन्या-चांदीला दिला जातोय फाटा

# धोंडेवाणात तांबे-पितळांच्या भांड्यांना पसंती



**खामगाव/प्रतिनिधी**

तीन वर्षातून एकदा येणाऱ्या आणि हिंदू संस्कृतीमध्ये पवित्र मानल्या जाणाऱ्या अधिक मासानिमित्त सध्या जावयाला धोंडेवाण (वाण) देण्याची लगबग सर्वत्र सुरू झाली आहे. अधिक महिन्यात जावयाला सोन्या-चांदीच्या वस्तू किंवा दागिने देण्याची जुनी परंपरा आहे. मात्र, सध्या सोन्या-चांदीचे दर गगनाला भिडल्यामुळे हे मौल्यवान धातू सर्वसामान्यांच्या बजेटबाहेर गेले आहेत. यावर सुवर्णमध्य काढत सर्वसामान्य नागरिकांनी आता सोन्या-चांदीऐवजी इतर धातूंच्या वस्तू खरेदी करण्याकडे आपला कल वाढवला आहे. त्यामुळे स्थानिक भांडी बाजारात तांबे, पितळ आणि काशाच्या भांड्यांची खरेदी करण्यासाठी ग्राहकांची प्रचंड गर्दी होत असल्याची माहिती स्थानिक विक्रेत्यांनी दिली. बाजारात सध्या पारंपरिक आणि पूजेच्या साहित्याला सर्वाधिक पसंती मिळत आहे. यामध्ये प्रामुख्याने तांब्या-पितळेचे घंगाळ, समई, नंदादीप, तांबे आणि पूजेचे इतर साहित्य मोठ्या प्रमाणावर विकले जात आहे.

जावयाचे पाय धुण्यासाठी घंगाळाचा वापर केला जातो, त्यामुळे घंगाळाची विक्री २० ते २५ टक्क्यांनी वाढली आहे. अधिक मासामुळे या विशिष्ट साहित्याची मागणी वाढल्याने शहरातील मुख्य भांडी बाजार ग्राहकांच्या गर्दीने गजबजला आहे. वाढत्या महागाईच्या काळात सोन्या-चांदीला पर्याय म्हणून तांबे-पितळेच्या धातूंकडे वळत नागरिकांनी परंपरेचा आनंद कायम ठेवल्याचे चित्र बाजारात दिसत आहे.

> **किमतीत २० ते २२ टक्क्यांची वाढ**
>
> ■ अधिक मासमुळे भांडी बाजारात मागणी वाढल्याचा थेट परिणाम या धातूंच्या किमतीवरही पाहायला मिळत आहे. स्थानिक व्यापाऱ्यांच्या मते, तांबे आणि पितळाच्या भांड्यांच्या दरात गेल्या काही दिवसांत २० ते २२ टक्के वाढ झाली आहे. काही दिवसांपूर्वी साधारणतः १,३०० ते १,४०० रुपये प्रति किलो मिळणारे तांबे व पितळी भांडी आता २,००० ते २,१०० रुपये प्रति किलोवर पोहोचली आहेत. दर वाढले असले तरी सोन्या-चांदीच्या तुलनेत हे दर परवडणारे असल्याने ग्राहक उत्साहाने खरेदी करत आहेत.

> **आयात शुल्क वाढल्याने दर वधारले..**
>
> ■ आखाती देशात सुरू असलेल्या तणावामुळे इंधनाचे भाव वाढले आहे. त्यामुळे कच्चा मालावरील आवक शुल्क वधारल्याने प्रत्येक वस्तूंवरील भाव वाढले आहेत. सध्या पितळ, तांबा, स्टिलसह इतरही वस्तूंमध्ये २० ते २२ टक्क्यांनी वाढ झाल्याचे येथील भांडे विक्रेत्यांनी सांगितले.

---

## कृषी विभागातर्फे खरीप हंगाम नियोजन व गुलाबी बोंड अळी व्यवस्थापन कार्यशाळा

**जळगाव जामोद/प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन कृषी विभाग, आत्मा बुलढाणा व कृषी विज्ञान केंद्र जळगाव जामोद यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी तंत्रज्ञानाचा जागर खरीप हंगाम मोहीम २०२६ अंतर्गत खरीप हंगाम नियोजन तसेच कपाशी पिकावरील गुलाबी बोंड अळी व्यवस्थापन कार्यशाळेचे आयोजन २८ मे रोजी आमदार डॉ सजय कुटे यांच्या पत्नी डॉ. अपर्णा संजय कुटे जळगाव जामोद यांच्या मार्गदर्शनामध्ये योगा हॉल, नगर परिषद जळगाव जामोद येथे करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ. अपर्णा संजय कुटे हे उपस्थित होते. कार्यक्रमास प्रमुख अतिथी बाळासाहेब व्यवहारे उपविभागीय कृषी अधिकारी, खामगाव, विकास जाधव कार्यक्रम समन्वयक कृषी विज्ञान केंद्र जळगाव जामोद तसेच विकास



जाधव मुख्याधिकारी नगरपरिषद जळगाव जामोद हे उपस्थित होते. कार्यक्रमात खरीप हंगाम पूर्व नियोजन, अलनिनोच्या पार्श्वभूमीवर पीक व्यवस्थापन, बीज प्रक्रिया, मृदा परीक्षण तसेच कपाशी पिकावरील गुलाबी बोंड अळी नियंत्रणासाठी शेतकऱ्यांनी घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी उपस्थित तज्ज्ञांनी शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब करून उत्पादन वाढविण्याचे आवाहन केले. तसेच तालुका कृषी अधिकारी रमेश जाधव यांनी बदलत्या हवामानानुसार शेतीमध्ये करावयाचे बदल याबद्दल तसेच महाविस्तार कृषी अँप चे महत्व शेतकऱ्यांना समजावून सांगितले. कार्यक्रमास तालुक्यातील मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन तालुका कृषी अधिकारी, जळगाव जामोद व संग्रामपूर यांच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन के.व्ही.भगत सहाय्यक कृषी अधिकारी यांनी केले.

दैनिक महाभूमि

शुक्रवार । २९ मे २०२६


dainikmahabhoomi@gmail.com

# वाशिम भूमि

## वार्डनिहाय सदस्य आरक्षण सोडतीसाठी १२ जून रोजी विशेष ग्रामसभा

# ग्रा.पं. च्या निवडणुकांची चाहूल ; वार्डनिहाय आरक्षण कार्यक्रम जाहीर

**वाशिम / प्रतिनिधी**




जिल्ह्यातील तब्बल १६३ ग्रामपंचायतींचा कार्यकाळ फेब्रुवारी २०२६ मध्ये संपुष्टात आल्यानंतर या ग्रामपंचायतींमध्ये सध्या प्रशासकांच्या माध्यमातून कारभार सुरू आहे. या पार्श्वभूमीवर मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींसाठी अंतिम प्रभागरचना ४ मे रोजी जाहीर करण्यात आली असून आता राज्य निवडणूक आयोगाने ग्रामपंचायत सदस्यांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रमही जाहीर केला आहे. विशेष म्हणजे सन २०२४ आणि २०२५ मध्ये मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींबरोबरच २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींचाही या प्रक्रियेत समावेश करण्यात आला आहे.

सर्वोच्च न्यायालयातील विविध याचिकांमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेत काही काळ अडथळे निर्माण झाले होते. त्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने प्रभागरचना व आरक्षणासंदर्भात वेळोवेळी सुधारित आदेश निर्गमित केले. मुदत संपलेल्या तसेच मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींसाठी नव्याने आरक्षण प्रक्रिया राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. राज्य निवडणूक आयोगाने २६ मे रोजी जारी केलेल्या आदेशानुसार बिगर व अनुसूचित क्षेत्रातील मुदत संपलेल्या तसेच पुनर्गठित ग्रामपंचायतींसाठी सदस्यसंख्या, प्रभागरचना आणि आरक्षण निश्चितीची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ आणि भारतीय संविधानातील तरतुदींनुसार ही प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने पार पडणार असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.राज्यातील ग्रामपंचायतींमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग आणि महिलांसाठी जागांचे आरक्षण निश्चित करण्यात येणार आहे. आयोगाच्या आदेशानुसार नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी राखीव जागा पंचायतमधील एकूण जागांच्या २७ टक्क्यांपर्यंत असतील, तर एकूण आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांपेक्षा अधिक राहणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जिल्ह्यातील १६३ ग्रामपंचायतींमध्ये सध्या प्रशासकांच्या माध्यमातून कारभार सुरू असला तरी निवडणूक प्रक्रियेला सुरुवात झाल्याने गावपातळीवर राजकीय हालचालींना वेग आला आहे. संभाव्य उमेदवारांकडून मतदार संपर्क, गटबाजी आणि आरक्षणाच्या संभाव्य समीकरणांची चाचपणी सुरू झाली असून आरक्षण सोडतीनंतर अनेक गावांमधील राजकीय चित्र स्पष्ट होणार आहे.

### मुदत संपलेल्या ग्रामपंचायती

| | |
|---|---|
| वाशिम | २४ |
| रिसोड | ३४ |
| कारंजा | २८ |
| मंगरूळपीर | २५ |
| मालेगाव | ३० |
| मानोरा | २२ |

### १० जुलैला आरक्षण अंतिम होणार

■ आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार ८ जून रोजी विशेष ग्रामसभेची सूचना प्रसिद्ध केली जाईल. १२ जून रोजी विशेष ग्रामसभेत तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे. त्यानंतर १७ जूनपर्यंत प्रारूप आरक्षण अधिसूचनेला जिल्हाधिकाऱ्यांची मान्यता घेतली जाईल व १९ जून रोजी प्रारूप आरक्षण प्रसिद्ध केले जाईल. १९ जून ते २५ जूनदरम्यान हरकती व सूचना मागविण्यात येणार असून त्यावरील सुनावणीनंतर ८ जुलैपर्यंत अंतिम अधिसूचनेला मान्यता दिली जाणार आहे. अंतिम आरक्षण अधिसूचना १० जुलै रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

### वार्ड आरक्षणाची घोषणा होताच मोर्चेबांधणी

■ वार्डनिहाय आरक्षण कार्यक्रम जाहीर होताच जिल्ह्यातील ग्रामपंचायत राजकारणाला वेग आला आहे. संभाव्य उमेदवारांनी गावपातळीवर मोर्चेबांधणी सुरू केली असून विविध गट-तटांमध्ये बैठका, संपर्क दौरे आणि राजकीय समीकरणांची चाचपणी सुरू झाली आहे. कोणता वार्ड कोणत्या प्रवर्गासाठी राखीव होणार, याकडे इच्छुकांचे लक्ष लागले असून आरक्षण सोडतीनंतर अनेक गावांतील राजकीय चित्र स्पष्ट होणार आहे.

## जिल्ह्यात ईद -उल-अजहा उत्साहात



**रिसोड / प्रतिनिधी**



शहरासह तालुक्यात २८ मे रोजी ईद-उल-अजहा (बकरी ईद) मोठ्या उत्साहात आणि धार्मिक वातावरणात साजरी करण्यात आली. सकाळपासूनच शहरातील मशिदी आणि ईदगाह परिसरात मुस्लिम बांधवांची मोठी गर्दी दिसून आली. सकाळी सुमारे ८.३० वाजता शहरातील विविध भागांतील मुस्लिम समाजबांधव एकत्र जमले. त्यानंतर शाही इमाम अब्दुल दयार यांच्या नेतृत्वाखाली लोणी मार्गावरील ईदगाहकडे मिरवणुकीने प्रस्थान करण्यात आले.

सकाळी ८.४५ वाजता ईदगाह येथे शाही इमाम मो. दयार यांनी सामूहिक ईदची नमाज अदा करविली. नमाजनंतर देशात शांतता व सौहार्द कायम राहावे, भरपूर पाऊस पडावा, शेतकरी व मजूर वर्ग सुखी राहावा तसेच व्यापार-उद्योगात भरभराट व्हावी, यासाठी विशेष दुआ करण्यात आली. यावेळी देशात भाईचारा आणि ऐक्य कायम राहावे, अशीही प्रार्थना करण्यात आली.

नमाजानंतर मुस्लिम बांधवांनी एकमेकांना गळाभेट देत ईदच्या शुभेच्छा दिल्या. अनेकांनी आपल्या नातेवाईकांच्या व मित्रपरिवाराच्या घरी भेट देऊन वयोवृद्धांचे आशीर्वाद घेत सणाचा आनंद साजरा केला. दरम्यान, ईदगाह परिसरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

### वाशिमसह जिल्ह्यात ईद-उल-अजहाचा उत्साह

■ वाशिमसह संपूर्ण जिल्ह्यात गुरुवारी ईद-उल-अजहा (बकरी ईद) उत्साहात आणि धार्मिक वातावरणात साजरी करण्यात आली. शहर व तालुक्यातील मशिदी आणि ईदगाहांवर मुस्लिम बांधवांनी सामूहिक नमाज अदा करून देशात शांतता, भाईचारा आणि समृद्धीसाठी विशेष प्रार्थना केली. नमाजनंतर एकमेकांना गळाभेट देत ईदच्या शुभेच्छांची देवाणघेवाण करण्यात आली. विविध ठिकाणी पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## न्यूज ब्रीफ

### टीईटीचे विशेष परीक्षा केंद्र निश्चित

**वाशिम :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी)-२०२६ रविवार, २८ जून रोजी आयोजित करण्यात येणार आहे. शिक्षक पात्रता निश्चित करण्यासाठी ही परीक्षा महत्त्वाची मानली जाते. बंगाली, कन्नड, तेलगु, गुजराथी व सिंधी माध्यमातील उमेदवारांची राज्यातील संख्या तुलनेने कमी असल्याने संबंधित उमेदवारांसाठी विशेष परीक्षा केंद्र निश्चित करण्यात आली असून संकेत स्थळावर याबाबतची माहीती उपलब्ध करण्यात आली आहे.

### स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अभिवादन

**वाशिम :** स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात त्यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सहायक अधीक्षक अनिल घोडे यांनी सावरकरांच्या प्रतिमेस पुष्पांजली वाहिली. कार्यक्रमास अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## सरपंच उपाध्ये यांची अपात्रतेची कारवाई रद्दचे आदेश

**कारंजा / प्रतिनिधी**

तालुक्यातील काजळेश्वर ग्रामपंचायतीचे सरपंच नितीन विष्णू उपाध्ये यांच्यावरील अपात्रतेचा आदेश अखेर मंत्रालयाकडून रद्द करण्यात आला आहे.

महाराष्ट्र ग्रामविकास व पंचायत राज मंत्री न्यायालयाने २५ मे २०२६ रोजी दिलेल्या आदेशानुसार अप्पर आयुक्त, अमरावती विभाग यांनी १३ ऑक्टोबर २०२५ रोजी दिलेला अपात्रतेचा आदेश रद्द करण्यात आला. या प्रकरणात ग्रामपंचायतीतील विविध विकासकामांमध्ये अनियमितता झाल्याची तक्रार करण्यात आली होती. आयुर्वेदिक दवाखान्याची आवारभिंत, पोचमार्ग, ड्रेनेज, अंतर्गत रस्ते व नाली बांधकाम यासंदर्भात ई-निविदा प्रक्रिया न राबविणे तसेच निधी अपहाराचे आरोप करण्यात आले होते.

## भौरद-भिलदुर्गमध्ये पाणी प्रश्न गंभीर ; महिलांचा घागर मोर्चा

### पाणीटंचाई व रस्त्याच्या समस्यांवर ग्रामपंचायतीला निवेदन

**केनवड / प्रतिनिधी**



केनवडजवळील भौरद व भिलदुर्ग या दुर्गम गावांमध्ये भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असून महिलांना पाण्यासाठी मोठी पायपीट करावी लागत आहे.

या समस्येकडे प्रशासनाने लक्ष द्यावे, या मागणीसाठी महिलांनी गुरुवारी ग्रामपंचायत कार्यालयावर घागर मोर्चा काढला. गावात केवळ एकाच बोअरवेलवर पाणीपुरवठा होत असल्याने महिलांना तासन्तास रांगेत उभे राहावे लागते. मोटार किंवा वीजपुरवठ्यात बिघाड झाल्यास दूरवरून पाणी आणावे लागते. तसेच भौरद-भिलदुर्ग जोडणाऱ्या पुलाची उंची कमी असल्याने पावसाळ्यात वाहतूक बंद होते व नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागतो. फुले-आंबेडकर मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्था, केनवडचे अध्यक्ष माधवराव कुसळकर, राखी कुसळकर, मथुरा मंगेश जामकर व सदस्यांनी पुढाकार घेत महिलांसह ग्रामपंचायत कार्यालयावर मोर्चा काढून सरपंचांना निवेदन दिले.

आमच्या डोक्यावरील हंडा खाली उतरवा अशी मागणी करत लवकरात लवकर पाणी समस्या सोडवावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा महिलांनी दिला. मोर्चात मोठ्या संख्येने महिलांची उपस्थिती होती.

## जनगणनेचे काम वेळेत पूर्ण ; चार प्रगणकांचा सन्मान

**वाशिम / प्रतिनिधी**



जनगणना अंतर्गत पहिल्या टप्प्यातील घर यादी व घर नोंदणीचे काम यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या चार प्रगणकांचा तहसीलदार नीलेश पळसकर यांच्या हस्ते २८ मे रोजी सत्कार करण्यात आला.

तहसील कार्यालयातील दालनात आयोजित कार्यक्रमात खंडाळा खुर्दचे ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन, नागठाणाचे माधव उत्तम जाधव, झाकलवाडीच्या अर्चना ज्ञानबा कांबळे आणि विळेगावचे गणेश गोटे यांना शाल, श्रीफळ व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी बोलताना तहसीलदार पळसकर यांनी जनगणना ही देशाच्या विकासाचा आरसा असल्याचे सांगत प्रगणकांनी कडक उन्हात व दुर्गम भागात जाऊन प्रत्येक घराची अचूक नोंद घेतल्याबद्दल त्यांचे कौतुक केले. डिजिटल माध्यमातून कोणतेही घर नोंदणीपासून वंचित राहू नये यासाठी त्यांनी विशेष दक्षता घेतल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाला फिल्ड ट्रेनर, पर्यवेक्षक तसेच महसूल विभागाचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. घर यादी हा जनगणनेचा पाया असून त्यावरच पुढील लोकसंख्या नोंदणीची प्रक्रिया अवलंबून असते, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले. सत्काराला उत्तर देताना ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन यांनी गावकऱ्यांच्या सहकार्यामुळेच हे काम वेळेत पूर्ण होऊ शकले, असे सांगितले.

अर्चना कांबळे यांनी महिलांकडून मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादाबद्दल समाधान व्यक्त केले. दरम्यान, घर यादीचे काम पूर्ण झाल्यानंतर पुढील टप्प्यात फेब्रुवारी २०२७ पासून प्रत्यक्ष लोकसंख्या नोंदणीला सुरुवात होणार असून नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले.

## महामार्गावर नाकाबंदी

**वाशिम / प्रतिनिधी**

हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी येथे साईनगर परिसरात युवकाची दगडाने ठेचून हत्या केल्याप्रकरणी फरार असलेल्या दोन आरोपींना हिंगोली स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली आहे. वाशिम-अकोला महामार्गावर वाशिम सीमेवर गुरुवारी पाच तास नाकाबंदी करून ही कारवाई करण्यात आली. २२ मे रोजी सायंकाळी साईनगर परिसरातील एका युवकाची हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात यापूर्वी चार आरोपींना अटक करण्यात आली होती.

## संजय देशमुख यांची राज्यस्तरीय कृषी पुरस्कारासाठी निवड

**मालेगाव / प्रतिनिधी**



तालुक्यातील शिरपूर येथील प्रगतशील शेतकरी संजय देशमुख यांची राज्यस्तरीय कृषी पुरस्कारांसाठी निवड झाली आहे.

कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य, आधुनिक शेती पद्धतींचा प्रभावी वापर तसेच विविध पिकांमध्ये मिळविलेल्या यशामुळे त्यांना दोन प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरविण्यात येणार आहे. संजय देशमुख यांची 'स्वराज्य सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्यस्तरीय गौरव पुरस्कार' तसेच 'श्री संत सावता माळी कृषी पुरस्कार राष्ट्रीय संत प्रेरणा गौरव पुरस्कार' यासाठी निवड करण्यात आली आहे. या पुरस्कारांचे वितरण अनुक्रमे ५ जुलै रोजी सावेडी रोड, अहिल्यानगर येथील संकुल सभागृहात तसेच १४ जून रोजी वाई, जि. सातारा येथे आयोजित कार्यक्रमात करण्यात येणार आहे. देशमुख यांनी हळद, पपई, शिमला मिरची आदी पिकांच्या उत्पादनामध्ये उल्लेखनीय यश मिळविले आहे. त्यांच्या शेतीतील प्रयोगशीलता आणि नियोजनाची दखल विविध स्तरावर घेण्यात आली आहे.

### एसआयआर मोहिमेत 'बीएलए'ची भूमिका महत्त्वाची: जिल्हाधिकारी

# १० लाखांहून अधिक मतदारांची होणार प्रत्यक्ष पडताळणी

**वाशिम / प्रतिनिधी**



भारत निवडणूक आयोगाने मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) राबविण्याचे आदेश दिले असून महाराष्ट्राचा या मोहिमेच्या तिसऱ्या टप्प्यात समावेश करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर वाशिम जिल्ह्यातील तब्बल १० लाख २२ हजार ८२१ मतदारांच्या नोंदींची प्रत्यक्ष पडताळणी करण्यात येणार आहे.

या मोहिमेत मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी (बीएलए) यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याने ज्या राजकीय पक्षांनी अद्याप बीएलए नियुक्त केलेले नाहीत त्यांनी तातडीने नियुक्ती करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयात बुधवारी आयोजित मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी प्रभारी उपजिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली देवकर यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. भारत निवडणूक आयोगाकडून यापूर्वी २००२ ते २००४ या कालावधीत विशेष सखोल पुनरिक्षण करण्यात आले होते. मात्र त्यानंतर गेल्या दोन दशकांत केवळ विशेष संक्षिप्त पुनरिक्षण झाले. या काळात मोठ्या प्रमाणावर शहरीकरण, स्थलांतर तसेच मतदारांच्या नोंदींमध्ये बदल झाल्यामुळे काही ठिकाणी दुबार नावे राहिल्याची शक्यता निर्माण झाली आहे. अनेक मतदारांनी नवीन ठिकाणी नावनोंदणी केली असली तरी जुन्या ठिकाणचे नाव वगळले नसल्याने मतदार याद्यांमध्ये अचूकता राखण्यासाठी ही विशेष मोहीम राबविण्यात येत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.विशेष सखोल पुनरिक्षण मोहीम जून ते ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार असून २० ते २९ जूनदरम्यान प्रशिक्षण व गणना अर्ज छपाई होणार आहे. ३० जून ते २९ जुलैदरम्यान घरोघरी जाऊन पूर्वमाहिती भरलेले गणना प्रपत्र वितरित करून त्याचे संकलन करणार आहेत. घर बंद आढळल्यास किमान तीन वेळा भेट दिली जाणार आहे. मतदारांना २००२-०४ मधील जुनी मतदार माहिती ... वरून मिळणार असून गणना प्रपत्र ऑनलाईनही भरता येणार आहे. ५ ऑगस्ट रोजी प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध होणार असून ४ सप्टेंबरपर्यंत दावे व हरकती दाखल करता येणार आहेत. अंतिम मतदार यादी ७ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे. दरम्यान, आधार कार्ड हे ओळखपत्र म्हणून ग्राह्य असले तरी ते नागरिकत्वाचा पुरावा मानला जाणार नसल्याचे निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे.बैठकीस भारतीय जनता पार्टी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार), महाराष्ट्र नवनिर्माण सेना, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), बहुजन समाज पार्टी तसेच भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

### जिल्ह्यात ८३.९१ टक्के मॅपिंग पूर्ण

■ वाशिम जिल्ह्यातील मतदारांच्या तपशीलांची खातरजमा करण्यासाठी १,१०० मतदान केंद्रस्तरीय अधिकारी कार्यरत राहणार आहेत. या प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी विविध राजकीय पक्षांकडून नियुक्त करण्यात आलेले मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी (बीएलए ) सहकार्य करणार आहेत. सध्या जिल्ह्यात विविध राजकीय पक्षांनी २,३३२ बीएलए नियुक्त केले आहेत. प्रशासनाकडून विद्यमान मतदारांची माहिती २००२-०४ मधील जुन्या मतदार याद्यांशी जुळविण्याचे काम सुरू असून आतापर्यंत जिल्ह्यात ८३.९१ टक्के मॅपिंग पूर्ण झाले आहे. त्यामध्ये रिसोड मतदारसंघात ९१.६४ टक्के, वाशिम मतदारसंघात ७८.२२ टक्के आणि कारंजा मतदारसंघात ८२.७९ टक्के मॅपिंग पूर्ण झाले आहे.

## ५७ संशयितांची डिजिटल एक्स-रेद्वारे तपासणी

**मानोरा / प्रतिनिधी**

पोहरादेवी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात संशयित क्षयरुग्णांसाठी डिजिटल एक्स-रे तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. शिबिरात ५७ संशयितांची डिजिटल एक्स-रेद्वारे तपासणी करण्यात आली, तर ३२ संशयितांचे स्पुटम नमुने संकलित करण्यात आले. हे शिबिर जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा क्षयरोग अधिकारी तसेच तालुका आरोग्य अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. एक्स-रे तज्ज्ञ अक्षय इंगळे यांनी संशयित रुग्णांची तपासणी केली. यावेळी डॉ. शिंदे, डॉ. जाकीर हुसेन, अमोल राठोड, कुंजाजी भागवत, प्रवीण जतकर आदी उपस्थित होते.

## जाहीरनामा

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, अर्जदार **रूस्तमराव नामदेवराव देशमुख रा. तांदळी बु. ता. जि. वाशिम** यांनी अर्ज या कार्यालयात सादर केला असून त्यांनी त्यांचे अर्जामध्ये नमुद केले आहे की, माझी शेती मौजे **तांदळी बु.** येथे गट नं. १६५ व १५५ मध्ये जमिन असून त्यामध्ये माझे नांव चुकीने रूस्तमराव नामदेवराव देशमुख असे झालेले आहे परंतु माझे नांव हे **रूस्तमराव नामदेवराव इंगळे** असे आहे. त्याबाबत मुळ कागदपत्रे व राजपत्र सुध्दा सादर केले आहे. तेव्हा सदर राजपत्राप्रमाणे ऑन लाईन ७/१२ मध्ये दुरूस्ती करण्याबाबत अर्ज या कार्यालयात सादर केला आहे.

तेव्हा अर्जदार यांचे अर्जानुसार **मौजे तांदळी बु.** येथील गट नं. १६५ व १५५ येथील त्यांचे ताब्यातोल व वहीतीमधील ७/१२ वर **रूस्तमराव नामदेवराव देशमुख** झाले असून त्याऐवजी **रूस्तमराव नामदेवराव इंगळे** अशी दुरूस्ती करण्यास हरकत व आक्षेप असल्यास सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्याचे दिनांकापासून १५ दिवसाचे आत त्यांनी लेखी या कार्यालयात कळवावे. मुदतीनंतर प्राप्त आक्षेप/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**दिनांक :- १३/०५/२०२५**

**ठिकाण :- वाशिम**

सही/-

(निलेश पळसकर)

तहसिलदार, वाशिम

## राजस्थानने हैदराबादला चारली धूळ..

# गुजरात अन् राजस्थान भिडणार!

**चंदीगड, वृत्तसंस्था :**

इंडियन प्रीमियर लीगच्या प्लेऑफमध्ये राजस्थान रॉयल्सने सनरायझर्स हैदराबादचा ४७ धावांनी धुव्वा उडवला. या विजयासह त्यांनी आयपीएल ट्रॉफीच्या दिशेने आणखी एक पाऊल टाकले आहे. बुधवारी झालेल्या एलिमिनेटर सामन्यात राजस्थानने सर्व विभागांत उत्कृष्ट कामगिरी केली आणि क्वालिफायर २ मध्ये आपली जागा पक्की केली. आता अंतिम फेरीतील दुसरा संघ निश्चित करण्यासाठी राजस्थान रॉयल्स आणि गुजरात टायटन्स यांच्यात क्वालिफायर २ सामना रंगणार आहे.



एलिमिनेटर सामन्यात प्रथम फलंदाजी करताना राजस्थानने २४३ धावांचा डोंगर उभा केला. या डावाचा मुख्य शिल्पकार ठरला १५ वर्षीय वैभव सूर्यवंशी. त्याने अवघ्या २९ चेंडूंमध्ये ९७ धावांची वादळी खेळी करत १२ षटकार आणि ५ चौकारांची आतषबाजी केली. एका हंगामात सर्वाधिक ६५ षटकार मारण्याचा विक्रमही त्याने आपल्या नावावर केला. यापूर्वी हा विक्रम ख्रिस गेलच्या नावावर ५९ षटकारांसह १४ वर्षांपासून कायम होता. ध्रुव जुरेलनेही २१ चेंडूंमध्ये ५० धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. २४४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना सनरायझर्स हैदराबादची सुरुवात खराब झाली. पॉवरप्लेमध्येच संघाने चार विकेट्स गमावल्या आणि अखेर संपूर्ण संघ १९६ धावांवर सर्वबाद झाला. राजस्थानच्या गोलंदाजांनीही अचूक गोलंदाजी करत हैदराबादला महत्वपूर्ण सामन्यात धूळ चारली.

### असे आहे वेळापत्रक

■ गुजरात टायटन्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यातील क्वालिफायर २ सामना शुक्रवार, २९ मे रोजी महाराजा यादवेंद्र सिंग पीसीए स्टेडियम, मुल्लानपूर, न्यू चंदीगड येथे खेळवला जाणार आहे. भारतीय वेळेनुसार हा हायव्होल्टेज सामना सायंकाळी ७:३० वाजता सुरू होईल, तर नाणेफेक ७ वाजता होणार आहे. या सामन्याचा विजेता संघ अंतिम फेरीत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूशी ट्रॉफीसाठी भिडणार आहे. या सामन्याचे थेट प्रक्षेपण स्टार स्पोर्ट्स नेटवर्कवर पाहता येणार असून जिओहॉटस्टार ॲप आणि वेबसाइटवर लाइव्ह स्ट्रीमिंग उपलब्ध असेल.

# 'बेबी बॉस'वर फिदा 'युनिव्हर्सल बॉस!

## सूर्यवंशीसाठी ख्रिस गेलची खास पोस्ट

**जयपूर, वृत्तसंस्था :**

आयपीएल २०२६ मध्ये राजस्थान रॉयल्सचा १५ वर्षीय सलामीवीर वैभव सूर्यवंशी सध्या संपूर्ण क्रिकेटविश्वात चर्चेचा विषय ठरला आहे. बुधवारी सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या एलिमिनेटर सामन्यात वैभवने पुन्हा एकदा विस्फोटक फलंदाजी करत इतिहास रचला. अवघ्या २९ चेंडूंमध्ये ९७ धावांची स्फोटक खेळी करत वैभवने मैदानावर चौफेर फटकेबाजी केली. विशेष म्हणजे या खेळीत त्याने तब्बल १२ षटकार ठोकत टी-२० क्रिकेटमधील अनेक विक्रम आपल्या नावावर केले.

वैभवला शतकासाठी फक्त तीन धावांची गरज होती. मात्र, मोठा फटका मारण्याच्या प्रयत्नात तो सीमारेषेवर झेलबाद झाला आणि त्याचे शतक अवघ्या तीन धावांनी हुकले. तरीही त्याच्या २९ चेंडूंतील ९७ धावांच्या तुफानी खेळीने क्रिकेट चाहत्यांचे मनोरंजन केले. या कामगिरीसह वैभवने टी-२० क्रिकेटचा 'युनिव्हर्स बॉस' ख्रिस गेलचा एकाच आयपीएल हंगामात सर्वाधिक षटकारांचा १४ वर्षांपूर्वीचा विक्रम ही मोडला. आता या हंगामात वैभवच्या नावावर तब्बल ६५ षटकारांची नोंद झाली आहे. वैभवच्या या विस्फोटक खेळीने प्रभावित होत ख्रिस गेलने स्वतः



सोशल मीडियावर त्याचे कौतुक केले. सामन्यानंतर गेलने आपल्या अधिकृत सोशल मीडिया हँडलवर स्क्रीनवरील वैभवचे फोटो शेअर करत त्याला नवीन सिक्स मशीन अशी खास उपाधी दिली. गेलने सोशल मीडियावर वैभवच्या फलंदाजीचा स्क्रीनशॉट शेअर करत लिहिले की, कार्नेज वैभव सूर्यवंशीः दुर्दैवी! पण तू सुद्धा तिथे पोहोचशील. क्रिकेटमध्ये 'कार्नेज' हा शब्द अशा फलंदाजासाठी वापरला जातो जो गोलंदाजांची अक्षरशः धुलाई करतो. सर्वात जलद शतकाचा विक्रम थोडक्यात हुकल्यामुळे गेलने त्याला दुर्दैवी म्हटले, पण भविष्यात तो हा विक्रम नक्की मोडेल, असा विश्वासही व्यक्त केला.

# नॉर्वे चेसमध्ये प्रज्ञानानंदाने कार्लसनला हरवले

**इंग्लंड, वृत्तसंस्था :**

भारतीय ग्रँडमास्टर आर प्रज्ञानानंदाने नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत जगातील नंबर-१ खेळाडू मॅग्नस कार्लसनला हरवून मोठा उलटफेर केला. तर, वर्ल्ड चॅम्पियन डी गुकेश सलग दुसऱ्या फेरीत हरला. पुढील फेरीत त्याचा सामना मॅग्नस कार्लसनशी होईल.

प्रज्ञानानंदाने क्लासिकल सामन्यात कार्लसनला हरवून तीन गुण मिळवले. या विजयामुळे तो ४.५ गुण घेऊन दुसऱ्या स्थानावर पोहोचला. महिलांच्या गटात दिव्या देशमुखने विजयाची मालिका कायम ठेवली आहे. ती दुसऱ्या स्थानावर आहे. प्रज्ञानानंदाने नॉर्वे चेसमध्ये क्लासिकल फॉरमॅटमध्ये कार्लसनला दुसऱ्यांदा हरवले आहे. त्याने २०२४ मध्येही माजी वर्ल्ड चॅम्पियनला हरवले होते. भारतीय खेळाडू म्हणाला की सामना खूप अटीतटीचा होता आणि टाइम स्क्रॅम्बलमध्ये निकाल कोणत्याही बाजूने जाऊ शकला असता. सात वेळा चॅम्पियन राहिलेला कार्लसन सहा खेळाडूंच्या गुणतालिकेत १.५ गुणांसह सर्वात खाली आहे. दुसरीकडे, विश्वविजेता डी गुकेशची खराब फॉर्म कायम राहिली. फ्रान्सच्या अलीरेझा फिरोजा याने त्याला आर्मगेडन सामन्यात हरवून १.५ गुण मिळवले. सुमारे ५ तास चाललेला क्लासिकल सामना ड्रॉ राहिला, पण आर्मगेडनमध्ये फिरोजा जिंकला.


# महिला टी-२० विश्वचषकासाठी मॅच ऑफिशियल्सची घोषणा

**दिल्ली, वृत्तसंस्था :**

आयसीसी महिला टी ट्वेन्टीची सुरुवात १२ जून रोजी होणार असून, उद्घाटनाचा सामना यजमान इंग्लंड आणि श्रीलंका यांच्यात खेळला जाईल. या महास्पर्धेची मागील आवृत्ती २०२४ मध्ये पार पडली होती, ज्यामध्ये न्यूझीलंड संघ विजेता ठरला होता. यावेळी आपल्या विजेतेपदाचे रक्षण करणे हे त्यांच्यासाठी काही सोपे काम असणार नाही. दरम्यान, ही स्पर्धा सुरू होण्याच्या काहीच दिवस आधी, आयने गट फेरीतील सामन्यांसाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या सामना अधिकाऱ्यांची नावे जाहीर केली आहेत. या यादीमध्ये एकूण १४ पंच आणि चार सामना रेफरींचा समावेश आहे.

२०२६ च्या महिला विश्वचषकादरम्यान एकूण ३३ सामने ज्यामध्ये अंतिम सामन्याचाही समावेश आहे. या आवृत्तीसाठी निवडण्यात आलेल्या १४ सामना अधिकाऱ्यांमध्ये आणि चार सामना रेफरींमध्ये, नऊ सदस्यांनी यापूर्वी २०२४ च्या विश्वचषकातही काम केले आहे. या सामना अधिकाऱ्यांच्या गटामधील सर्वात अनुभवी सदस्याचा विचार करता, ऑस्ट्रेलियाच्या क्लेअर पोलोसॅक या आघाडीवर आहे; त्या सहाव्यांदा या स्पर्धेत पंच म्हणून काम करणार आहे.

**चार भारतीय महिलांचाही समावेश..** विश्वचषकासाठी जाहीर केलेल्या सामना अधिकाऱ्यांच्या यादीत चार भारतीय महिलांनाही स्थान मिळाले आहे; यापैकी तीन महिला पंच म्हणून काम पाहतील, तर एक महिला सामना रेफरीची भूमिका बजावणार आहे. अनुभवी भारतीय सामना रेफरी जी.एस. लक्ष्मी ज्या २०२४ च्या विश्वचषकाचाही भाग होत्या त्या या विश्वचषकात पुन्हा एकदा त्याच जबाबदाऱ्या पार पाडताना दिसतील. त्यांच्या व्यतिरिक्त, जननी एन, वृंदा राठी आणि गायत्री वेणुगोपालन यांना पंचगिरीची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.



# निशाणा सुवर्णपदकावर : २५ मीटर पिस्तूल प्रकारात ईशा सिंगचा नवा वर्ल्ड रेकॉर्ड

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था :**

भारतीय नेमबाज ईशा सिंगने बुधवारी आयएसएसएफ विश्वचषक स्पर्धेत शानदार कामगिरी करत महिलांच्या २५ मीटर पिस्तूल प्रकारात सुवर्णपदक पटकावले. जर्मनीतील म्युनिक येथे सुरू असलेल्या विश्वचषक स्पर्धेत २१ वर्षीय भारतीय नेमबाजने अंतिम फेरीत ४३ गुणांचा विश्वविक्रम नोंदवत सुवर्णपदक जिंकले. तिने कोरियाच्या किम ये-जीचा ४२ गुणांचा जुना विक्रम मोडला. तीन वेळा वर्ल्डचॅम्पियन पदक विजेत्या ईशाने अंतिम फेरीत यजमान जर्मनीच्या माजी विश्वविजेत्या डोरीन वेनेकॅम्पला पाच गुणांनी मागे टाकत सुवर्णपदकावर नाव कोरले. विशेष म्हणजे, ईशाने अंतिम फेरीत विश्वविक्रम नोंदवत ही ऐतिहासिक कामगिरी केली.

ऑलिम्पिक शूटिंग रेंजवर झालेल्या अंतिम सामन्यात ईशा सिंगने सुरुवातीपासूनच आक्रमक आणि अचूक नेमबाजी करत प्रतिस्पर्ध्यांवर दबाव निर्माण केला. पहिल्या तीन सिरीजमध्ये तिने सातत्यपूर्ण उत्कृष्ट गुण मिळवत मोठी आघाडी घेतली. अवघ्या २१ वर्षीय ईशा सिंगने अंतिम फेरीत ४३ गुणांची कमाई करत नवीन विश्वविक्रम आपल्या नावावर केला. याआधी हा विक्रम कोरियाच्या किम ये-जीच्या नावावर होता. या स्पर्धेत जर्मनीच्या माजी विश्वविजेत्या डोरीन वेनेकॅम्पने रजत पदक जिंकले तर बल्गेरियाच्या मिरोस्लावा मिंचेवाने कांस्यपदक जिंकले. ईशाने दोन वर्षांपूर्वी बाकू येथे कोरियाच्या किम ये-जीने केलेला ४२ गुणांचा विश्वविक्रम मोडला. याशिवाय तिने यांग जिनचा ४१ गुणांचा ज्युनियर विश्वविक्रमही मागे टाकला. तर, विद्यमान ऑलिम्पिक चॅम्पियन यांग जिनला या स्पर्धेत पाचव्या स्थानावर समाधान मानावे लागले.







## बुलढाणा

**एआरडी सिनेमॉल**

**राजा शिवाजी** : रात्री ८:४५
**देऊळ बंद २** : ९:००

## खामगाव

**श्री गजानन टॉकिज**

**राजा शिवाजी** : शो टाईम- दुपारी १२, दु. ३, सायं. ६, रात्री ९

**सनी पॅलेस टॉकिज**

**देऊळ बंद २** : शो टाईम- दुपारी १२, दु. ३, सायं. ६, रात्री ९

## वाशिम

**एच२एम मूव्हीप्लेक्स**

**राजा शिवाजी** : सकाळी ११:२०, दुपारी २:५५, सायंकाळी ६:२५, रात्री ९:४५
**देऊळ बंद-२** : सकाळी ११:४५, दुपारी ३:०५, सायंकाळी ६:२०, रात्री ९:३५**सनम बेवफा** : दु ०३:३०

## अकोला

**मिराज**

**धुरंधर दी रेव्हेंज (२)** : स. ९.००, स. १०.००, दु. १२.३०, दु. १.३०, दु. ५.१५, सायं. ६.१५, रात्री ८.४५, रात्री १०.००, रात्री ११.००
**डकैत** : स. ११.००, दु. ४.४५, रात्री १०.३०
**सुपर डुपर** : दु. २.००, रात्री ७.४५
**प्रोजेक्ट हैल मॅरी** : दु. २.३०, सायं. ५.४५

## जालना

**रत्नदीप सिनेमा**

**देऊळबंद २** : रा.०९ : ३०

**कृष्णा मल्टिप्लेक्स**

**राजा शिवाजी** : रा. ०९:००
**देऊळ बंद २** : रा. ०९:१५

**नीलम सिनेप्लेक्स**

**स्टार वॉर्स: द मँडलोरियन अँड ग्रोगु** : रा. ०९ :१५
**देऊळ बंद २** : रा. ०९:००

## छत्रपती संभाजीनगर

**इनॉक्स प्रोझोन मॉल**

**चाँद मेरा दिल** : सकाळी ११:१५, दुपारी १२:१५, २:३०, ४:३०, सायंकाळी ५:३०, ६:३०, रात्री १०:००
**राजा शिवाजी** : दुपारी १२:३०, सायंकाळी ५:३०
**पती पत्नी और वो दो** : दुपारी २:३०, सायंकाळी ५:३०
**देऊळ बंद-२** : दुपारी १२:३०, सायंकाळी ५:३०
**कृष्णावतरम -२** : दुपारी १२:१५, २:३०
**मिशेल** : दुपारी १२:१५
**भूत बंगला** : सायंकाळी ५:३०

**खिंवसरा सिनेफ्लेक्स**

**चांद मेरा दिल** : सकाळी ११:१५, दुपारी १२:१५, २:३०, ४:३०, सायंकाळी ५:३०, ६:३०
**राजा शिवाजी** : दुपारी १२:३०, २:३०, रात्री १०:२५
**सप्टेंबर २१** : दुपारी १२:३०, २:३०, रात्री १०:२५
**देऊळ बंद-२** : सायंकाळी ५:३०, ६:३०
**मिशेल** : सायंकाळी ५:३०

**मुक्ता - नुपूर सिनेमागृह**

**चाँद मेरा दिल** : सकाळी १०:००, दुपारी १२:००, ३:००, ४:०० सायंकाळी ६:००
**राजा शिवाजी** : सकाळी १०: १०, दुपारी ५ : ३०, सायंकाळी ८ : ००
**आखरी सवाल** : दुपारी २:३०, रात्री १०:२५
**देऊळ बंद-२** : दुपारी १२ : ००, रात्री ९ : ३०




# अनुराग कश्यप यांच्या 'बंदर'चा थरारक 'पिंजरा' ट्रॅक रिलीज


## बॉबी देओलच्या रहस्यमय अवताराची जोरदार चर्चा



बॉलिवूड अभिनेता बॉबी देओल च्या बंदर चित्रपटाबद्दल काही ना काही नवीन अपडेट येत असून प्रत्येक नवीन अपडेट अधिकच डार्क, अंगावर शहारे आणणारी रंजक होत चालली आहे. आधी दमदार टीझरने आपल्या रॉ इमोशन्स, भीतीदायक अस्थिरता आणि अनपेक्षित पात्रांच्या वेगळ्या दुनियेची ओळख करून देत प्रचंड चर्चा निर्माण केली. त्यानंतर नुकताच 'क्यूँ मज़ा आ रहा है' हा ट्रॅक रिलीज झाला. आणि आता निम त्यांनी चित्रपटातील पुढचं गाणं 'पिंजरा' रिलीज करून चाहत्यांची उत्सुकता आणखी वाढवली आहे. 'पिंजरा' या गाण्याला यांनी संगीत दिलं असून, त्यांच्या आवाजामुळे गाण्याला अधिक प्रभावी स्वरूप मिळालं आहे. तर गीतकार सुदीप शर्मा यांनी लिहिलेल्या थेट मनाला भिडणाऱ्या शब्दांनी या ट्रॅकची ताकद आणखी वाढवली आहे. गाणं केवळ उत्साहपूर्ण नाही, तर त्यात एक भयावह, अस्वस्थ आणि गडद वातावरणही जाणवतं. 'पिंजरा'मधील तीव्र संगीत, दमदार शब्द आणि रहस्यमय सादरीकरणामुळे प्रेक्षकांवर खोलवर प्रभाव पडताना दिसत आहे.

विशेष म्हणजे, या ट्रॅकमधून 'बंदर' चित्रपटाच्या डार्क आणि थरारक विश्वाची झलक अधिक ठळकपणे समोर आली आहे. 'पिंजरा' या गाण्यात दमदार उपस्थिती पाहायला मिळत आहे. तुरुंगातील एका जल्लोषमय प्रसंगात राज बी. शेट्टी आपल्या विजेसारख्या तडफफदार डान्स मूव्हसने संपूर्ण महफिल जिंकताना दिसतात. दुसरीकडे, गाण्याचे गडद आणि रहस्यमय व्हिज्युअल्स गुंतागुंतीच्या आणि अस्थिर डेटिंग लाइफच्या खोल गर्तेत घेऊन जातात. या ट्रॅकमध्ये ते वासना, वेड आणि भावनांच्या भोवऱ्यात अडकलेले दिसत असून, डरपिर झरललळ यांची गूढ उपस्थिती संपूर्ण गाण्यात सतत जाणवत राहते. 'पिंजरा' मधील डार्क वातावरण, थरारक मांडणी आणि पात्रांच्या गुंतागुंतीच्या भावविश्वामुळे या ट्रॅकने प्रेक्षकांची उत्सुकता आणखी वाढवली आहे.

# 'भारत भाग्य विधाता'चा मोशन पोस्टर रिलीज




बॉलिवूड अभिनेत्री कंगणा रनौत 'भारत भाग्य विधाता' या चित्रपटाचे प्रभावी मोशन पोस्टर प्रदर्शित झाले आहे. या पोस्टरमध्ये कंगना रक्ताने माखलेल्या जखमी अवस्थेत दिसत आहे. तिच्याभोवती आगीच्या ज्वाला दिसत आहेत. हा चित्रपट शौर्य, माणुसकी, त्याग आणि एकतेची कथा सादर करेल. कंगनाने तिच्या 'भारत भाग्य विधाता' या चित्रपटाचे मोशन पोस्टर इन्स्टाग्राम वर शेअर केले आहे. त्यासोबत कंगनाने कॅप्शनमध्ये लिहिले आहे, 'काहीतरी विशेष केल्यानंतर, ते त्याला सामान्य म्हणतात. ते दिसतात, पण दिसत नाहीत.'

प्रेक्षक कंगना रणौतच्या आगामी 'भारत भाग्य विधाता' या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत आहेत. हा चित्रपट १२ जून २०२६ रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. २६/११ च्या मुंबई हल्ल्यादरम्यान कामा हॉस्पिटलमधील नर्सेस आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी दाखवलेल्या शौर्यावर आधारित या चित्रपटात कंगनाने एका नर्सची मुख्य भूमिका साकारली आहे. 'भारत भाग्य विधाता'ची निर्माती कंगना रणौत आहे. मनोज तापारिया हे या चित्रपटाचे लेखक आणि दिग्दर्शक आहेत.

कंगनाचा 'भारत भाग्य विधाता' हा चित्रपट इम्तियाज अलीच्या 'मैं वापस आऊंगा'शी स्पर्धा करेल. हा चित्रपट १२ जून रोजी प्रदर्शित होत असून यात दिलजीत दोसांझ, शर्वरी वाघ आणि वेदांग रैना यांच्या भूमिका आहेत. विक्रम भट्टचा हॉरर चित्रपट हॉन्टेड ३डी: इकोज ऑफ द पास्ट आणि मनोज बाजपेयीचा गव्हर्नर: द सायलेंट सेव्हिअर देखील त्याच दिवशी चित्रपटगृहात दाखल होणार आहेत.

# 'मातृभूमी'मधील 'मैं हूंः' गाणं रिलीज

आजकाल सलमान खान त्याच्या आगामी 'मातृभूमी' या चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहे. हा चित्रपट लवकरच चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. भाईजानने ईदच्या दिवशी आपल्या चाहत्यांना एक खास भेट दिली. त्याने चित्रपटातील 'मैं हूँः' या गाण्याचा व्हिडिओ इन्स्टाग्रामवर पोस्ट केला. चाहत्यांनी या गाण्यावर उत्स्फूर्त प्रतिक्रिया दिल्या आहेत. बॉलिवूड सेलिब्रिटींनीही या गाण्याचे कौतुक केले असून भाईजानला ईदच्या शुभेच्छा दिल्या आहेत.



'मातृभूमी' चित्रपटातील 'मैं हूँः' या गाण्यात सलमान खान अभिनेत्री चित्रांगदासोबत रोमान्स करताना दिसतो. या गाण्यातील भाईजानची शैली चाहत्यांना खूप आवडली आहे. हे गाणे श्रेया घोषालने गायले आहे. 'मैं हूँ' या गाण्यात चित्रांगदाचे पात्र सीमेवर देशाचे रक्षण करणाऱ्या तिचा पती सलमान खानची आठवण काढते. या गाण्याला चाहत्यांकडून तसेच अनेक बॉलिवूड सेलिब्रिटींकडून चांगला प्रतिसाद मिळाला आहे, ज्यांनी सलमान खानच्या पोस्टवर प्रतिक्रिया दिली. राखी सावंत, कुणालिका सदानंद आणि इतर अनेकांनी गाण्याचे कौतुक केले आणि भाईजानला ईदच्या शुभेच्छा दिल्या. या चित्रपटात सलमान खान एका लष्करी अधिकाऱ्याच्या भूमिकेत दिसणार असून, तो चिनी सैनिकांशी लढताना दिसेल. या चित्रपटात सलमानच्या नायिकेच्या भूमिकेत चित्रांगदा सिंग आहे

# अभिनेत्री ढिंचक पूजाने गुपचुप लग्न उरकले..!

तुम्हाला 'सेल्फी मैंने लेली आजः' हे गाणे आठवत असेलच. तुम्ही कदाचित अजूनही असे गाणे विसरू शकत नसाल. अनेक वर्षांपूर्वी, ढिंचक पूजा हे गाणे गाऊन रातोरात स्टार बनली होती. जो कोणी ढिंचक पूजाचे गाणे ऐकायचा, त्याच्या कानातून रक्त येऊ लागायचे. परिस्थिती इतकी वाईट होती की लोक सोशल मीडियावर रोज ढिंचक पूजाला शिव्या देत असत. या गाण्याने धुमाकूळ घातल्यानंतर, ढिंचक पूजाने आणखी बरीच गाणी गायली, पण तिला तशी प्रसिद्धी मिळाली नाही. दरम्यान, ढिंचक पूजा पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. असे म्हटले जात आहे की ढिंचक पूजाने रातोरात लग्न केले आहे.

नुकतेच, ढिंचक पूजाने तिच्या इंस्टाग्रामवर एक लग्नाचा व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडिओमध्ये, ढिंचक पूजा तिच्या पतीचा हात धरून वधूच्या रूपात दिसत आहे. व्हिडिओमध्ये ढिंचक पूजाला ओळखणेही कठीण झाले आहे. मात्र, ढिंचक पूजा लाल रंगाच्या ड्रेसमध्ये अप्रतिम दिसत आहे. हा व्हिडिओ शेअर करत ढिंचक पूजाने लिहिले, मी तुम्हाला माझ्या लग्नातील काही फोटो दाखवत आहे. तुम्ही लवकरच आणखी फोटो पाहाल. फोटोंमध्ये ढिंचक पूजा खूप आनंदी दिसत आहे. लग्नाचे फोटो व्हायरल होताच, लोकांना ढिंचक पूजाच्या घाणेरड्या गाण्यांची आठवण येऊ लागली. यामुळेच आता लोक ढिंचक पूजाला ट्रोल करत आहेत. एका युझरने ढिंचक पूजाच्या व्हिडिओवर लिहिले, ङ्गआता तिचं लग्न झालंय, तिच्यावर गाणी बनवायला सुरुवात करू नका.ङ्घ दुसऱ्या एका युझरने लिहिले, तिची गाणी ऐकून आजही माझ्या कानांतून रक्त येतं. ढिंचक पूजा बिग बॉस ११ मध्ये सुद्धा दिसली होती. ढिंचक पूजाने वाईल्ड कार्ड म्हणून शोमध्ये प्रवेश केला होता. शोमध्ये प्रवेश करताच ढिंचक पूजाने आपला ॲटिट्यूड दाखवायला सुरुवात केली. मात्र, कालांतराने बिग बॉसने तिला घरातून बाहेर काढले.

